महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । गुरुवार, २० जून २०२४

# अनोख्या विषयांचे उत्कट आविष्कार

फोटो : शैलेश जाध



एकूण पट १

'महाराष्ट्र टाइम्स'च्या ६३व्या वर्धापन दिनानिमित्त 'मटा कॅलिडोस्कोप' या उपक्रमांतर्गत आणि 'विनय आपटे प्रतिष्ठान'च्या दहाव्या वर्धापनदिनानिमित्त एकांकिका महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं होतं. दादरच्या शिवाजी मंदिरमध्ये विनायक गणेश वझे कॉलेजची 'एकूण पट १' आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजची 'उणिवांची गोष्ट' या दोन अनोख्या विषयांच्या एकांकिकांचे प्रयोग रंगले.

महाराष्ट्र टाइम्स कॅलिडोस्कोप ६३ वर्धापन दिन




उणिवांची गोष्ट

मुंबई टाइम्स टीम

विविध मानाच्या स्पर्धांमध्ये पुरस्कार प्राप्त विनायक गणेश वझे कॉलेजची 'एकूण पट १' आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजची 'उणिवांची गोष्ट' या दोन अनोख्या विषयांवरील एकांकिकांना प्रेक्षकांची उपस्थिती लाभली. अभिनेते मकरंद देशपांडे हे कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे होते तर अभिनेत्री स्वाती चिटणीस यांची विशेष उपस्थिती एकांकिका महोत्सवाला लाभली. 'विनय नेहमीच तरुण कलाकारांना प्रोत्साहन देत असे. विनय उभा आहे म्हणजे नाटक होणारच ही खात्री होती. मी आयएनटी, आंतरमहाविद्यालयीन एकांकिका करत होतो. तेव्हापासून विनय आपटे यांनी मला प्रोत्साहन दिलं. 'गोमंतक एकांकिका' स्पर्धेत मी भाग घेतला होता. विनय आपटे आणि प्रकाश बुद्धीसागर परीक्षक होते. तेव्हा विनयनं माझ्या अभिनय कौशल्यावर विश्वास ठेवून मला बक्षीस दिलं होतं. पुढे 'अफलातून' नाटकात महत्त्वपूर्ण भूमिकेसाठी विनयनं निवड केली', अशी आठवण मकरंद यांनी सांगितली.

'आंतरमहाविद्यालयीन एकांकिका विनयबरोबर केल्या, पण व्यावसायिक रंगभूमीवर त्याच्याबरोबर काम करायचं राहून गेल्याची' खंत स्वाती चिटणीस यांनी व्यक्त केली. 'कॉलेजमध्ये केलेल्या पहिल्या एकांकिकेत त्याच्या मार्गदर्शनामुळे 'सर्वोत्कृष्ट अभिनेत्री' हा पुरस्कार मिळाला', अशी आठवण त्यांनी सांगितली. अभिनेते संजय मोने यांनी कार्यक्रमाचं सूत्रसंचालन केलं. 'विनय आमच्या मदतीला कधीही धावून येईल, आमच्याबरोबर तो कोणत्याही परिस्थितीत उभा राहील, याची खात्री होती. नवोदित कलाकारांना प्रोत्साहन देण्यासाठी त्यानं नेहमी प्रयत्न केले. तरुण कलाकारांवर त्याचा जास्त विश्वास होता', या शब्दांत संजय मोने यांनी विनय आपटे यांच्याबद्दल भावना व्यक्त केल्या.

**संकलन : स्वाती भट, दीपश्री आपटे**









दिग्दर्शक आकाश पेंढारकर, विकास कदम, लेखिका मधुगंधा कुलकर्णी, दिग्दर्शक-लेखक परेश मोकाशी, अभिनेता स्वप्नील जोशी, विजय पाध्ये, ॲडगुरू भरत दाभोळकर, सुकन्या मोने, अभिनेता आशुतोष गोखले यांची उपस्थिती महोत्सवाला लाभली.





"एकांकिका आणि विनय यांचं खूप जवळचं नातं होतं. स्पर्धांव्यतिरिक्त एकांकिका बघायला मिळत नाहीत, म्हणून यंदा पुरस्कारप्राप्त एकांकिका महोत्सवाच्या माध्यमातून ठेवल्या. रसिकांनी त्याला भरभरून प्रतिसाद दिला.

– **वैजयंती आपटे**, विश्वस्त, विनय आपटे प्रतिष्ठान

एरवी कॉलेजमधील स्पर्धांमध्ये सादर होत असलेल्या एकांकिका या कार्यक्रमांतर्गत बघता आल्या. या कार्यक्रमाच्या माध्यमातून प्रतिष्ठान सांस्कृतिक क्षेत्रात एक महत्त्वाचा वाटा उचलत आहे.

– **परेश मोकाशी**, दिग्दर्शक

विनय काका हा ज्याप्रकारे नवीन कलाकारांचं हक्काचं ठिकाण होता, तसंच काम हे प्रतिष्ठान नवोदित कलाकारांसाठी करत आहे. वैजयंती ताई आणि टीम इतकी वर्षं ज्या तळमळीनं हे काम करत आहेत त्यातून ही एक चळवळ उभी राहिली आहे.

– **स्वप्नील जोशी** , अभिनेता

सवाई महोत्सवानंतर आज या मोठ्या व्यासपीठावर दिग्गजांसमोर प्रयोग सादर करण्याची संधी मिळाली. स्टेजवर येणारे तांत्रिक बदल या कार्यक्रमांतर्गत अनुभवता आले.

– **अमित पाटील-सिद्धेश साळवी**, दिग्दर्शक, एकूण पट १

कॉलेज व्यासपीठावर कोण जिंकणार कोण हरणार हा स्पर्धेचा माहोल असतो. स्पर्धेचं दडपण बाजूला सारुन केवळ मुक्तपणे सादरीकरणाचा आनंद आम्हाला घेता आला. 'मटा' आणि विनय आपटे प्रतिष्ठानमुळे आम्हाला ही संधी मिळाली.

– **अजय पाटील**, दिग्दर्शक, उणिवांची गोष्ट

ठाणेवैभव

ठाणे, रविवार २३ जून २०२४

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात योग दिन साजरा



**ठाणे:** दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाण्यातील सतीश प्रधान जानसाधना महाविद्यालयात आंतरराष्ट्रीय योग दिन राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दल योग आणि क्रीडा समिती यांच्या संयुक्त विद्यमाने मोठ्या उत्साहात साजरा करण्यात आला.

यावेळी एकूण 140 विद्यार्थी व 24 प्राध्यापकांनी या योग सत्राचा लाभ घेतला. राष्ट्रीय छात्र सेनेच्या सानिका कुमार, हर्षिता पवार, दीपक मिश्रा व नागरी संरक्षण दलातील पुरुषोत्तम सुतार स्वयंसेवकांनी योग प्रशिक्षकांना प्रात्यक्षिकांसाठी मदत केली. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक सौमिल आठवले, सुयोग आणि कृष्णा यांनी आयोजनात मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन योग समिती प्रमुख प्रा.सुरेश हलबांडगे यांनी केले. सदर सत्रात व.महाविद्यालयाच्या उपप्राचार्या डॉ.सीमा केतकर व डॉ.मंजिरी गोंधळेकर, क. महाविद्यालयाचे उपप्राचार्य सीताराम वाहुळे यांनी आवर्जून भेट दिली.

उपप्राचार्य सीताराम वाहुळे, महेश पाटील, वीणा चौधरी, डॉ.अंजली जाधव, विमल पाटील, डॉ.किशोर वानखेडे, सुनील पंडा या प्राध्यापकांनी योगासानेही केली. या योग सत्राचे आयोजन सकाळी ठीक 7.30 ते 9 या वेळेत महाविद्यालयातील जिमखाना येथे आयोजित करण्यात आले.

योग प्रशिक्षक प्रा. अंजली देशपांडे यांनी प्रात्यक्षिकांच्या माध्यमातून योगासनांचे महत्त्व प्रभवीपणे विद्यार्थ्यांना पटवून दिले. त्यांनी सूक्ष्म व्यायाम, श्वसनाचे व्यायाम आणि इतर योगासने विद्यार्थ्यांकडून करवून घेतली. "योग ही जवळजवळ 5000 वर्षे जुनी प्राचीन प्रणाली आहे. अनेक आजारांना समूळ नष्ट करण्यासाठी, आजारांना प्रतिबंध म्हणून योग महत्त्वाचे आहे. योग शरीरातील शक्ती आणि जोम वाढवते, तसेच श्वासतंत्र व ध्यानतंत्र माणसाचे शारीरिक व मानसिक संतुलन नियंत्रित राहते." असे मत यावेळी योग प्रशिक्षक प्रा.अंजली देशपांडे यांनी मांडले. सदर योग सत्राच्या आयोजनात व.महाविद्यालयाचे रा.से.यो कार्यक्रम अधिकारी डॉ.बाबासाहेब कांबळे, प्रा.फरहत अन्सारी, क.महाविद्यालयाचे रा.से.यो कार्यक्रम अधिकारी शंकर झंजे, महेश कुलसंगे आणि स्मिता परब, नागरी संरक्षण दल प्रमुख किसन धादवड, क्रीडा विभाग प्रमुख प्रा.बाळकृष्ण मेढेकर व अरुणा केंद्रे तसेच प्रल्हाद खेतले, मधुकर पिसाळ यांनी मोलाची भूमिका बजावली. आयोजनात प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांचे मौलिक मार्गदर्शन लाभले. सत्रात डॉ.श्रीरंग कुडुक, डॉ.सर्जेराव बोऱ्हाडे, प्रा.माधुरी पाथरकर हे प्राध्यापक आवर्जून उपस्थित होते.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । शुक्रवार, २८ जून २०२४ ।

## अकरावीची कट-ऑफ ९० टक्क्यांपेक्षा जास्तच

**मुंबई :** इयत्ता ११वी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर झाली. अर्ज केलेल्या २,२८,३१२पैकी १,३०,६५० विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत स्थान मिळाले आहे. गेल्या काही वर्षांप्रमाणे यंदाही मुंबईतील प्रमुख महाविद्यालयांची कट-ऑफ ९० टक्क्यांपेक्षा जास्तच राहिली.

➤ वृत्त...२

# कट-ऑफ नव्वदीपारच

## अकरावी ऑनलाइन प्रवेशाची पहिली यादी जाहीर

- ५५,६५५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज
- कॉमर्स-सायन्सकडे ओढा
- १,३०,६५० विद्यार्थ्यांना मिळाल्या जागा

**म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई**

अकरावीच्या ऑनलाइन प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी गुरुवारी जाहीर झाली. यंदाही मुंबईतील प्रमुख कॉलेजांची कट-ऑफ ९० टक्क्यांपेक्षा जास्तच राहिली. विद्यार्थ्यांनी कॉमर्स आणि सायन्स या शाखांना सर्वाधिक पसंती दिली आहे. या यादीसाठी अर्ज केलेल्या २,२८,३१२पैकी १,३०,६५० विद्यार्थ्यांना पहिल्या यादीत स्थान मिळाले. त्यापैकी १२ हजार ८०८ विद्यार्थ्यांनी आर्ट्सला, ६९,०६० विद्यार्थ्यांनी कॉमर्सला, तर ४८,१४३ विद्यार्थ्यांनी सायन्सला प्राधान्यक्रम दिला होता. ५५,६५५ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले.

आर्ट्ससाठी नावाजलेल्या झेविअर्स आणि रुइया कॉलेजमांमध्ये पहिली यादी अनुक्रमे ९३.४ आणि ९२.२ टक्क्यांवर बंद झाली. सायन्स शाखेसाठी वाशीच्या फादर ॲग्नल कॉलेजमध्ये प्रवेश घेण्यास यंदा चढाओढ आहे. या कॉलेजची पहिली यादी ९३.८ टक्क्यांवर बंद झाली. रुइया आणि बिर्ला या कॉलेजांची यादी थांबली. कॉमर्स शाखेसाठी प्रसिद्ध असलेल्या पोदार कॉलेजमध्ये ९४.४ टक्के मिळवणाऱ्या विद्यार्थ्याचे नाव यादीत शेवटी आहे. त्या खाली वझे-केळकर कॉलेज (९२.४ टक्के) आणि मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स (९२ टक्के) यांचा क्रमांक आहे.

चित्र : प्रतीक



> आर्ट्सपेक्षा कॉमर्स आणि सायन्स शाखांकडे ओढा असणे, ही बाब पारंपरिक आहे. आपल्याकडे मुलांपेक्षाही पालकांचा निर्णय महत्त्वाचा असतो. पालकांची मानसिकता अद्याप या दोन शाखांच्या बाजूने अधिक आहे. त्याचेच प्रतिबिंब या दोन शाखांना प्राधान्य देण्यात दिसते. मात्र नव्या राष्ट्रीय धोरणामुळे हे चित्र बदलत आहे.
>
> **- डॉ. माधव राजवाडे**, प्राचार्य, साठे कॉलेज

### काही महत्त्वाच्या कॉलेजांमधील कट-ऑफ

| कॉलेज | आर्ट्स | कॉमर्स | सायन्स |
|---|---|---|---|
| झेविअर्स | ९३.४% | ८९.२% | ९१.६% |
| केसी | ८६% | ९१.४% | ८७.६% |
| रुइया | ९२.२% | - | ९३.४% |
| पोदार | - | ९४.४% | - |
| रूपारेल | ८५.८% | ९०.६% | ९१.८% |
| साठे | ८१% | ८९.२% | ९०.६% |
| डहाणूकर | - | ९०.८% | - |
| वझे-केळकर | ८८.४% | ९२.४% | ९२.८% |
| एमसीसी | - | ९२% | - |
| सीएचएम | ६२.२% | ८३.८% | ९०% |
| फादर ॲग्नेल | - | ८७% | ९३.८% |
| ज्ञानसाधना | ५०.४% | ७६.६% | ८८.६% |
| बिर्ला | ८६.८% | ९०.८% | ९३% |

लोकमत
शुक्रवार २८.६.२०२४



# ठाण्यात विज्ञान शाखेकडे विद्यार्थ्यांचा ओढा

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : शहरातील महाविद्यालयांची अकरावी प्रवेशाची पहिली गुणवत्ता यादी ऑनलाइन जाहीर झाली. गेल्या काही वर्षांत पारंपरिक अभ्यासक्रमांपेक्षा व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्राधान्य देत शाखांची निवड केली जात आहे. एकेकाळी वाणिज्य शाखेकडे अधिक प्रमाणात वळणारा विद्यार्थी आता विज्ञान आणि कला शाखेला महत्त्व देत असल्याचे यंदाच्या कट ऑफवरून पाहायला मिळत आहे. मुंबई, पुण्यात वाणिज्य शाखा कायमच अग्रस्थानी राहिली आहे. परंतु अलीकडे आयटी, सीएस, आरोग्य या इंडस्ट्रीदेखील विकसित झाल्याने मुलांचा ओढा करिअरच्या दृष्टीने विज्ञान शाखेकडे वळला आहे.

गेल्या वर्षीपेक्षा यंदाचा कट ऑफ जास्त प्रमाणात असल्याचे निरीक्षण सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी नोंदवले. कॉर्पोरेट हॉस्पिटलमध्ये नर्सिंग स्टाफची आवश्यकता असते. त्यादृष्टीनेही विज्ञान शाखेकडे विद्यार्थी वळत असल्याचे त्यांनी सांगितले.

**बी. एन. बांदोडकर सायन्स महाविद्यालय**

पहिल्या गुणवत्ता यादीचा जनरल विभागातील कट ऑफ ९५.४ टक्के आहे. एससी ८३.२ टक्के, एसटी ७५.४, ओबीसी ८४ टक्के आहे.

**सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय**

कला शाखेचा कट ऑफ ५७.८ टक्के, वाणिज्य शाखा (अनुदानित) ७८ टक्के, वाणिज्य शाखा (सेल्फ फायनान्स एज्युकेशन) ६७.८ टक्के, विज्ञान शाखा (अनुदानित) ८५.४ टक्के, विज्ञान शाखा (सेल्फ फायनान्स एज्युकेशन) ९२ टक्के लागला आहे.

**केबीपी महाविद्यालय**

कला शाखेत खुला वर्गासाठी ५७ टक्के, इतर वर्गासाठी ३९ टक्के, वाणिज्य शाखा (अनुदानित) खुला वर्ग ६८ टक्के, इतर वर्ग ४० टक्के, वाणिज्य शाखा (विनाअनुदानित) खुला वर्ग ६० टक्के, इतर वर्ग ३७ टक्के, विज्ञान शाखा खुला वर्ग ७६ टक्के, इतर वर्ग ६० टक्के कट ऑफ यादी जाहीर झाली आहे.

**जोशी बेडेकर महाविद्यालय**

वाणिज्य शाखा कट ऑफ (अनुदानित) खुला वर्गात ८९.४० टक्के, एससी ७५.२० टक्के, एसटी ६०.४०, ओबीसी ७७.४० टक्के तसेच, वाणिज्य शाखेचा कट ऑफ (विनाअनुदानित) खुला वर्गात ८७.८० टक्के, एससी ६९ टक्के, एसटी ५२.८०, ओबीसी ७३ टक्के, कला शाखेचा कट ऑफ हा खुला वर्गात ८१.६०, एससी ५६.४० टक्के, एसटी ५१.६०, ओबीसी ४६ टक्के आहे.

लोकमत
epaper.lokmat.com
रविवार, दि. ३० जून २०२४

# शहरात अकरावी; बारावी मात्र खेडेगावात! का बदलतोय ट्रेंड?

## ठाण्यात टीसीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** शहरातील महाविद्यालयात अकरावीत प्रवेश घेतलेले अनेक विद्यार्थी टीसी काढून परत ग्रामीण भागातील महाविद्यालयांत प्रवेश घेतात. शहरातील हजेरीचे बंधन आणि ग्रामीण भागात प्रात्यक्षिक परीक्षेत जास्त गुण मिळण्याची शक्यता यामुळे हे घडते, असे सांगितले जाते. परीक्षेत जास्त गुण मिळावे, हे त्यामागचे कारण असल्याचे काही प्राध्यापकांनी सांगितले.

प्रत्येक महाविद्यालयातील नियामावलीप्रमाणे किमान उपस्थितीची मर्यादा निश्चित असते. ते पाळणे शक्य होत नाही. ग्रामीण भागात प्रात्यक्षिक परीक्षेत जास्त गुण मिळण्याची शक्यता आहे. परंतु, याबाबतीत ग्रामीण व शहरी निकालाचे सर्वेक्षण केल्यास शिक्कामोर्तब करता येईल. बऱ्याचदा ग्रामीण भागातून शहरात कुटुंबे स्थलांतरित होतात. परंतु, उदरनिर्वाहासाठी योग्य रोजगार व पुरेसा मोबदला न मिळाल्याने आर्थिक गणित चुकते, येथील फी भरणे शक्य होत नाही, गावाकडे कायमचे स्थलांतरित होणे ही कारणे असल्याची माहिती सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे प्रा. महेश कुलसंगे यांनी सांगितले.



### शहरात शिक्षक अतिरिक्त होण्याचा धोका

टीसीमुळे शहरातील महाविद्यालयांत असा कोणताही धोका सध्या नसल्याचे महाविद्यालयांनी सांगितले.

### अकरावी उत्तीर्ण विद्यार्थ्यांचा टीसीसाठी अर्ज

- ठाणे शहरातून टीसीसाठी अर्ज करणाऱ्या विद्यार्थ्यांची संख्या कमी असल्याचे महाविद्यालयांनी सांगितले. काही महाविद्यालयांत असे अर्ज केले जात नाही, अशीही माहिती देण्यात आली.
- ग्रामीण भागातून शहरात कुटुंबे स्थलांतरित होतात. परंतु, उदरनिर्वाहासाठी योग्य रोजगार व पुरेसा मोबदला न मिळाल्याने आर्थिक गणित चुकते, येथील फी भरणे शक्य होत नाही. त्यामुळे गावांकडे स्थलांतरित होतात.



शहरातील हजेरीचे बंधन आणि ग्रामीण भागात प्रात्यक्षिक परीक्षेत जास्त गुण अगदी हीच कारणे आहे असे नाही, याबरोबरच अनेक कारणे आहेत. ग्रामीण भागातील कॉपीचे प्रमाण शहरांच्या तुलनेत प्रचंड आहे, याचे कारण म्हणजे सैल बंदोबस्त किंवा निष्काळजीपणा होय. परीक्षांच्या काळात बऱ्याचदा यासंदर्भात बातम्या ऐकायला मिळतात. त्यामुळे जास्त मार्क मिळवण्याच्या उद्देशाने विद्यार्थी तिकडे प्रवेश घेतात.

**- प्रा. महेश कुलसंगे, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय**

विद्यापीठाच्या नियमानुसार कमीत कमी ७५ टक्के हजेरी असणे आवश्यक आहे. नियम म्हणून नाही, पण विद्यार्थ्याला घेतलेला अभ्यासक्रम व्यवस्थित समजावा व तो चांगल्या गुणांनी उत्तीर्ण व्हावा, यासाठी प्रत्येक महाविद्यालय विद्यार्थ्यांनी हजर राहावे, यासाठी प्रयत्नशील असते. हा मुद्दा शंभर टक्के घडतोच आहे, असे वाटत नाही. कारण, खूपच कमी विद्यार्थी टीसी घ्यायला येतात. पण, त्याची कारणे वेगवेगळी असतात. महाविद्यालयात या कारणाने कोणी टीसी घेतला गेला असेल, असे वाटत नाही. शहरात शिकणारा विद्यार्थीही समंजस आहे. स्वतःच्या करिअरसाठी आणि स्पर्धेत टिकून राहण्यासाठी विद्यार्थ्यांनी महाविद्यालयात उपस्थित राहून ज्ञानार्जन करणे हाच पर्याय आहे.

**- प्रा. संतोष गावडे, प्राचार्य, केबीपी महाविद्यालय.**

ज्या विद्यार्थ्यांना इतर महाविद्यालयांत प्रवेश घ्यायचा असतो, ते टीसी काढतात. स्वायत्त महाविद्यालयात विद्यार्थी नापास झाला, तर इंटर्नल पुन्हा परीक्षा घेतली जाते. तो पॅटर्न ॲफिलेटेड महाविद्यालयांना नसतो. त्यामुळे अनेक विद्यार्थी अशा महाविद्यालयांना पसंती देतात, तर काही विद्यार्थी इतर महाविद्यालयांत प्रवेश घेतात. शहरातील महाविद्यालयांत नियमानुसार ७५ टक्के हजेरी बंधनकारक आहे.

**- डॉ. गणेश भगुरे, प्राचार्य, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय.**

लोकमत
epaper.lokmat.com
मुंबई, सोमवार, दि. ८ जुलै २०२४

# विद्यार्थ्यांनी अनुभवले विधानभवनातील सत्र

## ५४ विद्यार्थी अन् नऊ शिक्षकांची भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील ५४ विद्यार्थी आणि ९ शिक्षकांनी शुक्रवारी विधानभवनाला भेट दिली. विधिमंडळ कामकाजाचा प्रत्यक्ष अनुभव मुलांना घेता यावा, लोकप्रतिनिधींचा परिचय व्हावा, या हेतूने कला शाखेने या शैक्षणिक सहलीचे आयोजन केले होते.

'छत्रपती शिवाजी महाराज वास्तूसंग्रहालयालाही' भेट दिल्याचे पर्यवेक्षक प्रा. सुनीता जमणे यांनी यावेळी सांगितले.

### 'विविध गोष्टींची माहिती, अभ्यासात होईल मदत'

सहलीमुळे खूप साऱ्या गोष्टींवर माहिती मिळाली. विधान भवनातील कामकाज कसे असते ते पाहायला मिळाले. वस्तुसंग्रहालयाला भेट दिल्याने आम्हांला जुन्या काळातील ग्रीक, इजिप्त इत्यादी देशांची संस्कृती, त्यांच्या काळातील मूर्ती, त्यांच्या देवदेवता आदी गोष्टींची माहिती मिळाली. पुरातनकाळातील पशु-पक्षी पाहायला मिळाले. या माहितीचा अभ्यासात उपयोग होईल, असे विद्यार्थी म्हणाले.

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । रविवार, १४ जुलै २०२४
महाराष्ट्र टाइम्स

# गिर्यारोहण हा ऊर्जादायी क्रीडाप्रकार

म. टा. वृत्तसेवा, ठाणे

'सध्या हजारो गिर्यारोहक सह्याद्रीच्या दऱ्याखोऱ्यांत भ्रमंती करत असतात. आधुनिक काळात गिर्यारोहण हा साहसी खेळ मनुष्याला शारीरिक आणि मानसिकदृष्ट्या सदृढ ठेवतो, हा ऊर्जादायी प्रकार आहे,' असे मत छत्रपती पुरस्कार विजेते गिर्यारोहक व अखिल महाराष्ट्र गिर्यारोहण संस्थेचे अध्यक्ष उमेश झिरपे यांनी व्यक्त केले.

जिज्ञासा ट्रस्ट आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज यांच्या वतीने आयोजित नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत 'गिर्यारोहणाचे शास्त्रोक्त शिक्षण, कौशल्य विकासाचे साधन' या विषयावरील चर्चासत्रात ते बोलत होते. यावेळी जिज्ञासा ट्रस्टचे सुरेंद्र दिघे, तज्ज्ञ गिर्यारोहक विवेक शिवदे, आशीष साने, निकुंज शाह, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजचे सचिव कमलेश प्रधान, उपप्राचार्या मंजिरी गोंधळे आदी उपस्थित होते.

## ज्येष्ठ गिर्यारोहक उमेश झिरपे यांचे मत

### पावसाळ्यात काळजी घ्या

पावसाळी भटकंती करताना, अनेक जण गडकिल्ले तसेच धबधब्यांच्या ठिकाणी अडकून पडल्याच्या घटना घडल्या आहेत. निसरड्या वाटेवरून पाय घसरल्यामुळे काहींचा मृत्यू झाला. पावसाळ्यामध्ये सह्याद्रीचे वातावरण ट्रेकसाठी उत्साहाचे असते, मात्र भटकंती करताना काळजी घेणे महत्त्वाचे आहे, याकडे उमेश झिरपे यांनी लक्ष वेधले.

नवीन शैक्षणिक धोरणाअंतर्गत 'गिर्यारोहणाचे शास्त्रोक्त शिक्षण, कौशल्य विकासाचे एक साधन' या विषयावर बोलताना झिरपे म्हणाले, 'गिर्यारोहण हा एक खेळ आणि जीवनशैलीही आहे. एव्हरेस्टसह २८ हजार फुटांवरील आठ उत्तुंग शिखरे सर करताना अनेक आव्हानांना सामोरे जावे लागले. मात्र पर्वतांवरील चढाई माणसाचे आयुष्य बदलते. हा ऊर्जादायी क्रीडाप्रकार असून या क्षेत्रात करिअर करण्यासाठी पुणे विद्यापीठाच्या मान्यतेनुसार अभ्यासक्रम तयार करण्यात आला आहे. सध्या नव्या शैक्षणिक धोरणामध्येही गिर्यारोहण अभ्यासक्रमाचा समावेश करण्यात आला आहे. त्यामुळे भविष्यात गिर्यारोहण हा क्रीडाप्रकार महत्त्वाचा ठरणार आहे.'

'गिर्यारोहण या क्रीडाप्रकारात प्रतिस्पर्धी हा निसर्ग आहे. या खेळातही नियमांची बंधने आहेत. हा गिर्यारोहणाचा अभ्यासक्रम छंद म्हणून बघा,' असा मंत्र सुरेंद्र दिघे यांनी दिला.

पुढारी ठाण

ठाणे, मंगळवार, १६ जुलै २०२४

# सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेजचे उपप्राचार्य डॉ. दिनेश जोशी

डॉ. दिनेश जोशी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे



उपप्राचार्य आहेत. केवळ महाविद्यालयीन अध्ययनातच नाही तर डॉ. जोशी यांचा राष्ट्रीय आणि राज्य पातळीवर समित्या आणि चर्चा सत्राच्या आयोजनात त्यांचा सहभाग असतो. ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत विद्यार्थ्यांना आणि पालकांना ते योग्य पध्दतीने ते मार्गदर्शन करतात.११वी वर्ग ऑनलाइन प्रवेश समितीत ते कार्यरत आहेत.

ठाणे आणि मुंबई येथील शाळा प्रमुखांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत बाबत ते मार्ग दर्शन करतात. पालक आणि विद्यार्थ्यांना ऑनलाईन प्रवेश प्रक्रियेत येणाऱ्या समस्यांचे ते निराकारण करतात.कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य, प्राचार्य आणि तांत्रिक कर्मचार्यांना ते प्रशिक्षण देतात.११वी आणि १२वी वर्ग भौतिकशास्त्र पाठ्यपुस्तकांसाठी लेखक म्हणून बालभारती (पुणे ) त्यांचे योगदान आहे. राज्य पाठ्यक्रम आराखडा (SCF) तयार करण्यासाठी ३री ते १२वी वर्गाच्या समितीमध्ये नियुक्त आणि राज्य स्तरावर राष्ट्रीय शैक्षणिक धोरण (NEP) लागू करण्यासाच्या कार्यात डॉ. जोशी यांचे योगदान आहे. विद्याभारतीच्या कोकण प्रांताच्या मुलभूत स्तर शिक्षक आणि संस्थेच्या पदाधिकार्यांसाठीह ते सत्रांचे आयोजन करतात. राष्ट्रीय शैक्षणिक धोरण २०२० (NEP 2020) राष्ट्रीय शैक्षणिक धोरणाबाबत जनजागृती करण्यासाठी आणि गैरसमज दूर करण्यासाठी विविध प्लॅटफॉर्मवर (शाळा, हाउसिंग सोसायट्या, महाविद्यालये आणि ऑनलाइन पोर्टल) सेमिनार आणि ओरिएंटेशनही ते आयोजित करतात. विज्ञान क्विझ आणि प्रदर्शन, राज्य सरकारने आयोजित केलेल्या INSPIRE पुरस्कारासाठी परीक्षक म्हणून त्यांनी काम पाहिले आहे.अशा या अष्टपैलु काम करणाऱ्या व्यक्तीमत्वाचा गौरव हा सेवेचा गौरव आहे.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
बुधवार,
१७ जुलै २०२४

# ज्ञानसाधना महाविद्यालयाचे वृक्षारोपण

शाळा-जगत



**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजना, राष्ट्रीय छात्र सेना, नागरी संरक्षण दल आणि क्रीडा समिती या विभागातील विद्यार्थ्यांच्यावतीने वृक्षारोपण करण्यात आले. येऊर येथील पाटील पाडा, पाटवन पाडा येथे हा वृक्षारोपण उपक्रम पार पडला.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्यावतीने दरवर्षी वृक्षारोपण मोहिम राबविली जाते. या मोहिमेत ६० विद्यार्थी आणि ७ प्राध्यापक सहभागी झाले होते. त्यांनी एकूण ५० वृक्षांचे रोपण केले. राष्ट्रीय सेवा योजनेचे स्वयंसेवक रुची ठुकरुल, तेजश्री साळुंके ,सौमिल आठवले, सुयोग आणि कृष्णा आरुडे, कनिष्ठ पर्यवेक्षक सुरेश हलबांडगे यांचाही यात सहभाग होता.

संजय गांधी राष्ट्रीय उद्यान येऊर येथील वनपरिमंडळ अधिकारी रमाकांत मोरे, वनरक्षक बाळू शेळके, वनसेवक विनोद ठाकूर यांचे या उपक्रमास सहकार्य होते. प्रा.शंकर झंजे, प्रा.महेश कुलसंगे, डॉ.मनोज वाघ, प्रा.स्मिता परब आदींचा यात सहभाग होता. प्राचार्य डॉ. गणेश भगुरे, उपप्राचार्य सीताराम वाहुळे, पर्यवेक्षक राजेंद्र वेखंडे यांच्या मार्गदर्शनाखाली हा उपक्रम पार पडला.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई । मंगळवार, २३ जुलै २०२४

# कट ऑफ पहिल्या यादीपेक्षा चढा

## अकरावी प्रवेश; तिसरी यादी जाहीर

चित्र : एआय



### पहिल्या व तिसऱ्या यादीतील तुलनात्मक कट ऑफ (टक्क्यांत)

| कॉलेज | पहिली फेरी | | | तिसरी फेरी | | |
|---|---|---|---|---|---|---|
| | आर्ट्स | कॉमर्स | सायन्स | आर्ट्स | कॉमर्स | सायन्स |
| झेविअर्स | ९३.४ | ८९.२ | ९१.६ | ९७.२ | ८८.४ | ९२.०० |
| केसी | ८६.०० | ९१.४ | ८७.६ | ८७.८ | ९१.८ | ८७.६ |
| रूईया | ९२.२ | - | ९३.४ | ९३.४ | - | ९५.४ |
| पोदार | - | ९४.४ | - | - | ९२.०० | - |
| रूपारेल | ८५.८ | ९०.६ | ९१.८ | ८७.०० | ९०.२ | ९२.४ |
| साठ्ये | ८१.०० | ८९.२ | ९०.६ | ८०.८ | ८९.४ | ९१.८ |
| डहाणूकर | - | ९०.८ | - | - | ९०.२ | - |
| भवन्स (अंधेरी) | ८२.६ | ८९.८ | ८५.४ | ७८.४ | ८९.६ | ८९.८ |
| वझे-केळकर | ८८.४ | ९२.४ | ९२.८ | ९२.२ | ९२.६ | ९६.२ |
| एमसीसी | - | ९२.०० | - | - | ९२.८ | - |
| सीएचएम | ६२.२ | ८३.८ | ९० | ७३.०० | ८५.६ | ९०.६ |
| फादर ॲग्नल | - | ८७.०० | ९३.८ | - | . ८६.६ | ९७.६ |
| ज्ञानसाधना | ५०.४ | ७६.६ | ८८.६ | ६३.०० | ७७.४ | ८३.०० |
| बिर्ला | ८६.८ | ९०.८ | ९३.०० | ९४.०० | ९३.३ | ९३.८ |

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

अकरावी ऑनलाइन प्रवेश प्रक्रियेची तिसरी यादी सोमवारी सकाळी जाहीर झाली. पहिल्या यादीत प्रथम प्राधान्याचे महाविद्यालय मिळूनही प्रवेश न घेतलेले १४ हजारांपेक्षा जास्त विद्यार्थी या फेरीत समाविष्ट झाले होते. त्यांच्या चढ्या टक्केवारीमुळे तिसऱ्या यादीचा कट ऑफ वर गेला आहे. त्यामुळे पहिल्या यादीच्या तुलनेत या फेरीत तरी महाविद्यालयांचा कट-ऑफ खाली येईल, या अपेक्षेत असलेल्या विद्यार्थी व पालकांचा यावेळीही भ्रमनिरास झाला आहे.

अकरावी ऑनलाइन प्रवेशाच्या पहिल्या यादीत ५५ हजार ६३८ जणांना पहिल्या पसंतीचे कॉलेज मिळाले होते. त्यापैकी १५९ जणांनी प्रवेश नाकारला, तर ३६६ जणांनी प्रवेश घेऊन रद्द केला. काहीच प्रतिसाद न दिलेल्या विद्यार्थ्यांची संख्या १३ हजार ६७७ एवढी होती. हे तब्बल १४ हजार विद्यार्थी दुसऱ्या फेरीतून बाद झाले आणि त्यांनी तिसऱ्या फेरीसाठी नोंदणी केली. याचा परिणाम तिसऱ्या यादीच्या कट ऑफवर झाला. तिसऱ्या फेरीत मुंबईतील मोठ्या महाविद्यालयांतील कट ऑफ पहिल्या आणि दुसऱ्या फेरीच्या तुलनेत वाढला आहे. पहिल्या फेरीत आर्ट्ससाठी झेविअर्स ९३.४, रूईया ९२.२ टक्के, वझे-केळकर ८८.४ टक्के आणि बिर्लामहाविद्यालयाचा कट ऑफ ८६.८ टक्के होता. तिसऱ्या फेरीत या महाविद्यालयांचा कट ऑफ अनुक्रमे ९७.२, ९३.४, ९२.२ आणि ९४ टक्के आहे. प्रत्येक महाविद्यालयाच्या टक्केवारीत किमान एक ते कमाल आठ टक्क्यांची वाढ झाली आहे.

लोकमत
epaper.lokmat.com
मुंबई, रविवार, दि. २८ जुलै २०२४

# वीर जवानांमुळे देश अबाधित : डॉ. भगुरे

## विजय दिवसानिमित्त शहिदांना श्रद्धांजली

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** देशाचे हे वीर जवान सीमेवर सतर्क आहेत, म्हणून आपला देश अबाधित आहे. आपल्याला मिळालेले स्वातंत्र्य हे खूप मेहनतीने मिळालेले आहे. त्याचे रक्षण करणे ही आपली जबाबदारी आहे, असे प्रतिपादन प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी केले.

देशाच्या संरक्षणासाठी प्राणांची आहुती देणाऱ्या शहीद वीर जवानांच्या आठवणींना उजाळा देण्यासाठी २६ जुलै हा दिवस संपूर्ण भारतात मोठ्या उत्साहाने साजरा केला जातो. यानिमित्त शुक्रवारी राष्ट्रीय छात्र सेना (मुले व मुली) युनिटच्या वतीने 'कारगिल विजय दिवस' पी. सावळाराम सभागृह येथे झाला. यावेळी डॉ. भगुरे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

### आठवणींना उजाळा

याप्रसंगी संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी उपस्थित राहून शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. यावेळी कारगिल युद्धात शहीद झालेल्या जवानांच्या आठवणींना उजाळा देण्यात आला. या कार्यक्रमात वरिष्ठ महाविद्यालयाच्या उपप्राचार्य डॉ. मंजिरी गोंधळेकर, प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र वेखंडे, शिक्षकेतर कर्मचारी यांनी सहभाग घेतला. कार्यक्रमात राष्ट्रीय छात्र सेनेचे आजी व माजी असे एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते.

कार्यक्रमाच्या नियोजनात लेफ्टनंट दिलीप वसावे, डॉ. सोनाली कोकणे यांनी मोलाची भूमिका बजावली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन कॅडेट सोनम यादव हिने केले, तर कॅडेट रौनक गुप्ता याने आभार मानले.

सकाळ

मुंबई, मंगळवार, ३० जुलै २०२४

# ज्ञानसाधना महाविद्यालयात कारगिल दिन साजरा

ठाणे, ता. २९ (वार्ताहर) : राष्ट्रीय छात्र सेनेच्या मुले आणि मुलींच्या युनिटने ज्ञानसाधना महाविद्यालयात कारगिल विजय दिवस शुक्रवारी (ता. २६) पी. सावळाराम सभागृहात साजरा केला. या कार्यक्रमादरम्यान अनेकांना गौरवण्यात आले आहे. कार्यक्रमात प्राचार्य गणेश भगुरे यांनी शहीद झालेल्या जवानांच्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेचे सचिव कमलेश प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी शहीद जवानांना श्रद्धांजली अर्पण केली. राष्ट्रीय छात्र सेनेच्या विद्यार्थ्यांनी गार्ड ऑफ हॉनर, शोक शस्त्र आणि शहीद जवानांच्या जीवनावर आधारित पथनाट्य सादर करून त्यांना श्रद्धांजली अर्पण केली. याप्रसंगी उपप्राचार्य डॉ. मंजिरी गोंधळेकर, महाविद्यालयातील इतर प्राध्यापक, कनिष्ठ महाविद्यालयाचे पर्यवेक्षक प्रा. राजेंद्र वेखंडे, शिक्षकेतर कर्मचारी, राष्ट्रीय छात्र सेनेचे आजी व माजी असे एकूण ६५ विद्यार्थी उपस्थित होते. कार्यक्रमाच्या नियोजनात लेफ्टनंट दिलीप वसावे व डॉ. सोनाली कोकणे यांनी मोलाची भूमिका बजावली. सूत्रसंचालन कडेट सोनम यादव हिने केले, तर आभार कॅडेट रौनक गुप्ता यांनी मानले.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

गुरुवार,
१ ऑगस्ट २०२४

# ज्ञानसाधना महाविद्यालयात गुरुवंदना विषयावर व्याख्यान




**ठाणे :** गुरू म्हणजे एक संस्कार आहे. गुरूंनी दिलेला उपदेश, शिकवण यामुळे विद्यार्थ्यांची जडणघडण योग्य दिशेने होत असते. गुरूचे प्रत्येकाच्या जीवनात अनन्यसाधारण महत्त्व आहे. शालेय जीवनातील गुरूंनी दिलेले संस्कार विसरता येत नाहीत. गुरू म्हणजे शिक्षक, मित्र -मैत्रिणी अथवा एखादा अनुभवही असू शकतात, असे प्रतिपादन प्रा. पल्लवी देशपांडे यांनी केले. ज्ञानसाधना महाविद्यालयात 'गुरुवंदना' या विषयावर बोलताना त्यांनी मत व्यक्त केले.

ठाणे येथील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात राष्ट्रीय सेवा योजना आणि शिस्तपालन समितीच्या वतीने गुरू-शिष्य नात्यावर आधारित विशेष कार्यक्रम आयोजित करण्यात आला होता. यावेळी प्रा. पल्लवी देशपांडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाच्या नियोजनात राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी प्रा.शंकर झंजे, प्रा.महेश कुलसंगे आणि स्मिता परब, शिस्तपालन समितीप्रमुख प्रा.निषाद पवार, प्रा.प्रल्हाद सोनावणे, प्रा. अभिषेक सोनावणे यांचा सहभाग होता. या कार्यक्रमात ७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM | ठाणे | मंगळवार, ६ ऑगस्ट २०२४

# ६५ हजार विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे महाविद्यालय

## अकरावीची पहिली विशेष प्रवेश यादी जाहीर

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** शैक्षणिक वर्ष २०२४-२५ अंतर्गत मुंबई महानगरक्षेत्रातील अकरावी प्रवेशाची पहिली विशेष प्रवेश यादी सोमवारी जाहीर करण्यात आली असून त्यात विविध महाविद्यालयांतील १ लाख ९७ हजार ६४८ जागांसाठी १ लाख ३ हजार १५४ विद्यार्थ्यांनी अर्ज केले होते. त्यापैकी ९० हजार ४०० विद्यार्थ्यांना महाविद्यालय देण्यात आले. पहिल्या विशेष फेरीत अर्ज केलेल्या १२ हजार ७५४ विद्यार्थ्यांना महाविद्यालय मिळण्याची प्रतीक्षा आहे. तब्बल ६५ हजार ५०१ विद्यार्थ्यांना पहिल्या पसंतीचे, १० हजार ७३३ विद्यार्थ्यांना दुसऱ्या पसंतीचे आणि ५ हजार २९२ विद्यार्थ्यांना तिसऱ्या पसंतीचे महाविद्यालय देण्यात आले आहे.

पहिल्या तीन नियमित प्रवेश फेऱ्यांच्या तुलनेत नामांकित महाविद्यालयांतील प्रवेश पात्रता गुण हे (कट ऑफ) नव्वदीच्या उंबरठ्यावरच राहिले होते. मात्र, पहिल्या विशेष प्रवेश फेरीत नामांकित महाविद्यालयातील प्रवेश पात्रता गुणांत मोठी घट झाली आहे. कला शाखेसाठीच्या प्रवेश पात्रता गुणांत ५ ते ७ टक्के, वाणिज्य शाखेसाठीच्या प्रवेश पात्रता गुणांत २ ते ३ टक्के आणि विज्ञान शाखेसाठीच्या प्रवेश पात्रता गुणांमध्ये ४ ते ५ टक्क्यांची घट झालेली आहे. सर्व जागांवर प्रवेश निश्चित झाल्यामुळे काही महाविद्यालयांची संबंधित शाखांसाठीची पहिली विशेष प्रवेश यादी जाहीर झालेली नाही.

पहिल्या विशेष प्रवेश फेरीनुसार केंद्रीय प्रवेश प्रक्रिया आणि संस्थात्मक, अल्पसंख्यांक, व्यवस्थापन कोटाअंतर्गत महाविद्यालय मिळालेल्या विद्यार्थ्यांना ८ ऑगस्ट रोजी सायंकाळी ६ वाजेपर्यंत प्रवेश निश्चित करता येतील. विद्यार्थ्यांना मिळालेल्या महाविद्यालयांत प्रवेश निश्चित करायचा असल्यास स्वतःच्या लॉगिनमधील 'अपलोड रिक्वॉयर्ड डॉक्युमेंट्स' या पर्यायावर क्लिक करून कागदपत्रे अपलोड करावीत आणि 'प्रोसिड फॉर ॲडमिशन' या पर्यायावर क्लिक करून संबंधित महाविद्यालयांत जाऊन प्रवेश निश्चित करावा.

### शाखानिहाय उपलब्ध जागा आणि निवड झालेले विद्यार्थी

| शाखा | उपलब्ध जागा | निवड झालेले विद्यार्थी |
|---|---|---|
| कला | २८ हजार ५०७ | ७ हजार २५० |
| वाणिज्य | १ लाख ३ हजार ४०९ | ४८ हजार १८७ |
| विज्ञान | ६२ हजार ७३१ | ३४ हजार १४५ |
| व्यवसायाभिमुख अभ्यासक्रम | ३ हजार १ | ८१८ |
| एकूण | १ लाख ९७ हजार ६४८ | ९० हजार ४०० |

### पहिल्या विशेष प्रवेश फेरीअंतर्गतचे प्रवेश पात्रता गुण (तिसऱ्या नियमित फेरीचे पात्रता गुण)

- एच. आर महाविद्यालय, चर्चगेट : वाणिज्य शाखा ९६.६ टक्के (९७.२ टक्के)
- सेंट झेविअर्स महाविद्यालय, फोर्ट : वाणिज्य शाखा ८६.६ टक्के (८८.४ टक्के), विज्ञान शाखा ८७.२ टक्के (९२.०० टक्के)
- के. सी. महाविद्यालय, चर्चगेट : कला शाखा ७२.२ टक्के (८७.८ टक्के), वाणिज्य शाखा ८८.८ टक्के (९१.८ टक्के), विज्ञान शाखा ७३.२ टक्के (८७.६ टक्के)
- जय हिंद महाविद्यालय, चर्चगेट : कला शाखा ७०.६ टक्के (९२.२ टक्के), वाणिज्य शाखा ८८.६ टक्के (९२.०० टक्के), विज्ञान शाखा ७३.६ टक्के (८८.४ टक्के)
- रुईया महाविद्यालय, माटुंगा : कला शाखा ९१.४ टक्के (९३.४ टक्के), विज्ञान शाखा ९२.४ टक्के (९५.४ टक्के)
- बी. एन. बांदोडकर विज्ञान महाविद्यालय, ठाणे : विज्ञान शाखा ९१.२ टक्के (९४.२ टक्के)
- सी. एच. एम महाविद्यालय, उल्हासनगर : कला शाखा ३५.६ टक्के (७३.०० टक्के), वाणिज्य शाखा ८३.८ टक्के (८५.६ टक्के), विज्ञान शाखा ८६.२ टक्के (९०.६ टक्के)
- फादर अग्नेल मल्टीपर्पज महाविद्यालय, वाशी : वाणिज्य शाखा ७८.०० टक्के (८६.६ टक्के), विज्ञान शाखा ९१.८ टक्के (९७.६ टक्के)
- सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे : कला शाखा ६५.६ टक्के (६३.०० टक्के), वाणिज्य शाखा ७६.०० टक्के (७७.४ टक्के), विज्ञान शाखा ८१.६ टक्के (८३.०० टक्के)
- बी.के.बिर्ला महाविद्यालय, कल्याण : कला शाखा ८३.८ टक्के (९४.०० टक्के), वाणिज्य शाखा ८७.६ टक्के (९३.२ टक्के), विज्ञान शाखा ९२.४ टक्के (९३.८ टक्के)

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई | बुधवार, १४ ऑगस्ट २०२४ | ६

# अकरावीची दुसरी विशेष यादी जाहीर

म. टा. खास प्रतिनिधी, मुंबई

## अनेक कॉलेजांमध्ये जागा भरल्याने प्रवेश बंद

- २७ हजार ६३९ विद्यार्थ्यांना प्रवेश
- नामांकित कॉलेजांच्या कट-ऑफमध्येही घसरण
- प्रवेश घेण्यासाठी १६ ऑगस्टपर्यंतची मुदत

अकरावी ऑनलाइन प्रवेशाच्या दुसऱ्या विशेष फेरीची यादी जाहीर झाली असून त्यात २७ हजार ६३९ विद्यार्थ्यांना प्रवेश मिळाले आहेत. या फेरीसाठी ३५ हजार २८ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. काही कॉलेजांमधील विविध शाखांमध्ये जागा आधीच भरल्याने या कॉलेजांमधील प्रवेश बंद झाले आहेत. त्यामुळे आता अकरावी ॲडमिशन प्रक्रिया हातघाईवर आली आहे. विशेष म्हणजे, अनेक नामांकित कॉलेजांची कट-ऑफ चार ते पाच टक्क्यांनी घसरल्याने अनेक विद्यार्थ्यांचा प्रवेशाचा मार्ग सुकर झाला आहे. आता यादीत नाव आलेल्या २७ हजार ६३९ जणांना १६ ऑगस्टपर्यंत प्रवेश घेता येतील.

दुसऱ्या विशेष फेरीसाठी एक लाख ३४ हजार ९१२ जागा शिल्लक होत्या. त्या जागांसाठी ३५ हजार ०२८ विद्यार्थ्यांनी अर्ज दाखल केले होते. त्यापैकी २७ हजार ६३९ विद्यार्थ्यांना कॉलेज अलॉट झाले. त्यामुळे उरलेल्या सात हजार ३८९ विद्यार्थ्यांच्या प्रवेशाचा तिढा पुढील फेरीत पोहोचणार आहे. या यादीत नाव आलेल्या विद्यार्थ्यांना १६ ऑगस्ट ६ वाजेपर्यंत कॉलेजमध्ये प्रवेश प्रक्रिया पूर्ण करायची आहे.

## दुसऱ्या विशेष यादीतील कट-ऑफ (टक्के)

| कॉलेज | आर्ट्स | कॉमर्स | सायन्स |
|---|---|---|---|
| झेविअर्स कॉलेज | ८५ | ८६.२ | ८३ |
| केसी कॉलेज | ८०.६ | ८७.६ | ७६ |
| रुइया कॉलेज | ६६.८ | -- | ७९ |
| पोदार कॉलेज | -- | -- | -- |
| रुपारेल कॉलेज | ८० | ८५.८ | ८८ |
| साठ्ये कॉलेज | ६९.४ | ८५.४ | ८३.८ |
| डहाणूकर | -- | -- | -- |
| भवन्स कॉलेज, (अंधेरी) | -- | ८३.६ | ७९ |
| वझे-केळकर कॉलेज | -- | -- | ९० |
| एमसीसी | -- | -- | -- |
| सीएचएम कॉलेज | ३६.४ | ८२.२ | ८८.४ |
| फादर ॲग्नल कॉलेज | -- | ७८ | -- |
| ज्ञानसाधना कॉलेज | ५०.२ | ७६.२ | ७९.२ |
| बिर्ला कॉलेज | ६१.४ | ७३.८ | ७५.६ |

## 'या' कॉलेजांमध्ये प्रवेश पूर्ण

यादीत असलेल्या कॉलेजांपैकी अनेक कॉलेजांमधील आर्ट्स, कॉमर्स शाखांचे प्रवेश पूर्ण झाले आहेत. त्यामुळे कॉमर्स शाखेसाठी पोदार कॉलेज, डहाणूकर कॉलेज, वझे-केळकर कॉलेज, मुलुंड कॉलेज ऑफ कॉमर्स या कॉलेजांमध्ये विद्यार्थ्यांना आता प्रवेश मिळणार नाही. त्याशिवाय आर्ट्स शाखेसाठी भवन्स कॉलेज (अंधेरी), एन. एम. कॉलेज, वझे-केळकर कॉलेज या कॉलेजांमधील प्रवेश पूर्ण झाले आहेत.

महाराष्ट्र टाइम्स

मुंबई | बुधवार, ४ सप्टेंबर २०२४ | edit.mtonline.in

# 'ज्ञानसाधना'चा वर्धापन दिन



ठाणे : ज्ञानसाधना, ठाणे सोसायटी या संस्थेचा ४४वा वर्धापनदिन संस्थेच्या सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात साजरा करण्यात आला.

खासदार नरेश म्हस्के, मुरबाडचे तहसीलदार संदीप आवारी हे कॉलेजचे दोन माजी विद्यार्थी प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. यावेळी विद्यार्थ्यांच्या कला आणि साहित्य गुणांना व्यासपीठ देणाऱ्या इंग्रजी विभागाचे नियतकालिक 'आकार'चे प्रकाशन करण्यात आले. प्राचार्य गणेश भगुरे सर यांनी प्रास्ताविक केले. नरेश म्हस्के, तहसीलदार संदीप आवारी यांनी त्यांच्या भाषणातून महाविद्यालयीन जीवनातील आठवणींना उजळा दिला.

# मुलांनी मैदानात खेळले पाहिजे : डॉ. प्रदीप ढवळ

**ठाणे :** काळ झपाट्याने बदलत आहे, विज्ञानाने प्रचंड प्रगती केली आहे. आपल्या मुलांवर सतत वाचनाचे संस्कार झाले पाहिजेत, तसेच मुलांनी मैदानात खेळले पाहिजे. दुर्दैवाने मार्कांची भूक लागली आहे पण ज्ञानाची तहान विसरले आहेत. पुढच्या काळात पदवीपेक्षा तुमच्यात किती कौशल्य आहे हे पाहिले जात आहे. आम्ही cycle प्रेमी फाऊंडेशनमुळे तुम्हाला स्व ची ओळख होते, असे प्रतिपादन ज्येष्ठ साहित्यिक डॉ. प्रदीप ढवळ यांनी केले.



आम्ही cycle प्रेमी फाऊंडेशनच्यावतीने सायकल या विषयावर वक्तृत्व, निबंध आणि चित्रकला स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचे परीक्षण रविवार 25 ऑगस्ट रोजी मो. ह. विद्यालय येथे तर पारितोषिक वितरण सोहळा रविवार 1 सप्टेंबर रोजी सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय येथे संपन्न झाला. कार्यक्रमाचे प्रमुख पाहुणे म्हणून डॉ. ढवळ पुढे म्हणाले की, सायकल विषयावर लिहिणे खूप अवघड आहे. पण या स्पर्धेत मुलांनी सहभाग घेतला याबद्दल त्यांचे कौतुक आहे. स्वतःच मुले घडत जातील. हवे ते छंद त्यांना जोपासू द्या, आपली मुले प्रज्ञावंत कशी होतील असे पुरक वातावरण त्यांना द्या, असा सल्ला त्यांनी पालकांना दिला. सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे सचिव कमलेश प्रधान यांनी या स्पर्धेच्या आयोजकांचे कौतुक करताना सांगितले की, सायकलवर अशा स्पर्धा घेणे ही संकल्पनाच खूप चांगली आहे आणि मुलांचा उत्साह हा वाखणण्याजोगा आहे. मोबाईलवर सायकल न चालवता प्रत्यक्षात सायकल चालवा असा कानमंत्रही त्यांनी दिला.

यावेळी व्यासपीठावर संस्थेचे विश्वस्त विकास धनवडे, सचिव दिपेश दळवी उपस्थित होते. पाचवी ते सातवी, आठवी ते दहावी, अकरावी व बारावी आणि खुला गट या चार गटात या तिन्ही स्पर्धा घेण्यात आल्या. या तिन्ही स्पर्धांमध्ये मिळून एकूण 670 स्पर्धकांनी भाग घेतला. 46 स्पर्धक विजेते झाले. स्पर्धेचे प्रास्ताविक संस्थापिका अध्यक्षा प्रज्ञा म्हात्रे, आभार प्रदर्शन स्पर्धेचे समन्वयक डॉ. प्रतिक्षा बोर्डे तर सुत्रसंचालन अजय नाईक यांनी केले. परीक्षक म्हणून प्रा. दीपा ठाणेकर, प्रा. सुनिल भुसारा, दिनेश जाधव, प्रा. संगीता बावीस्कर, अस्मिता येंडे, तुळशीदास वाघ यांनी काम पाहिले. विशेष म्हणजे चित्रकला स्पर्धेत आदिवासी शाळांतील आणि कर्णबधीर मुलांनी देखील सहभाग घेतला होता.

स्पर्धेत उल्लेखनीय सहभाग मो. ह. विद्यालयाने घेतला. वक्तृत्व स्पर्धेत पाचवी ते सातवी गटातून अनय पोतनीस प्रथम, शिवाली तावडे हिने द्वितीय, इशा बोरे तृतीय तर यश बोरघरे याने उत्तेजनार्थ पारितोषिक पटकावले. आठवी ते दहावी गटातून वर्जेश्वरी बन हिने प्रथम क्रमांक, उत्कर्षा पाटील द्वितीय क्रमांक, राज कोकरे याने तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता अकरावी - बारावी गटातून सृष्टी रमेश दळवी हिने प्रथम क्रमांक तर खुल्या गटातून तन्मय भुसारा प्रथम क्रमांक, चंद्रशेखर जगताप यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

चित्रकला स्पर्धेत पाचवी ते सातवी गटातून राज एकवडे याने प्रथम, श्रेया सागर हिने द्वितीय, अनन्या घागस हिने तृतीय क्रमांक तर आठवी ते दहावीच्या गटातून राजा विश्वास याने प्रथम, गायत्री एकवडे द्वितीय, अलिफिया वसीम अहमद अन्सारी तृतीय क्रमांक पटकावला. इयत्ता अकरावी - बारावी गटातून श्रेया कांबळे हिने प्रथम, अमर वाघमारे याने द्वितीय तर खुल्या गटातून लतिक गोलतकर याने प्रथम, साईश जी. म्हात्रे यांनी द्वितीय क्रमांक पटकावला.

निबंध स्पर्धेत पाचवी ते सातवी गटातून नविका वराडकर हिने प्रथम, आरव गायकवाड द्वितीय, हर्षाली मोडक हिने तृतीय, आठवी ते दहावी गटातून स्वराली मोरे हिने प्रथम क्रमांक, अथर्वा बिले द्वितीय, कस्तुरी निक्ते तृतीय क्रमांक तसेच इयत्ता अकरावी - बारावी गटातून जान्हवी काळभोर हिने प्रथम, श्रावणी पाटील हिने द्वितीय क्रमांक पटकावला. त्याचप्रमाणे खुल्या गटातून कौस्तुभ गोसावी प्रथम क्रमांक, लतिक गोलतकर द्वितीय क्रमांक आणि ज्येष्ठ नागरिक गटातून प्रकाश मुंडले यांनी प्रथम क्रमांक पटकावला.

शनिवार, ७ सप्टेंबर २०२४
लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# ज्ञानसाधना महाविद्यालयाचे यश

**ठाणे :** जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यक्रम ठाणे अंतर्गत राष्ट्रीय क्रीडा दिनाचे औचित्य साधून जिल्हास्तरीय २०२२-२३ या शैक्षणिक वर्षात सांघिक क्रीडा स्पर्धांचे आयोजन करण्यात आले होते. या स्पर्धांचा पारितोषिक वितरण सोहळा नुकताच पार पडला. यावेळी ज्ञानसाधना महाविद्यालयाने विविध सांघिक खेळांमध्ये पारितोषिके पटकावली. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील संघाना प्रथम, द्वितीय, तृतीय अशी अनेक बक्षिसे मिळाली. यामध्ये बॅडमिंटन (१९ वर्षे मुली) तृतीय क्रमांक, हॅन्डबॉल (१९ वर्षे मुले) तृतीय क्रमांक, कबड्डी (१७ वर्षे मुले) प्रथम क्रमांक, तसेच कबड्डी १९ वर्षे गटात मुले-मुली प्रथम क्रमांक मिळवला. खो-खो (१९ वर्षे मुले-मुली) प्रथम आणि द्वितीय क्रमांक मिळवला. व्हॉलीबॉल (१९ वर्षे मुले-मुली) द्वितीय क्रमांक पटकावला. खेळाडूंना क्रीडाशिक्षक क्रीडा प्रमुख अरुणा केंद्रे, मधुकर पिसाळ, प्रल्हाद खेतले यांनी मार्गदर्शन केले.

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । रविवार, १७ नोव्हेंबर २०२४

महाराष्ट्र टाइम्स



# दर्जेदार शैक्षणिक सुविधा, रोजगाराची हमी द्या!

## ‘महाराष्ट्र टाइम्स’च्या ‘मटा जाहीरनामा’मध्ये नवमतदार युवकांची मागणी



(गणेश जाधव)

श्रीकांत सावंत/जान्हवी पाटील
Shrikant.sawant@timesgroup.com

ठाणे : बेरोजगारीवर मात करण्यासाठी चांगली रोजगारनिर्मिती, शिक्षणाची गुणवत्ता सुधारण्यासाठी सुस्पष्ट धोरण आणि शैक्षणिक सुविधांमध्ये वाढ करणे आवश्यक आहे. तसेच सुरळीत वाहतूक, महिलांना सुरक्षित वातावरण आणि शहराची स्वच्छता यांसारख्या महत्त्वाच्या मुद्द्यांवर सरकारने लक्ष देण्याची गरज आहे. तरुणांच्या प्रगतीसाठी दर्जेदार शैक्षणिक सुविधा आणि चांगल्या रोजगारसंधींची हमी देणाऱ्या पक्षांनाच नवी पिढी स्वीकारेल, अशी भूमिका ठाण्यातील नवमतदार युवकांनी ‘महाराष्ट्र टाइम्स’ आयोजित ‘मटा जाहीरनामा’ या चर्चासत्राच्या माध्यमातून व्यक्त केली. सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालाच्या सभागृहात आयोजित या उपक्रमामध्ये जिल्ह्यातील विविध भागांतील युवा मतदारांनी सहभाग घेतला होता.

### भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक सरकार हवे!

बेरोजगारीची समस्या दिवसेंदिवस गंभीर होत चालली आहे. तरुणांना त्यांच्या शिक्षणाच्या गुणवत्तेनुसार योग्य नोकऱ्या मिळत नाहीत. त्यामुळे त्यांना रोजगाराच्या नवीन संधी उपलब्ध करून देणे ही सरकारची जबाबदारी आहे. तसेच शिक्षणाचा दर्जा सुधारण्याची गरज आहे. सर्वसामान्यांना परवडणारे आणि दर्जेदार शिक्षण सर्वांना उपलब्ध करून देणे ही काळाची गरज आहे. आरोग्यसेवा सुधारण्यासाठी व्यापक प्रयत्न होण्याबरोबरच सरकारी रुग्णालयांमध्ये डॉक्टरांची संख्या वाढवणे, औषधांचा पुरवठा करणे आणि रुग्णांना चांगल्या दर्जाची सुविधा देणेही आवश्यक आहे. रस्ते, वीज, पाणी आणि स्वच्छता यांसारख्या पायाभूत सुविधाही सुधारण्याची गरज आहे. याशिवाय, तरुणांना भ्रष्टाचारमुक्त आणि पारदर्शक प्रशासन हवे आहे.

### कचरा व्यवस्थापन नेटके हवे



आज शहरातील अनेक ठिकाणी कचरा व्यवस्थापनेकडे दुर्लक्ष केले जात आहे. ठाणे शहराची वाटचाल स्मार्ट सिटीकडे होत असताना, दिवाळीच्या काळात ठाणे शहरातील कचरा ४ दिवस उचलला गेला नाही. त्यामुळे प्रचंड दुर्गंधी पसरली होती. यामुळे आजारालाही निमंत्रण दिले जात आहे. महापालिकेने कचऱ्याचे व्यवस्थापन चोख राबवणे आवश्यक असून, यासाठी लोकप्रतिनिधींचा सहभागही आवश्यक आहे.

**- देवकुमार पटेल**

### स्वच्छतेवर भर द्या



अनेक ठिकाणी शहराचे विद्रुपीकराण करण्यास नागरिकच जबाबदार आहेत. त्यासाठी प्रशासनाने लोकांवरही कारवाई केली पाहिजे. आज डम्पिंगमध्ये जमा होणाऱ्या कचऱ्याचे वर्गीकरण करताना लोकांच्या जिवावर बेतत आहे. त्यासाठी सुशिक्षित लोकांनी घरातच कचऱ्याचे वर्गीकरण केले पाहिजे. तसेच आपला कचरा रस्त्यावर जाणार नाही याची खबरदारीही घेतली पाहिजे.

**- रुची ठुकरुल**

### पुनर्वसन प्रकल्पांना गती मिळावी



ठाणे शहरातील सर्वांत मोठा आणि गंभीर प्रश्न हा रखडलेला पुनर्वसन प्रकल्प आहे. आज अनेक कुटुंबे स्वतःचे घर असूनही भाड्याच्या घरात राहत आहेत. विकासक प्रकल्प हाती घेतो, इमारत पाडतो पण तो प्रकल्प अनेक वर्ष रखडला जातो. यासाठी नव्या सरकारने ठोस कारवाईसाठीचे नियम अंमलात आणणे आवश्यक आहे.

**- सोहम खटकुल**

### निवडणुकीच्या काळातच जनतेचा विचार



निवडणुका जवळ येतात, त्यावेळी राजकारण्यांचे समाजाविषयी प्रेम जागृत होत असते. आज दिव्यांमध्ये अनेक प्रश्न आहेत. मात्र गेल्या अनेक वर्षांपासून ‘जैसे थे’च आहेत. दिव्यातील पाणीप्रश्न असो किंवा पावसाळ्यात दिव्यातील अनेक घरांत शिरणारे पाणी यांसह अनेक प्रश्नासाठी आजही दिवावासी झगडत आहेत. याचा विचार करणारा सक्षम आमदार हवा.

**- तेजश्री साळुंखे**

### बेरोजगारी कमी व्हावी!



बेरोजगारी हा तरुणांसाठी सर्वात मोठा प्रश्न आहे. नवीन सरकारकडून रोजगारनिर्मितीसाठी ठोस पावले उचलण्याची अपेक्षा आहे. गेल्या काही वर्षांत बेरोजगारी खूप वाढली आहे. नोकऱ्या मिळणे कठीण झाले आहे. तंत्रज्ञान क्षेत्रातही अनेक संधी उपलब्ध आहेत, त्यांचा पुरेपूर वापर व्हायला हवा. स्टार्टअपना प्रोत्साहन देणारे धोरण आणले पाहिजे.

**- प्रणीत पेठरे**

### वाहतूक व्यवस्था सुधारली पाहिजे



आज ठाणे शहरात वाहतुकीसाठी टीएमटी सेवा आहे. मात्र, ही बससेवा वेळेत नसल्यामुळे त्याचा त्रास विद्यार्थ्यांना होत आहे. तासन्तास बसच्या प्रतीक्षेत वेळ वाया जातो. युवकांनी पक्षाकडे न पाहता त्या व्यक्तीच्या कामांचा विचार करून मतदान केले पाहिजे. उमेदवारांनी ८० टक्के समाजकारण २० टक्के राजकारण करावे.

**- रचना भोसले**

### लोकांचा सहभाग वाढावा



मी पहिल्यांदाच मतदान करणार आहे. पण एक दडपणही आहे. चुकीचा उमेदवार निवडून आला तर परिसराचे नुकसान आहे. महिलांसाठी लाडकी बहीण योजना चांगली आहे. पण या बहिणींच्या सुरक्षेच्या दृष्टीनेही पावले उचलणे आवश्यक आहे. शहराच्या विकासामध्ये लोकांचाही सहभाग तितकाच महत्त्वाचा आहे.

**- सुजल सनदे**

### समस्यांवर उपाययोजना करा



ठाण्यात दरवर्षी अनेक प्रश्न तेच असतात. पावसाळ्या अनेक ठिकाणी रस्ते खराब असो किंवा अनेक सखल भागांत पाणी साचून ठाणेकरांना त्रास सहन करावा लागणे असो. तसेच विद्यार्थ्यांना प्रवास करण्यास अडचणी निर्माण होतात. या दरवर्षी निर्माण होणाऱ्या सामस्या आहेत. या समस्यांवर उपाययोजना करणारे सरकार हवे.

**- सारथी जामसुठाकर**

### शालेय वयात कायद्याचे शिक्षण हवे



सरळ आणि पारदर्शक प्रशासन हवे आहे. लालफितीचा अडथळा दूर झाला पाहिजे. भ्रष्टाचारावर कठोर कारवाई व्हायला हवी. यासाठी लोकांमध्ये कायद्याची माहिती असणे आवश्यक आहे. म्हणून शालेय वयात संविधान शिकवले पाहिजे. जेणे करून भ्रष्टाचार कमी होऊन राज्याचा विकास होईल आणि तरुणांना रोजगार मिळेल.

**- सौमिल आठवले**

### शिक्षणव्यवस्था भक्कम हवी



दर्जेदार आणि परवडणारे शिक्षण ही देखील एक प्रमुख अपेक्षा आहे. शैक्षणिक धोरणांमध्ये सुधारणा आणि कौशल्य विकासावर भर देण्याची गरज आहे. शासकीय शाळांची गुणवत्ता सुधारावी लागेल. शिक्षकांना योग्य प्रशिक्षण मिळायला हवे. मला आशा आहे की, नवीन सरकार शिक्षणाकडे गांभीर्याने पाहिल. ग्रामीण भागातील शाळांची दुरवस्था दूर करणे गरजेचे आहे.

**- प्रगती भिसे**

### कायद्याची अंमलबजावणी हवी



महिलांच्या सुरक्षेचा प्रश्न अत्यंत महत्त्वाचा आहे. सार्वजनिक ठिकाणी महिलांना सुरक्षित वाटायला हवे. यासाठी कठोर कायदे आणि त्यांची प्रभावी अंमलबजावणी गरजेची आहे. महिलांच्या सुरक्षेच्या दृष्टीने अनेक कायदे आहेत. मात्र, त्यांची अंमलबजावणी होण्यासाठी पावले उचलणे गरजेचे आहे. महिलांवर अत्याचाराच्या घटनांमध्ये १५ ते ३० दिवसांत निवाडा झाला पाहिजे.

**- प्रेम जावळे**

मुंबई तरुण भारत
www.mahamtb.com

मुंबई, शुक्रवार, २० सप्टेंबर २०२४

## ठाण्यात ५८ 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रे'; आज उद्घाटन

**ठाणे** : राज्यामधील नामांकित महाविद्यालयांमध्ये कौशल्य विकास केंद्र स्थापन करून महाविद्यालयीन युवक-युवतींना रोजगारक्षम बनविण्याच्या दृष्टीने प्रमोद महाजन कौशल्य व उद्योजकता विकास अभियान योजनेच्या धर्तीवर एक हजार नामांकित महाविद्यालयांमध्ये 'आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रा'ची स्थापना करण्यात येत आहे. ठाणे जिल्ह्यातील ५८ महाविद्यालयांमध्ये सुरू करण्यात येणाऱ्या या केंद्रांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते शुक्रवार, दि. २० सप्टेंबर रोजी दुपारी १२.३० वा. ऑनलाईन उद्घाटन होणार आहे. या केंद्रांमधून मोफत कौशल्य विकास कोर्सेसचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे. ठाणे जिल्ह्यातील जोशी-बेडेकर महाविद्यालय, ज्ञानसाधना महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, आर. जे. ठाकूर महाविद्यालय, श्रीमती सी. एच. एम. कॉलेज, जीवनदीप कॉलेज, इंदाला आदी महाविद्यालयांचा सहभाग आहे.

# ५८ महाविद्यालयांमध्ये आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्र

## पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते आज ऑनलाईन उदघाटन

**ठाणे:** ठाणे जिल्ह्यातील 58 महाविद्यालयांमध्ये सुरु करण्यात येणाऱ्या आचार्य चाणक्य कौशल्य विकास केंद्रांचे पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते 20 सप्टेंबर 2024 रोजी दुपारी 12.30 वा. ऑनलाईन उद्घाटन होणार आहे. या केंद्रांमधून मोफत कौशल्य विकास अभ्यासक्रमाचे प्रशिक्षण देण्यात येणार आहे.

जिल्ह्यातील जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, आर . जे . ठाकूर महाविद्यालय, श्रीमती सी. एच. एम. कॉलेज, जीवनदीप कॉलेज, इंदाला, इ. महाविद्यालयांचा सहभाग असून 'एआय'सारख्या अत्याधुनिक कौशल्याचा समावेश आहे.

आचार्य चाणक्य कौशल्य

उमेदवारांनी नोंदणी करुन योजनेचा लाभ घ्यावा तसेच 20 सप्टेंबर 2024 रोजी पंतप्रधान यांच्या उपस्थित होणाऱ्या कार्यक्रमास ठाणे जिल्ह्यातील सर्व विद्यार्थ्यांनी तसेच तालुक्यातील नागरिकांनी मोठ्या संख्येने नजिकच्या प्रशिक्षण केंद्राच्या उद्घाटनस्थळी उपस्थित राहावे, असे जाहीर आवाहन जिल्हाधिकारी अशोक शिनगारे यांचेमार्फत करण्यात आले आहे.

कार्यक्रम् स्थळाच्या अधिक माहितीसाठी सहायक आयुक्त, कौशल्य विकास, रोजगार व उद्योजकता मार्गदर्शन केंद्र ठाणे यांचेशी 022 -25428300 या क्रमांकावर संपर्क साधावा, असे आवाहन जिल्हा कौशल्य विकास, रोजगार व अद्योजकता मार्गदर्शन केंद्र ठाणे सहायक आयुक्त संध्या साळुंखे

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई

रविवार, २२ सप्टेंबर २०२४

# ठाण्यातील ५८ कॉलेजांत चाणक्य केंद्र

अधिकाधिक तरूणांनी कौशल्य विकास प्रशिक्षण घ्यावे, या हेतूने राज्यातील शंभर नामांकित महाविद्यालयांमध्ये चाणक्य कौशल्य विकास केंद्रे स्थापन करण्यात आली असून या योजनेचे ऑनलाइन उद्घाटन शुक्रवारी पंतप्रधान नरेंद्र मोदी यांच्या हस्ते झाले. ठाण्यातील ५८ महाविद्यालयांमध्ये हे प्रशिक्षण केंद्र आहे. या केंद्रांच्या माध्यमातून तरुणांना विनामूल्य कौशल्य विकास प्रशिक्षण देण्यात येणार आहे. जिल्ह्यातील जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना कॉलेज, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय, आर. जे. ठाकूर महाविद्यालय, चांदीबाई, जीवनदीप कॉलेज, इंदाला इत्यादी महाविद्यालयांचा त्यात समावेश आहे. कौशल्य प्रशिक्षणात कृत्रिम बुद्धिमत्ता प्रणालीसारख्या आधुनिक तंत्रज्ञानांचा समावेश करण्यात आला आहे.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

★ मुंबई, बुधवार,
२५ सप्टेंबर २०२४

# ठाण्यातील महाविद्यालयांची मुंबई विद्यापीठाच्या युवा महोत्सवात बाजी

वेदिका कंटे, लोकसत्ता

**ठाणे :** मुंबई विद्यापीठाचा युवा महोत्सव विद्यापीठ स्तरावरील एक महत्त्वाचा सांस्कृतिक आणि कलेचा मेळ साधणारा महोत्सव आहे. यंदा या महोत्सवाचे ५७ वे वर्ष होते. या महोत्सवात विविध कला, साहित्य, संगीत, नृत्य, नाटक आणि इतर सांस्कृतिक विभागात स्पर्धा घेतल्या जातात. या महोत्सवात राज्यभरातील अनेक महाविद्यालयांचा सहभाग असतो. या महोत्सवात दरवर्षीप्रमाणे यंदाही ठाण्यातील महाविद्यालयांनी विविध स्पर्धांमध्ये बाजी मारली आहे.

मुंबई विद्यापीठातर्फे विद्यार्थ्यांमध्ये कलात्मक आणि सांस्कृतिक कौशल्यांचा विकास व्हावा, त्यांच्या कलागुणांना वाव मिळावा तसेच व्यासपीठ उपलब्ध व्हावे यासाठी दरवर्षी युवा महोत्सव आयोजित केला जातो. या महोत्सवात संगीत, नृत्य, ललित कला, साहित्य आणि नाट्य अशा विविध विभागात स्पर्धा घेतल्या जातात. यामध्ये शास्त्रीय, पाश्चात्य, भारतीय असे प्रकार देण्यात येत असतात. गायन, वादन, नृत्य, एकांकिका, मिमिक्री, वक्तृत्व, वादविवाद, कोलाज, रांगोळी, मेहंदी अशा विविध स्पर्धांचा यात समावेश असतो. या महोत्सवात मुंबईसह, ठाणे, पालघर, रायगड जिल्ह्यातील महाविद्यालयांचा सहभाग असतो. मुंबई विद्यापीठाच्या **(पान ४वर)**

# ठाण्यातील महाविद्यालयांची युवा महोत्सवात बाजी

**(पान १वरून)** युवा महोत्सवातून विजेत्या विद्यार्थ्यांना राज्यस्तरीय आणि राष्ट्रीय पातळीवरील युवा महोत्सवांत सहभाग घेता येतो. ठाण्यातील जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना विद्यालय, शेठ एनकेटीटी महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालय यांचा सहभाग होता.

**१) के.जी. जोशी कला महाविद्यालय आणि एन.जी. बेडेकर वाणिज्य महाविद्यालय, ठाणे**

- भारतीय शास्त्रीय गायन एकल (संगीत) - तृतीय
- शास्त्रीय वाद्य (अतिलय) एकलः स्वरवाद्य (संगीत) - उत्तेजनार्थ
- भारतीय हलके गायन एकल (संगीत) - द्वितीय
- भारतीय समूहगीत (संगीत) - प्रथम
- पाश्चात्य समूहगीत (संगीत) - प्रथम
- पाश्चात्य गायन एकल (संगीत) - प्रथम
- नाट्यसंगीत गायन एकल (संगीत) - तृतीय
- कथाकथन (मराठी) (साहित्यिक) - प्रथम
- स्किट गट क (मराठी व्यतिरिक्त) (नाटक)- प्रथम
- कोलाज (ललित कला) - तृतीय
- मातीचे शिल्प (ललित कला) - द्वितीय
- मेहंदी डिझाइनिंग (ललित कला) - द्वितीय

**२) शेठ एनकेटीटी महाविद्यालय, ठाणे**

- पाश्चात्य समूहगीत (संगीत) - उत्तेजनार्थ
- रांगोळी (ललित कला) - प्रथम

**३) सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे**

- लोकवाद्यवृंद (संगीत) - तृतीय
- एकांकिका गट अ (मराठी) (नाटक) - तृतीय
- एकांकिका गट क (मराठी व्यतिरिक्त) (नाटक) - तृतीय
- उत्कृष्ट अभिनेता- सुमेध गायकवाड - तृतीय
- उत्कृष्ट अभिनेत्री - सानिका देवळेकर - प्रथम

**४) कर्मवीर भाऊराव पाटील कला आणि वाणिज्य महाविद्यालय, ठाणे**

- वक्तृत्व गट ब (हिंदी किंवा इंग्रजी) (साहित्यिक) - तृतीय
- कथाकथन गट ब (हिंदी किंवा इंग्रजी) (साहित्यिक) - द्वितीय

लोकसत्ता

शुक्रवार, ४ ऑक्टोबर २०२४

# स्वतःशी मैत्री करा

## प्रा. स्वप्नील सामंत यांचा सल्ला



साहित्य-संस्कृती

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** व्यक्ती समोर असणाऱ्या परिस्थितीला कशी हाताळते, त्यावरून दृष्टिकोनाबाबतचे आत्मभान येते. त्यामुळे स्वतःला ओळखा, स्वतःशीच मैत्री करा. असे केल्यास कधीही चुकीच्या मार्गावर पाऊल पडणार नाही. कारण स्वतःच स्वतःला कधी फसवू शकत नाही. , असे प्रतिपादन प्रा.स्वप्नील सामंत यांनी केले. व्यक्तिमत्व - सौंदर्य आणि विकास कार्यशाळेत ते बोलत होते. या कार्यक्रमात सर्व शाखांमधील एकूण १७५ विद्यार्थी सहभागी झाले होते.

स्टुडंट्स ॲक्टिव्हिटी सेंटर या समितीच्या वतीने विद्यार्थ्यांसाठी 'व्यक्तिमत्व - सौंदर्य आणि विकास' या विषयावर कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. यात वर्तक महाविद्यालयातील प्रा.स्वप्नील सामंत यांनी व्यक्तिमत्व विकासासाठी स्वप्ने आणि इच्छा किती महत्त्वाच्या आहेत हे विद्यार्थ्यांना पटवून दिले. यावेळी उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे, प्रशासकीय उपप्राचार्य डॉ.दिनेश जोशी, स्टुडंट्स ॲक्टिव्हिटी सेंटरचे प्रमुख प्रा.आनंद यादव, उपप्रमुख प्रा.सिद्धेश पाटील, प्रा.जाकिरा शेख, समिती सदस्य उपस्थित होते.

सकाळ

मुंबई, रविवार, ६ ऑक्टोबर २०२४

# अभ्यासाबरोबर व्यायाम, योग काळाची गरज

## उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे यांचे ज्ञानसाधना महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन

ठाणे, ता. ५ : नवीन एज्युकेशन पॉलिसीअंतर्गत शालेय अभ्यासक्रमात खेळ आणि फिटनेस याला विशेष महत्त्व दिले आहे. त्यामुळे अभ्यासाबरोबर विद्यार्थ्यांनी व्यायाम, योगा करणे आवश्यक आहे. कारण आजच्या धावपळीच्या जीवनात तणावमुक्त राहण्यासाठी तंदुरुस्त राहणे अत्यंत गरजेचे आहे, असे सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना सांगितले.

यंग इन्स्पिरेटर्स नेटवर्क (यिन), सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय; तसेच मिशन फिटनेस अकादमीच्या संयुक्त विद्यमाने तरुणांना फिटनेस, योगा, मेडिटेशन आणि क्रीडा या क्षेत्रातील व्यवसायातील विविध करिअरच्या संधी यावर मार्गदर्शनपर शिबिर घेण्यात आले. त्यावेळी ते बोलत होते. राष्ट्रीय सेवा योजना, एनसीसीतील विद्यार्थ्यांना मेडिटेशन योगाचे फायदे, विविध कार्यशाळा मेडिटेशन जाहिरात, प्रसिद्धी, क्रीडा क्षेत्रातील विविध उत्पन्नाच्या संधी, स्पोर्ट्स अकादमी वस्त्रोद्योग आणि मार्केटिंग, योगा, क्रीडा आणि मेडिटेशनच्या व्यवसायात वेगवेगळ्या शाखा उभारणे, आरोग्यविषयक पोषक तत्त्व आहार पुरवणे, कॉर्पोरेट क्षेत्रातील विविध कार्यक्रम राबविणे, ऑनलाइन फिटनेस ट्रेनिंग व त्यातील विशेष व्यवसायाभिमुख प्रशिक्षण आदी विषयांवर फिटनेस ट्रेनर अजित पलांडे यांनी मार्गदर्शन केले. या कार्यक्रमाला दीडशे ते दोनशे विद्यार्थ्यांची उपस्थिती लाभली. यासाठी प्रशासकीय उपप्राचार्य डॉ. दिनेश जोशी, पर्यवेक्षक प्रा. सुरेश हलबांडगे उपस्थित होते. कार्यक्रमाचे नियोजन, सूत्रसंचालन आणि आभार लेफ्टनंट प्रा. दिलीप वसावे यांनी मानले. कार्यक्रमाच्या आयोजनासाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांचे मार्गदर्शन लाभले.



**ठाणे :** उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले.

# ठाण्यातील संस्थांची आदिवासी पाड्यात दिवाळी

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** शहरातील महाविद्यालये, संस्थांनी आदिवासी भागातील नागरिकांसोबत दिवाळी सण साजरा केला. यामध्ये गारद फाउंडेशन आणि सद्गुरु कृपा ही केवलम या संस्थांनी पालघर जिल्ह्यातील म्हसरोळी येथील आदिवासी कुटुंबांना धान्यवाटप करत सण साजरा केला. तर ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने पनवेल येथील वाजे या भागात फराळाचे वाटप करण्यात आले.

दिवाळी हा सण सर्वत्र मोठ्या उत्साहात साजरा होत असतो. या आनंदाच्या सोहळ्यात आदिवासी भागातील नागरिकांना सहभागी करत अनेक संस्था, महाविद्यालये दिवाळी सादरी करत असतात. यंदाही ठाणे शहरातील गारद फाउंडेशन आणि सद्गुरु कृपा ही केवलम यांच्या संयुक्त विद्यमाने हा उपक्रम राबवण्यात आला. यावेळी पालघर जिल्ह्यातील म्हसरोळी येथील १५० कुटुंबियांना धान्यवाटप करण्यात आले. तसेच विधवा महिलांना विशेष भेट आणि त्यांच्या आर्थिक गरजेनुसार रोख रक्कम, पुरुषांसाठी नवीन चपला अशी उत्सवाची शिदोरी देण्यात आली. याव्यतिरिक्त, धोदाडेपाडा अंगणवाडी (मानपाडा) येथील शाळांमधील १०० अधिक लहान मुलांना खाऊ वाटप करण्यात आला. या कार्यक्रमासाठी अश्विन वोरा, भगवान पटेल, दीपक पारेख, डॉ. राधिका बंका, डॉ. अभय नेने, डॉ. अंशिता सोनावाला , डॉ.जतीन कोठारी, डॉ. मनोज चड्ढा, डॉ.फूलरेणू चौहान,सचिन अलमेल, हंसाबेन पटेल, हितेश गांधी, जसुमतीबेन देसाई , किशोर शहा , महेंद्र देढिया, नम्रता गाला , नुपूर चौधरी, पंकज, प्रविण कोठारी, प्रविण तन्ना, राजेश दवे, राकेश बंसल, समीर नवघरे, समीर देसाई, श्रेया नवघरे, विनीत गाला, सानिका पराडकर हे सर्व उपस्थित होते. तसेच ठाण्यातील सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या राष्ट्रीय सेवा योजनेच्या स्वयंसेवकांनी पनवेल येथील वाजे या आदिवासी भागात फराळाचे वाटप केले. या गावातील जिल्हा परिषद केंद्रशाळेत दरवर्षी महाविद्यालयातील राष्ट्रीय सेवा योजनेचे सात दिवसीय शिबीर भरविण्यात येते. यावेळी जिल्हा परिषद केंद्र शाळेतील विद्यार्थी आणि ग्रामपंचायतीतील इतर ४ शाळांमधील २०० विद्यार्थ्यांना शैक्षणिक साहित्याचे वाटप केले.

लोकमत

मुंबई, मंगळवार, दि. २९ ऑक्टोबर २०२४

# मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो...



मतदार राजा जागा हो, लोकशाहीचा धागा हो, असा नारा देत ठाणे येथील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने रॅलीद्वारे मतदान जागृतीसा पुढाकार घेतला. यावेळी नागरिकांनी मतदानाचे कर्तव्य न चुकता पार पाडावे, असे आवाहन विद्यार्थ्यांनी केले. (छाया : विशाल हळ

# मतदान जनजागृती अभियान

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात एनसीसी युनिट आणि ठाणे महानगरपालिकेच्या संयुक्त विद्यमाने विधानसभा निवडणुकीचे औचित्य साधून १४७ कोपरी- पाचपाखाडी मतदार संघ, स्वीप कार्यक्रमाअंतर्गत 'मतदान जनजागृती अभियान' आयोजित करण्यात आले होते. या अभियानामध्ये ठाणे महानगरपालिका शिक्षण अधिकारी कमलाकांत म्हेत्रे यांनी विद्यार्थ्यांना मतदानाचे महत्त्व, नागरिकांची ज़बाबदारी आणि योग्य उमेदवाराची निवड कशी करावी, याबद्दल मार्गदर्शन केले. कुटुंबातील सदस्य आणि इतर परिचितांना मतदानासाठी प्रेरित करण्याचे आवाहन केले. राजेंद्र परदेशी यांनी लोकशाही, नागरिकांचे हक्क आणि कर्तव्य यावर भाष्य केले. कार्यक्रमात १७५ हून अधिक विद्यार्थी आणि शिक्षकांनी उपस्थिती लावली आणि मतदान जनजागृतीची प्रतिज्ञा घेतली. यावेळी कनिष्ठ महाविद्यालयाचे उपप्राचार्य राजेंद्र वेखंडे आणि कनिष्ठ पर्यवेक्षक प्रा. सुनीता जमणे आदी उपस्थित होते.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
ठाणे
मंगळवार,
२९ ऑक्टोबर २०२४

# 'ज्ञानसाधना'मध्ये मतदान जनजागृती अभियान

ठाणे : विधानसभा निवडणुकीनिमित्त ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, राष्ट्रीय छात्र सेना, ठाणे महानगरपालिका यांच्या वतीने कोपरी पाचपाखाडी मतदारसंघात 'स्वीप' कार्यक्रमांतर्गत मतदान जनजागृती करण्यात आली. मतदान हे राष्ट्रीय कर्तव्य आहे. नागरिक म्हणून भूमिका, कर्तव्य याची माहिती विविध उदाहरणाच्या माध्यमातून विद्यार्थ्यांना देण्यात आली. या निवडणुकीमध्ये सर्वाधिक मतदान व्हावे यासाठी 'स्वीप'च्या माध्यमातून जनजागृती केली जात आहे. शाळा- महाविद्यालयांसह परिसरातील चौकात, बाजारपेठेत विविध उपक्रमाच्या मार्फत नागरिकांमध्ये मतदानाबाबत जागरूकता निर्माण केली जात आहे. याच अंतर्गत ठाण्यातील सतीश प्रधान महाविद्यालयातील विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करण्यात आले.

पुण्य नगरी

बुधवार, ३० ऑक्टोबर २०२४ । ठाणे

# ज्ञानसाधना महाविद्यालयात मतदान जनजागृती अभियान




। ठाणे: सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, एनसीसी युनिट व ठाणे महानगरपालिका यांच्या संयुक्त विद्यमाने विधानसभा निवडणूक- २०२४ चे औचित्य साधून १४७ कोपरी- पाचपाखाडी मतदार संघ, स्वीप कार्यक्रमाअंतर्गत 'मतदान जनजागृती अभियान झाले. यावेळी विद्यार्थ्यांना लोकशाहीप्रधान देशात राष्ट्राचे प्रतिनिधित्व करणाऱ्या प्रतिनिधींची निवड करताना जबाबदार नागरिक म्हणून आपली भूमिका, कर्तव्य याची जाणीव विविध उदाहरणाच्या माध्यमातून करून दिली.

तसेच जगात सर्वाधिक लोकसंख्या असलेल्या भारत देशाच्या निवडणुकांकडे अख्या जगाचे लक्ष असते. लोकप्रतिनिधिंची निवड निवडणूकीच्या माध्यमातून केली जात असते. त्यामुळे योग्य व्यक्तीची निवड करण्यासाठी मतदान हे एकमेव पर्याय आहे, यासाठी एक जबाबदार नागरिक म्हणून आपली जबाबदारी काय, मतदान का करावे, मतदान करताना कोणत्या व्यक्तीला मतदान करावे याविषयी मार्गदर्शन करण्यात आले . या विशेष कार्यक्रमात इ.१२ वी.वाणिज्य, कला शाखेतील विद्यार्थी व राष्ट्रीय छात्र सेनेचे जवळपास १७५ विद्यार्थी उपस्थित होते.

पुण्य नगरी

बुधवार, ६ नोव्हेंबर २०२४

# ज्ञानसाधनाच्या संघाची विजयी घोडदौड



**ठाणे**: जिल्हा क्रीडा अधिकारी कार्यालय ठाणे आयोजित १९ वर्षाखालील मुलांच्या जिल्हास्तरीय क्रिकेट स्पर्धेमध्ये सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आणि शुभम राजे कॉलेज या दोन्ही संघामध्ये अंतिम सामना नुकताच दादोजी कोंडदेव स्टेडियम या ठिकाणी झाला.त्यामध्ये सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचा संघ विजेता ठरून विभागीय फेरीस पात्र झाला.या संघातील कर्णधार अर्णव वानखेडे व प्रिन्स गुप्ता या सलामीच्या जोडीने सामना एकहाती जिंकला. संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान,सचिव मानसी प्रधान कॉलेजचे प्राचार्य डॉ. भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली क्रिकेट प्रशिक्षक संतोष धाऊसकर यांच्या सहकार्याने क्रिकेट संघाला यश मिळाले.

महाराष्ट्र टाइम्स

गुरुवार, २१ नोव्हेंबर २०२४

# मतदान प्रक्रियेत विद्यार्थ्यांची स्वयंसेवा

**ठाणे:** विधानसभा निवडणुकीच्या मतदान प्रक्रियेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील एनएसएस आणि एनसीसीच्या स्वयंसेवकांनी स्वयंसेवी वृत्तीने मतदानाला येणारे ज्येष्ठ नागरिक, वाहतूक पोलिस तसेच, प्रशासनाला मदत केली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली राष्ट्रीय सेवा योजनेचे कार्यक्रम अधिकारी डॉ. मनोज वाघ आणि एनएसएस आणि एनसीसीच्या युनिटने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली. स्वयंसेवकांनी मतदान केंद्रांवर ज्येष्ठ नागरिकांना सक्रियपणे मदत केली, तसेच वाहतूक पोलिसांसोबत वाहतूक व्यवस्था सुरळीत करण्यास मदत केली. त्यांच्या शिस्तबद्ध प्रयत्नांनी सकारात्मक सामाजिक प्रभाव पडला आणि लोकशाहीच्या या उत्सवात मतदान प्रक्रिया सुरळीत पार पाडण्यासाठी त्यांची मदत झाली. अनेक केंद्रांवर 'विशेष पोलिस अधिकारी' म्हणून कार्यरत असलेल्या एनएसएस आणि एनसीसीच्या विद्यार्थ्यांनी मतदारांना केंद्र शोधण्यासाठी मदत केली.

ठाणेवैभव ६ ठाणे, सोमवार २ डिसेंबर २०२४

# युवा प्लस...युवकांच्या विचारांचे सशक्त व्यासपीठ-मिलिंद बल्लाळ

## जोशी-बेडेकर आणि ज्ञानसाधना कॉलेजमध्ये 'युवा प्लस'चे प्रकाशन

**ठाणे: आगामी काळात देशाच्या विकासात तरुणांची भूमिका निर्णायक ठरणार आहे. त्यासाठी त्यांनी समाज बांधणीच्या प्रक्रियेत सहभागी होण्याची गरज आहे. तरुणांना निर्णयक्षम करण्यासाठी त्यांना वाचन, मनन आणि चिंतनासाठी सज्ज करण्याच्या हेतूने 'ठाणेवैभव' युवा प्लस पुरवणी घेऊन आला आहे, असे प्रतिपादन संपादक मिलिन्द बल्लाळ यांनी केले.**










ठाण्यातील महाविद्यालयीन विद्यार्थ्यांसाठी 'युवा प्लस' या महाविद्यालयीन बातमीपत्राचे अनावरण जोशी-बेडेकर महाविद्यालय आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात करण्यात आले. 29 नोव्हेंबर रोजी जोशी-बेडेकर महाविद्यालय आणि 30 नोव्हेंबर रोजी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात या उपक्रमाचे उद्घाटन सोहळे आयोजित करण्यात आले होते.

समाजातील सर्व घटकांना व्यासपीठ देण्याचे काम 'ठाणेवैभव' सातत्याने करीत असते, असे सांगून श्री बल्लाळ यांनी तरुणांना मुद्रित आणि डिजिटल माध्यमांचा समसमान वापर करण्याचे आवाहन केले. ते पुढे म्हणाले, युवा प्लसमुळे युवकांच्या विचारांना, भाषेला एक हक्काचं व्यासपीठ मिळेल.

जोशी-बेडेकर महाविद्यालयात आयोजित कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून ठाणेवैभवचे संपादक मिलिंद बल्लाळ, महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक, उपप्राचार्य आणि समन्वय

>>पान २ वर

पान १ वरून

# युवा प्लस...युवकांच्या विचारांचे सशक्त व्यासपीठ-मिलिंद बल्लाळ

डॉ. महेश पाटील उपस्थित होते. यात श्री. मिलिंद बल्लाळ यांनी वाचनाचे महत्त्व स्पष्ट करताना म्हटले, “50 ग्रॅम लिहिण्यासाठी पाच किलो वाचावे लागते. वाचन करणे ही काळाची गरज आहे.” तर महाविद्यालयाच्या प्राचार्या डॉ. सुचित्रा नाईक म्हणाल्या, तरुणांनी दररोज वाचन केले पाहिजे. वाचन हे केवळ ज्ञान वृद्धिंगत करण्यासाठीच नव्हे, तर व्यक्तिमत्त्व विकासासाठीही महत्त्वाचे आहे. महाविद्यालयाचे उपप्राचार्य आणि समन्वक डॉ. महेश पाटील यांनी ‘युवा प्लस’ सुरु केल्याबद्दल 'ठाणेवैभव'चे आभार मानले आणि विद्यार्थ्यांना त्यांच्या लेखनकौशल्यासाठी या मंचाचा फायदा घेण्याचे आवाहन केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक 'ठाणेवैभव'चे व्यवस्थापकीय संपादक निखिल बल्लाळ यांनी केले. “विद्यार्थ्यांनी ‘युवा प्लस’ साठी लेख, कविता आणि महाविद्यातील जीवनशैलीतील हलके फुलके विषय हे पाठवावे,” असे आवाहन त्यांनी केले. यासोबत विद्यार्थ्यांच्या सहभागाने हे वृत्तपत्र अधिक समृद्ध होईल, असे त्यांनी सांगितले.

कार्यक्रमात अध्यक्ष कमलेश प्रधान, सरचिटणीस डॉ. मान
प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे आणि 'ठाणेवैभव'चे संपाद
मिलिंद बल्लाळ उपस्थित होते. या कार्यक्रमात प्राचा
डॉ. गणेश भगुरे यांनी 'युवा प्लस'च्या माध्यमातून युवकां
लिखाण करण्याची संधी प्राप्त होईल, असे मत व्यक्त के
तर निखिल बल्लाळ म्हणाले, आम्ही 'ठाणेवैभव'च्या 5
व्या वर्षात अनेक उपक्रम करत आहोत. त्यातलाच 'यु
प्लस' हा उपक्रम आहे आणि त्यासाठी प्रत्येकाने लिहा
महाविद्यालयाचे अध्यक्ष कमलेश प्रधान म्हणाले, ठाण्या
ठाणेवैभव अनेक नवनवीन उपक्रम यशस्वीरीत्या राबव
आहे.

या दोन्ही कार्यक्रमांमध्ये विद्यार्थ्यांनी ‘युवा प्लस’मु
त्यांचे विचार मांडण्यासाठी मिळालेल्या संधीबद्दल आन
व्यक्त केला. जोशी-बेडेकर महाविद्यालयात सूत्रसंचाल
वेदश्री पवार, तर आभार प्रदर्शन संस्कृती शेलार यांनी के
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात सूत्रसंचालन पू
कदम आणि गौरी खरे, तर आभार प्रदर्शन साक्षी साव

सामना
मंगळवार, दि. ३ डिसेंबर २०२४

# सात एकांकिकांमध्ये रंगणार चुरस

## उंबरठा एकांकिका स्पर्धेची शनिवारी अंतिम फेरी



सामना
माध्यम प्रायोजक

मुंबई, दि. २ (प्रतिनिधी) – उत्कर्ष सेवा मंडळाच्या वतीने आयोजित उंबरठा या एकांकिका स्पर्धेची अंतिम फेरी शनिवार ७ डिसेंबर रोजी सकाळी ७ वाजल्यापासून माटुंगा येथील यशवंतराव चव्हाण नाट्यगृहात संपन्न होणार आहे. या वेळी तब्बल सात एकांकिकांमध्ये विजेतेपदासाठी चुरस रंगणार आहे. दैनिक 'सामना' या स्पर्धेचे माध्यम प्रायोजक आहे.

ना. म. जोशी मार्ग येथील उत्कर्ष सेवा मंडळाच्या वतीने दरवर्षी उंबरठा या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे आयोजन करण्यात येते. यंदा या स्पर्धेचे २१ वे वर्ष आहे. स्पर्धेची प्राथमिक फेरी ८ ते १० नोव्हेंबर या कालावधीत रंगली होती. त्यात ३१ संघांनी एकांकिकेचे सादरीकरण केले. चुरशीच्या लढतीत सात एकांकिका अंतिम फेरीत दाखल झाल्या आहेत. या स्पर्धेचे परीक्षण अभिजीत पेडणेकर, समीर पेणकर यांनी केले.

*अंतिम फेरीत 'जनता नगरचे लंगडे घोडे' (रामनारायण रुईया महाविद्यालय), 'कुक्कुर' (ज्ञानसाधना विद्यालय, ठाणे), 'अविघ्नेया' (सिडनहॅम कॉलेज), 'चिनाब से रावी तक' (क्राऊड नाट्यसंस्था, डोंबिवली), 'सेक्स ऑन व्हिल' (तिसरी घंटा), 'ब्रम्हपुरा' (एमडी कॉलेज), 'जुगाड लक्ष्मी' (खालसा महाविद्यालय) या सात एकांकिकांमध्ये चुरस रंगणार आहे.*

★मुंबई, सोमवार,
९ डिसेंबर २०२४
लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# मुंबई, ठाण्याच्या प्रत्येकी पाच एकांकिका विभागीय अंतिम फेरीत

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई / ठाणे :** युवा रंगकर्मींच्या कल्पनाशक्तीला चालना देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेच्या मुंबई आणि ठाणे विभागातून प्रत्येकी पाच महाविद्यालयांनी विभागीय अंतिम फेरी गाठली आहे. विविध सत्य घटनांवरून प्रेरित होऊन भावभावनांचा वेध घेणाऱ्या आणि सामाजिक विषयांवरील एकापेक्षा एक एकांकिकांचे सादरीकरण रविवारी बघायला मिळाले.

मुंबईत अत्यंत चुरशीच्या झालेल्या प्राथमिक फेरीतून गुरु नानक खालसा स्वायत्त महाविद्यालय, महर्षी दयानंद महाविद्यालय, सिडनहॅम महाविद्यालय, रामनारायण रुईया स्वायत्त महाविद्यालय आणि सर ज. जी. कला, वास्तुकला आणि अभिकल्प विद्यापीठ या महाविद्यालयांनी बाजी मारली. मुंबईची विभागीय अंतिम फेरी माटुंगा रोड (पश्चिम) येथील यशवंत नाट्य मंदिर येथे शुक्रवार, १३ डिसेंबर रोजी दुपारी ३ वाजल्यापासून रंगेल. ठाण्यातील 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक' येथे शनिवार आणि रविवार विभागीय प्राथमिक फेरी पार पडली.

स्पर्धेत १० महाविद्यालये सहभागी झाली होती. यातील पनवेलचे सी. के. ठाकूर महाविद्यालय, ज्ञानसाधना महाविद्यालय, जोशी-बेडेकर महाविद्यालय, एसएसटी महाविद्यालय आणि एनकेटी महाविद्यालयांच्या एकांकिकांनी पुढील फेरीत धडक दिली असून विभागीय अंतिम फेरी शनिवार, १४ डिसेंबर रोजी डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात होईल. विभागीय अंतिम फेरीत विजयी होणारे संघ मुंबईमधील महाअंतिम फेरीत आपापल्या विभागाचे प्रतिनिधित्व करतील.

– सविस्तर वृत्त / पान

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

## प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स

## पुण्यातून 'आयएमसीसी' महाअंतिम फेरीत

**पुणे / नाशिक / कोल्हापूर :** 'लोकसत्ता लोकांकिका'च्या पुणे विभागीय अंतिम फेरीत 'आयएमसीसी'च्या 'सखा' या एकांकिकेने बाजी मारली. तर नाशिक आणि कोल्हापूरच्या प्राथमिक फेऱ्यांमधून अनुक्रमे सहा आणि पाच महाविद्यालयांनी विभागीय अंतिम फेरीत प्रवेश केला आहे. नागपूर आणि रत्नागिरी विभागांच्या प्राथमिक फेऱ्यांनाही दमदार सुरुवात झाली असून सोमवारी विभागीय अंतिम फेरीमध्ये गेलेल्या महाविद्यालयांच्या नावांची घोषणा होईल.

# ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी पाच महाविद्यालयांची निवड

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** उत्कृष्ट लेखन, जोशपूर्ण सादरीकरण, नावीन्यपूर्ण मांडणी, उत्तम नेपथ्य या सगळ्याला नृत्य आणि संगीताची अनोखी जोड देत ठाणे विभागातील विविध महाविद्यालयांतील तरुणांनी वैविध्यपूर्ण एकांकिका सादर करण्याचा प्रयत्न 'लोकसत्ता लोकांकिका'च्या मंचावरून केला. शनिवारी या स्पर्धेच्या प्राथमिक फेरीचा पहिला टप्पा झाल्यानंतर दुसरा टप्पा रविवारी मोठ्या उत्साहात पार पडला. या स्पर्धेत सहभागी झालेल्या १० महाविद्यालयांपैकी पाच महाविद्यालयांची निवड विभागीय अंतिम फेरीसाठी झाली. या स्पर्धेच्या वेळी परीक्षकांनी स्पर्धकांना उत्तम मार्गदर्शन केले.

ठाणे शहरातील तीन हात नाका परिसरात असलेल्या 'हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे स्मारक' येथे शनिवार आणि रविवार अशी दोन टप्प्यांत 'लोकसत्ता लोकांकिका' ठाणे विभागाची प्राथमिक फेरी पार पडली. या स्पर्धेत ठाणे विभागामधून यंदा १० महाविद्यालये सहभागी झाली होती. यातील पनवेल येथील सी. के. ठाकूर महाविद्यालयाची 'वेदना सातारकर... हजर सर', ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'कुक्कुर', जोशी-बेडेकर महाविद्यालयाची 'क्रॅक्स इन द मिरर', एसएसटी महाविद्यालयाची 'ऑपरेशन' आणि एनकेटी महाविद्यालयाची 'रेशन कार्ड' या एकांकिकांची ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवड झाली. शनिवार, १४ डिसेंबर रोजी ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात विभागीय अंतिम फेरी होणार आहे. यावेळी पाचमधून एक एकांकिका महाअंतिम फेरीत प्रवेश करेल.



> एकांकिकेमध्ये विषयांचे वैविध्य होते. तसेच मुलांनी धीटपणे विषय मांडले. अभिनयाची पातळी उच्च दर्जाची होती.
> **-डॉ. अनिल बांदिवडेकर,** लेखक, दिग्दर्शक, रंगकर्मी

> विद्यार्थ्यांनी सादर केलेल्या एकांकिकांच्या कथांमध्ये वैविध्य दिसून आले. यातील काही विषय हे समकालीन होते. सादर केलेले कथानक हे संपूर्णपणे देशी (याच मातीतले) असे होते. तसेच यामध्ये प्रयोगशीलता होती. विद्यार्थ्यांचे अभिनय आणि सादरीकरण उत्तम दर्जाचे होते.
> **- निलकंठ कदम,** कवी, समिक्षक

> लोकांकिका ही मी मागील ९ वर्षांपासून सातत्याने पाहत आहे. पहिल्या वर्षापासून आतापर्यंतच्या एकांकिकेमध्ये खूप बदल झालेले आहेत. तरुणांमध्ये बोलण्याची ताकद, विषय मांडण्याची धमक वाढली आहे. महाविद्यालयातील आताची मुले विविध विषय हाताळत आहेत. सादरीकरणामध्येही सकारात्मक बदल जाणवत आहे.
> **- सुवर्णा राणे,** क्रिएटिव्ह प्रोड्युसर

★ मुंबई, मंगळवार,
१० डिसेंबर २०२४

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# ठाण्यातील महाविद्यालयांमध्ये महोत्सवांची रेलचेल

वेदिका कंटे, लोकसत्ता

**ठाणे :** डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात महाविद्यालयांमध्ये विविध महोत्सवांची रेलचेल सुरू असते. महाविद्यालयांमध्ये या काळात उत्साहाचे वातावरण दिसून येते. यंदाही ठाण्यातील विविध महाविद्यालयांमध्ये महोत्सवांची तयारी सुरू झाली आहेत.

जोशी बेडेकर महाविद्यालय, सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, एन. के. टी. महाविद्यालय, कर्मवीर भाऊराव पाटील महाविद्यालयात भारतीय ज्ञान परंपरोत्सव, सण परंपरा, ग्रामउद्योगांना प्रोत्साहन देऊन स्वयंपूर्ण भारत घडविणे अशा विविध संकल्पनांवर हे महोत्सव रंगणार आहेत. ठाण्यातील महाविद्यालयात वर्षभरात अनेक उपक्रम राबविले जातात. मात्र, विद्यार्थ्यांना वेध लागतात ते डिसेंबर आणि जानेवारी महिन्यात होणाऱ्या महाविद्यालयीन महोत्सवांचे. महाविद्यालयीन महोत्सव म्हणजे विद्यार्थ्यांसाठी आनंदाची पर्वणी असते.

यंदाचे महोत्सव विविध संकल्पनांवर आधारलेले आहेत. त्यानुसार, स्पर्धा आणि विविध दिवसांचे पोशाखांचे वेळापत्रक महाविद्यालयांच्यावतीने ठरवण्यात आले आहे. यंदा जोशी बेडेकर महाविद्यालयाचा नवरंग महोत्सव 'स्वयंपूर्ण ग्राम, आत्मनिर्भरतेचे प्रतीक' यावर असणार आहे. या काळात वक्तृत्व, कवितावाचन, मेहंदी, रांगोळी, संगीत, नृत्य अशा अनेक स्पर्धा असणार आहेत.

ज्ञानसाधना महाविद्यालयाचा 'युटोपिया महोत्सव' भारतीय सण परंपरेवर असणार आहे. या महोत्सवात विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देण्यासाठी मेहेंदी, रांगोळी, एकपात्री अभिनय, कथाकथन, छायाचित्र स्पर्धा असणार आहेत. तर कर्मवीर भाऊराव पाटिल महाविद्यालयाच्या 'युवा तरंग' महोत्सव मागील १२ वर्षांपासून साजरा केला जात आहे. यामध्ये कला, साहित्य, संगीत, नृत्य अशा एकूण १५ स्पर्धा असणार आहेत.

एनकेटी महाविद्यालयाचा 'सोनोरस' हा महोत्सव दरवर्षी मोठ्या उत्साहात साजरा होतो. यंदा हा महोत्सव ८ विभागात साजरा केला जाणार आहे. यामध्ये व्यवस्थापन, माहिती तंत्रज्ञान, माध्यमे, ललित कला, साहित्य, क्रीडा निगडित विविध स्पर्धा असणार आहेत.

> भारतीय परंपरा, सण, ग्रामउद्योग प्रोत्साहनपर संकल्पना तसेच कला, साहित्य, व्यवस्थापन निगडित स्पर्धा या महोत्सवांमध्ये सुरू आहेत.

## जोशी बेडेकर महाविद्यालयात नवरंग महोत्सव



जोशी बेडेकर महाविद्यालयाचा 'नवरंग महोत्सव' १३ डिसेंबर ते २४ डिसेंबर या कालावधीत रंगणार आहे. तर ज्ञानसाधनाचा 'युटोपिया' महोत्सव १७ डिसेंबरला असणार आहे. कर्मवीर भाऊराव पाटिल महाविद्यालयाचा 'युवा तरंग महोत्सव' ८ जानेवारी ते १० जानेवारी या काळात असणार असून एन के टी महाविद्यालयाचा 'सोनोरस' हा महोत्सव १७ आणि १८ जानेवारीला असणार आहे.

'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धा

# ठाणे विभागीय प्राथमिक फेरीत रंगकर्मी विद्यार्थ्यांचा उत्साह

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत संवादातील बदलापासून ते संगीत नियोजनातील बदल सहज आणि सोप्या पद्धतीने स्पष्ट करून परीक्षक सांगत असल्यामुळे पुढील स्पर्धेसाठी अधिक जोमाने तयारी करण्यास प्रोत्साहन मिळते. यामुळेच 'लोकसत्ता लोकांकिका' ही स्पर्धा इतर स्पर्धांपेक्षा खूप आगळीवेगळी ठरते, अशी प्रतिक्रिया प्राथमिक फेरीतून ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवड झालेल्या महाविद्यालयातील रंगकर्मी विद्यार्थ्यांनी दिली.

रंगकर्मी विद्यार्थ्यांना हक्काचे व्यासपीठ उपलब्ध करून देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेची ठाणे विभागीय प्राथमिक फेरी शनिवारी आणि रविवारी असे दोन दिवस पार पडली. या स्पर्धेत विविध सामाजिक विषयांवर भाष्य करणाऱ्या एकांकिका महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सादर केल्या. एकांकिका सादरीकरणानंतर परीक्षकांकडून दहा ते पंधरा मिनिटे विद्यार्थ्यांना त्यांच्या एकांकिकेतील त्रुटींवरोबरच काय बदल करायला हवेत, याविषयी मार्गदर्शन करण्यात आले. 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेत वेळेचे महत्त्व, भाषेची शुद्धता, वैचारिक पातळी, त्यासह कलेचे सादरीकरण अशा सर्वच गोष्टींचे उत्तम ज्ञान मिळते. त्यामुळेच राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धांमध्ये 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धा मानाची मानली जाते, अशी प्रतिक्रिया अनेक विद्यार्थ्यांनी दिली. ठाणे येथील ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'कुक्कुर' या एकांकिकेत श्रीपादचे पात्र साकारणारा शुभम वेलेची ही पहिलीच मुख्य पात्र साकारणारी एकांकिका आहे. ''मुख्य पात्र साकारणे ही मोठी जबाबदारी आहे. ती जबाबदारी परिपूर्णपणे पार पाडण्याचा मी प्रयत्न करतोय,'' असे शुभम म्हणाला.

जोशी-बेडेकर महाविद्यालयाच्या 'क्रॅक्स इन द मिरर' या एकांकिकेत मुख्य पात्र साकारणारी रुचिता सावंत हिचे या स्पर्धेत सहभागी होण्याचे पहिलेच वर्षे आहे. लोकसत्ता लोकांकिकाच्या प्राथमिक फेरीसाठीचे आयोजन अतिशय उत्तम होते. हा अनुभव माझ्यासाठी अविस्मरणीय आहे. या स्पर्धेत परीक्षकांचे आम्हाला चांगले मार्गदर्शन लाभले. त्यामुळे विभागीय अंतिम फेरीसाठी आणखी चांगल्या पद्धतीने आम्ही तयारी करत असल्याची प्रतिक्रिया रुचिता सावंत हिने दिली. गेल्या वर्षापासून लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेत एनकेटी महाविद्यालय सहभागी होत आहे. गेल्या वर्षीप्रमाणे यंदाही आमची विभागीय अंतिम फेरीसाठी निवड झाली आहे. या विभागीय अंतिम फेरीसाठी तयारी करताना, प्राथमिक फेरीत झालेल्या चुका सुधारण्यासह त्यात कोणते बदल केले पाहिजेत याचे उत्तम मार्गदर्शन परीक्षकांकडून आम्हाला मिळाले, अशी प्रतिक्रिया एनकेटी महाविद्यालयाच्या 'रेशन कार्ड' या एकांकिकेत वडिलांची भूमिका साकारणाऱ्या करण परदेशी याने दिली. तसेच लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेत संवादातील बदलापासून ते संगीत नियोजनातील बदल सहज आणि सोप्या पद्धतीने स्पष्ट करून परीक्षक सांगत असल्यामुळे पुढील स्पर्धेसाठी अधिक जोमाने तयारी करण्यास प्रोत्साहन मिळते. यामुळेच लोकसत्ता लोकांकिका ही स्पर्धा इतर स्पर्धांपेक्षा खूप आगळीवेगळी ठरते, असे एसएसटी महाविद्यालयाचा विद्यार्थी जितेश म्हात्रे याने सांगितले.

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

## प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स



## अंतिम फेरीसाठी पाच महाविद्यालये

प्राथमिक फेरीतून ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी पाच महाविद्यालयांची निवड करण्यात आली. त्यामध्ये ठाणे शहरातील ज्ञानसाधना, जोशी-बेडेकर, एनकेटी ही महाविद्यालये, तर पनवेलमधील सीके ठाकूर आणि उल्हासनगरमधील एसएसटी महाविद्यालयाचा समावेश आहे. या पाच महाविद्यालयांमध्ये ठाणे विभागीय अंतिम फेरीतून महाअंतिम फेरीत दाखल होण्यासाठी चुरस पाहायला मिळणार आहे.

बुधवार, ११ डिसेंबर २०२४ लोकसत्ता WWW.LOKSATTA.COM

# एकांकिकांच्या आर्थिक नियोजनाचा विद्यार्थ्यांना वस्तुपाठ

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे :** महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धांमध्ये उत्कृष्ट अभिनयासोबतच नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा, आणि रंगभूषा यांसारखे घटक तितकेच महत्त्वाचे आहेत. या घटकांमुळेच एकांकिका प्रभावी ठरते. या सर्व घटकांची जुळवाजुळव करण्यासाठी विद्यार्थ्यांना आर्थिक नियोजन करावे लागते. यासाठी महाविद्यालयाकडून विद्यार्थ्यांना निधी दिला जातो. परंतु, काही वेळेस हा निधी अपुरा पडलाच तर, त्यावर मात करण्यासाठी आम्ही स्वतः नेपथ्य तयार करण्यास प्राधान्य देतो. काही वेळेस माजी विद्यार्थ्यांकडून आर्थिक मदत मिळते. अनेकदा जेवणाचा किंवा प्रवासाचा खर्च आम्ही स्वतः करतो, असा अनुभव काही विद्यार्थ्यांनी सांगितला.

**अभिनयासह नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा, आदि घटकांमुळे एकांकिका बक्षिसपात्र ठरत असते. महाविद्यालयाच्या निधीतून हे नियोजन करताना खूप शिकण्यास मिळते, अशी रंगकर्मी विद्यार्थ्यांची भावना आहे.**


जनेप प्राधिकरण JNPA INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth


## प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स



एकांकिका सादर होत असताना प्रेक्षकांची नजर कलाकारांची भूमिका न्याहाळतानाच एकांकिकेत साकारलेल्या नेपथ्याकडेही जाते. अभिनयापासून ते विषयाला अनुसरून तयार केलेले नेपथ्य, प्रकाशयोजना, वेशभूषा, रंगभूषा अशा महत्त्वाच्या घटकांमुळे एकांकिका बक्षिसासाठी पात्र ठरत असते. त्यामुळे स्पर्धेत एकांकिका सादर करताना, या सर्व घटकांच्या योग्य नियोजनासाठी (पान ३वर)

# एकांकिकांच्या आर्थिक नियोजनाचा विद्यार्थ्यांना वस्तुपाठ

(पान १वरून) आर्थिक बाजूदेखील विद्यार्थ्यांना सांभाळावी लागते. यासाठी महाविद्यालयाकडून निधी पुरवला जातो. त्या निधीतून सर्व गोष्टींचे नियोजन बसवताना अनेकदा गोंधळ उडतो. परंतु, यातून खूप काही शिकण्यास मिळते, अशी या रंगकर्मी विद्यार्थ्यांची भावना आहे.

एकांकिका बसवताना दिग्दर्शन आणि लेखन या गोष्टी आधी येतात. यासाठी आमच्याच महाविद्यालयातील माजी विद्यार्थी अजय पाटील ही जबाबदारी घेतो. महाविद्यालयातून मिळालेला निधी हा केवळ नेपथ्य, प्रकाशयोजना, रंगभूषा यांसाठी वापरला जातो. तर, प्रवासाचा आणि जेवणाचा खर्च आम्ही स्वतः करतो, असे ज्ञानसाधना महाविद्यालयातील सांस्कृतिक विभागाची विद्यार्थिनी समन्वयक सानिका देवळेकर हिने सांगितले. विद्यार्थ्यांमधील सर्जनशीलतेला वाव मिळावा यासाठी नेपथ्य जितके शक्य होईल तितके विद्यार्थ्यांकडून बनवून घेतले जाते. त्यामुळे खर्च कमी होतो. तर, महाविद्यालयाकडून दिग्दर्शक आणि लेखकाचे मानधन दिले जाते. सर्वाधिक खर्च हा प्रकाशयोजनेसाठी होतो. तो खर्च महाविद्यालयातून मिळालेल्या निधीतून केला जातो. तसेच विद्यार्थ्यांचा प्रवास खर्च आणि एकवेळचे जेवण या निधीतून केले जाते, अशी प्रतिक्रिया पनवेल येथील सीके ठाकूर महाविद्यालयाचे सांस्कृतिक विभाग समन्वयक गणेश जगताप यांनी दिली. तर, एनकेटी महाविद्यालयाकडूनदेखील विद्यार्थ्यांना निधी दिला जातो. यामध्ये दिग्दर्शनापासून ते विद्यार्थ्यांच्या जेवणापर्यंतच्या सर्व खर्चाचे नियोजन केले जाते, असे एनकेटी महाविद्यालयातील विद्यार्थी करण परदेशी याने सांगितले. एकांकिका स्पर्धेच्या प्राथमिक फेरीपासून ते अंतिम फेरीपर्यंत अंदाजे ३५ ते ४० हजार रुपयांचा खर्च होतो. हा सर्व खर्च महाविद्यालय करते, असे उल्हासनगरमधील एसएसटी महाविद्यालयाचे सांस्कृतिक समितीचे समन्वयक हर्षल सूर्यवंशी यांनी सांगितले. एकांकिकाचे लेखक आणि दिग्दर्शकाचे मानधन महाविद्यालयाकडून दिले जाते. तर, नेपथ्य दोन वर्षापूर्वी महाविद्यालयाने तयार करून घेतले आहे, त्याला केवळ रंगकाम करण्याचा खर्च यंदा झाला, असे जोशी-बेडेकर महाविद्यालयातील साई नाईक या विद्यार्थ्याने सांगितले.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

दि: १२/१२/२०२४

## सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय



# माजी विद्यार्थ्यांची मदत



महाविद्यालयाच्या वतीने नेहमी विद्यार्थ्यांचे प्रयत्न आणि त्यांच्या जिद्दीला महत्त्व दिले जाते. गेल्या दोन वर्षांपासून विद्यार्थी ठाणे विभागातून विजेते होत आहेत. अंतिम फेरीत निवड व्हावी, यासाठी या क्षेत्रातील यशस्वी माजी विद्यार्थ्यांकडूनही मार्गदर्शन करण्यात येत आहे. त्यांच्या मार्गदर्शनाखाली विद्यार्थ्यांची तालीम सुरू आहे. विद्यार्थ्यांना लागेल ती मदत महाविद्यालयाच्या वतीने केली जात आहे. त्याचप्रमाणे त्यांना प्रोत्साहित करण्यासाठी त्यांच्याबरोबर सतत संवादही सुरू आहे.

- डॉ. गणेश भगुरे, प्राचार्य ( सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे)

DNYANASADHANA ... COLLEGE LIBRARY * THANE *

# ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेत आशयघन सादरीकरणावर भर

## ठाणे विभागीय फेरीसाठी रंगकर्मी सज्ज; तांत्रिक, संगीत, नेपथ्यांसोबत तालमींना रंग

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** ‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेच्या ठाणे विभागीय फेरीसाठी पाचही महाविद्यालयांचे रंगकर्मी सज्ज झाले आहेत. नेपथ्य, संगीत, प्रकाशयोजना तसेच दिवसभर तालीम करत उत्तम सादरीकरणावर भर दिला जात आहे. एकांकिकेचा मूळ विषय, त्यातील आशय समजून घेत, तो प्रेक्षकांपर्यंत पोहोचविण्यासह दर्जेदार सादरीकरणावर स्पर्धकांचे लक्ष असेल.

‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेत ठाणे जिल्ह्यातून एकूण पाच महाविद्यालयांची ठाणे विभागीय फेरीसाठी निवड झाली आहे. अवघ्या दोन दिवसांवर येऊन ठेपलेल्या विभागीय फेरीसाठी महाविद्यालये सज्ज झाली आहेत. विद्यार्थी दिवसभर एकांकिकेची तालीम करत असून नेपथ्याची तयारीही सुरू आहे. पार्श्वसंगीत, आवाजातील चढ-उतार, संवादफेक, उच्चारशुद्धीवर अधिक लक्ष दिले जात असल्याचे दिग्दर्शकांनी सांगितले.

‘लोकसत्ता लोकांकिका’ स्पर्धेत सहभागी होण्याचे ज्ञानसाधना महाविद्यालयाचे हे तिसरे वर्ष आहे. गेली दोन वर्षे ठाणे विभागातून अंतिम फेरीसाठी निवड होत आहे. यंदाही ठाणे विभागातून निवड व्हावी याकडे लक्ष असेल. तालमींवर भर देत अधिक तयारीने एकांकिका सादर केली जाईल. दिवसभर विद्यार्थी तालीम करीत आहेत. नेपथ्यातील योग्य रचनेचे कामही पूर्ण झाले आहे, असे ‘कुक्कुर’ एकांकिकेचे दिग्दर्शक अजय पाटील यांनी सांगितले.

सी के ठाकूर महाविद्यालय सादर करणारी ‘वेदना सातारकर - हजर सर’ ही एकांकिका दीर्घ कविता स्वरूपात आहे. यात जुन्या काळातील प्रेमकहाणी मांडली जाईल. त्यामुळे ही कविता, आशय समजून घेत प्रेक्षकांपर्यंत विषय पोहोचवण्यासाठी विद्यार्थी सज्ज आहेत, असे ‘वेदना सातारकर - हजर सर’ एकांकिकेचे दिग्दर्शक अभिजीत झुंजारराव यांनी सांगितले.

सकाळी सात ते सायंकाळपर्यंत विद्यार्थ्यांची तालीम सुरू आहे. यात संपूर्ण संहितेचे विस्तृत वाचन केले जाते. नेपथ्य बांधणीकडे लक्ष दिले जात आहे. त्याचे काम विद्यार्थी करीत आहेत. शिवाय अंतिम फेरीत निवड व्हावी यासाठी वेळमर्यादा, उत्तम सादरीकरणाकडे विशेष कल असेल, असे एनकेटी महाविद्यालय, ठाणे प्रस्तुत ‘रेशनकार्ड’ एकांकिकेचे दिग्दर्शक प्रथमेश पाटील यांनी सांगितले.


या स्पर्धेच्या विभागीय फेरीत चार वर्षांनी पुन्हा एकदा निवड झाल्याने सादरीकरणासाठी सज्ज असल्याचे एसएसटी महाविद्यालय सादर करीत असलेल्या ‘ऑपरेशन’ या एकांकिकेबाबत दिग्दर्शक नितीन सावळे आणि समन्वयक हर्षल सूर्यवंशी यांनी सांगितले. विभागीय फेरीतील निवड झालेल्या महाविद्यालयांच्या विद्यार्थ्यांना व्यासपीठावर सादरीकरणाचा अनुभव आहे, मात्र आमच्या विद्यार्थ्यांना याचा अनुभव नसल्याने महाविद्यालयातच विद्यार्थ्यांसाठी व्यासपीठाची निर्मिती करून तालीम केली जात आहे. त्याचप्रमाणे पार्श्वसंगीत निर्मिती, नेपथ्य, संगीत, प्रकाश योजनेचे काम सुरू आहे, असेही त्यांनी सांगितले.

जोशी बेडेकर प्रस्तुत ‘क्रॅक्स इन द मिरर’ ही एकांकिका सादरीकरणापूर्वी त्यात काम करणाऱ्या विद्यार्थ्यांचे वय कमी असल्याने त्यांना विषय व्यवस्थित समजावून सांगितला. सकाळपासून सायंकाळपर्यंत तालमी सुरू होत्या. अवघ्या पाच ते सहा दिवसांत ही एकांकिका बसवण्यात आली असून तिची निवड ठाणे विभागीय फेरीसाठी झाली आहे. त्यामुळे अधिकची मेहनत घेत, अंतिम फेरीत जाण्याचा पूर्ण प्रयत्न करू असे ‘क्रॅक्स इन द मिरर’ एकांकिकेचे दिग्दर्शक महेश कापरेकर, सागर चव्हाण यांनी सांगितले.

INDIA'S BEST PERFORMING PORT
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

### प्रायोजक

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स



लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, शनिवार, १४ डिसेंबर २०२४

# ठाणे विभागीय अंतिम फेरी आज

## घाणेकर नाट्यगृहात 'लोकांकिकां'चे सादरीकरण

**ठाणे :** विविध सामाजिक विषयांना उत्तम कथा, अभिनय आणि संगीताची साथ देत उत्कृष्ट एकांकिकेचे सादरीकरण ठाणे विभागीय प्राथमिक फेरीत झाले. या एकांकिकांमुळे ठाणे विभागीय प्राथमिक फेरी अत्यंत चुरशीची ठरली. यातून पाच एकांकिकांची ठाणे विभागीय अंतिम फेरीसाठी निवड झाली असून ही फेरी आज शनिवारी सकाळी ९.४५ वाजल्यापासून ठाण्यातील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात रंगणार आहे.

प्राथमिक फेरीत एकांकिका सादरीकरणानंतर परीक्षकांनी दहा ते पंधरा मिनिटे विद्यार्थ्यांना त्यांच्या एकांकिकेतील त्रुटींबरोबरच काय बदल करायला हवेत, याविषयी मार्गदर्शन केले होते. त्या अनुषंगाने एकांकिकेत आवश्यक ते बदल करण्यासह संहितेचे वाचन, अभिनयाची तालीम तसेच तांत्रिक गोष्टींवर भर देऊन ठाणे विभागीय अंतिम फेरी गाजवण्यासाठी महाविद्यालये सज्ज झाली आहेत.

### विभागीय अंतिम फेरीतील पाच एकांकिका

- 'कुक्कुर' : ज्ञानसाधाना महाविद्यालय, ठाणे
- 'रेशन कार्ड' : एनकेटी महाविद्यालय, ठाणे
- 'क्रॅक्स इन द मिरर' : जोशी-बेडेकर महाविद्यालय, ठाणे
- 'ऑपरेशन' : एसएसटी महाविद्यालय, उल्हासनगर
- 'वेदना सातारकर...हजर सर' : सी. के. ठाकूर महाविद्यालय, पनवेल

### सर्वांना प्रवेश, काही जागा निमंत्रितांसाठी राखीव

- 'लोकसत्ता लोकांकिका' स्पर्धेची ठाणे विभागीय अंतिम फेरी शनिवार, १४ डिसेंबर रोजी सकाळी ९.४५ वाजल्यापासून ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृह येथे रंगणार आहे.
- याच ठिकाणी प्रेक्षकांना निःशुल्क प्रवेशिका विभागीय अंतिम फेरी सुरू होण्याच्या अर्धा तास आधी देण्यात येतील.
- एका व्यक्तीला एकच प्रवेशिका देण्यात येईल. तर काही जागा निमंत्रितांसाठी राखीव असतील.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★मुंबई, रविवार,
१५ डिसेंबर २०२४

INDIA'S BEST PERFORMING PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

## प्रायोजक

- मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर
- सहप्रायोजक : झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- पॉवर्ड बाय : एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- साहाय्य : अस्तित्व
- टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन्स

# ज्ञानसाधनाची 'कुक्कुर' महाअंतिम फेरीत



'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय महाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेत ठाणे विभागीय अंतिम फेरीमध्ये सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'कुक्कुर'ने बाजी मारली. विजेत्यांना पारितोषिके देताना अभिनेते संजय नार्वेकर, लेखक निरज शिरवईकर, 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणचे संदीप पाटील. – सविस्तर वृत्त : पान ३

छाया : दीपक जोशी

# ज्ञानसाधनाची 'कुक्कुर' महाअंतिम फेरीत

लोकसत्ता प्रतिनिधी

**ठाणे** : सर्जनशील विषय आणि नवरंगकर्मींची कल्पकता यांचा मेळ साधणारी लोकसत्ता 'लोकांकिका' या स्पर्धेच्या ठाणे विभागीय फेरीत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'कुक्कुर' या एकांकिकेने बाजी मारत महाअंतिम फेरीत स्थान मिळवले. सलग तिसऱ्यांदा ठाणे विभागातून अंतिम फेरीत जाण्याचा विक्रमही त्यांनी केला आहे. या स्पर्धेत परीक्षक म्हणून काम पाहणारे सुप्रसिद्ध सिनेअभिनेते संजय नार्वेकर यांनी उपस्थित रंगकर्मी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करताना अपयशाने खचून जाऊ नका, असा सल्ला दिला. यशाची चव चाखायची असेल तर अपयश येणे गरजेचे आहे. अनेक मोठ्या कलाकारांना सुरुवातील अपयश आले आणि त्यानंतर ते यशस्वी झाले. त्यामुळे अपयशाने खचून जाऊ नका आणि यश मिळविण्यासाठी प्रयत्न सुरूच ठेवा, असेही ते म्हणाले.

ठाणे येथील डॉ. काशिनाथ घाणेकर नाट्यगृहात लोकसत्ता लोकांकिकेची ठाणे विभागीय फेरी शनिवारी पार षडली. सामाजिक विषयांना उत्तम कथेची साथ, अभिनय, दिग्दर्शन आणि संगीताची जोड देत, ठाणे विभागीय फेरीत उत्कृष्ट एकांकिकांचे सादरीकरण रंगकर्मींना केले. या स्पर्धेतील रंगकर्मींना प्रोत्साहन देण्यासाठी महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी मोठ्या प्रमाणावर उपस्थिती लावली होती. वैविध्यपूर्ण विषयांची मांडणी, नव रंगकर्मींच्या प्रयोगशीलतेची जोड, उत्तम प्रकाश संयोजन, संगीत, नेपथ्यांचे मांडणी आणि मानवी भावभावनांचा मेळ साधत लोकसत्ता लोकांकिका स्पर्धा २०२४ मोठ्या उत्साहात पार पडली. चुरशीच्या ठरलेल्या या स्पर्धेत सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या 'कुक्कुर' या एकांकिकेने प्रथम क्रमांक पटकावत महाअंतिम फेरीत प्रवेश मिळवला. या महाविद्यालयाने सलग तीन वर्षे दर्जेदार एकांकिका सादर करीत तिसऱ्यांदा महाअंतिम फेरीत आपले स्थान निश्चित केले. जोशी बेडेकर महाविद्यालयाच्या 'क्रॅक्स इन द मिरर' या एकांकिकेने द्वितीय तर, सीके ठाकूर महाविद्यालयाच्या 'वेदना सातारकर - हजर सर' या एकांकिकेने तृतीय क्रमांक पटकावला. या स्पर्धेत परीक्षक म्हणून काम पाहणारे अभिनेते संजय नार्वेकर आणि लेखक नीरज शिरवईकर यांच्यासह लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर, सॉफ्ट कॉर्नरचे दिलीप कुलकर्णी, जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणचे संदीप पाटील, ठाणे निवासी उपजिल्हाधिकारी डॉ. संदीप माने यांच्या हस्ते स्पर्धेतील विजेत्यांना पारितोषिके देण्यात आली.

INDIA'S BEST PERFORMING PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

प्रायोजक
- मुख्य प्रायोजक : जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- सहप्रस्तुती : सॉफ्ट कॉर्नर
- सहप्रायोजक : झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- पॉवर्ड बाय : एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स
- साहाय्य : अस्तित्व
- टॅलेंट पार्टनर : आयरिस प्रोडक्शन्स

## वैयक्तिक पारितोषिके

- सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना श्याम चव्हाण (वेदना सातारकर - हजर सर)
- सर्वोत्कृष्ट संगीत अक्षय धांगट (कुक्कुर)
- सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार सिद्धेश नांदलस्कर (कुक्कुर)
- सर्वोत्कृष्ट अभिनय रुचिता सावंत (क्रॅक्स इन द मिरर)
- परिन मोरे (वेदना सातारकर - हजर सर)
- चैतन्य शिंपी (क्रॅक्स इन द मिरर)
- सर्वोत्कृष्ट लेखक प्रशांत मोरे (वेदना सातारकर - हजर सर)
- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक अजय पाटील (कुक्कुर)



लोकसत्ता लोकांकिका या उपक्रमामुळे मराठी रंगभूमीला येत्या काळात भरपूर प्रतिभावंत कलाकार मिळू शकतात. या रंगकर्मी विद्यार्थ्यांना मी इतकच सांगेल की जे काय कराल ते प्रामाणिकपणे आणि मेहनतीने करा. आपल्यामध्ये जी प्रतिभा आहे, त्याच्यावर आणि स्वतःवर विश्वास ठेवा.
**– संजय नार्वेकर**, अभिनेता



लोकसत्ता लोकांकिका उपक्रमामुळे केवळ कलाकारच नाही तर, प्रेक्षकसुद्धा निर्माण होत आहेत. या उपक्रमाची गुणवत्ता, प्रतिष्ठा जशी आहे तशी ठेऊन लोकसत्ता इतके वर्षे या उपक्रमाचे आयोजन करत आहे, हे खूप कौतुकास्पद आहे. ठाणे विभागीय अंतिम फेरीत सादर झालेल्या पाचही एकांकिकेचे सादरिकरण उत्तम होते.
**– नीरज शिरवईकर**, लेखक

लोकमत

मुंबई, बुधवार, दि. १८ डिसेंबर २०२४

# ज्ञानसाधना महाविद्यालयात व्याख्यानमाला

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : गुरुवर्य स. वि. कुलकर्णी व्याख्यानमाला दि. १८ आणि १९ डिसेंबर रोजी सायंकाळी ५ वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात येत आहे. व्याख्यानमालाचे पहिले पृष्प दि. १८ डिसेंबर रोजी लालबाग राजाचे मूर्तिकार संतोष रत्नाकर कांबळी यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाणार आहे.

मुलाखतकाराच्या भूमिकेत प्रा. महेश कुलसंगे असतील, तर दुसरे पुष्प 'जय जवान गोविंदा पथकाचे' संस्थापक व प्रशिक्षक संदीप ढवळे यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाईल. यावेळी मुलाखतकाराच्या भूमिकेत वृंदा दाभोळकर असणार आहेत.

ठाणेवैभव ४ ठाणे, बुधवार १८ डिसेंबर २०२४

# स. वि.कुलकर्णी गौरव व्याख्यानमाला

**ठाणे :** ठाणे जिल्हा आणि ठाणे शहरात अतिशय प्रतिष्ठेची अशी ख्याती असलेल्या गुरुवर्य स. वि.कुलकर्णी व्याख्यानमाला 18 आणि 19 डिसेंबर रोजी सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात येत आहे.

व्याख्यानमालाचे पहिले पृष्प 18 डिसेंबर रोजी जगविख्यात अशा लालबागच्या राजाचे मूर्तिकार संतोष कांबळी यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाणार आहे. मुलाखतकाराच्या भूमिकेत प्रा.महेश कुलसंगे असतील. व्याख्यानमालाचे दुसरे पुष्प सुप्रसिद्ध 'जय जवान गोविंदा पथकाचे' संस्थापक व प्रशिक्षक संदीप ढवळे यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाईल. यावेळी मुलाखतकाराच्या भूमिकेत वृंदा दाभोळकर या असतील. ठाणेकर रसिकांनी व्याख्यानमालेचा लाभ घ्यावा, असे आवाहन संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान, सचिव मानसी प्रधान, प्राचार्य डॉ.गणेश भगुरे यांनी केले आहे.

महाराष्ट्र टाइम्स
बुधवार, १८ डिसेंबर २०२४

थोडक्यात

## व्याख्यानमालेचे आयोजन

**ठाणे :** ठाणे जिल्हा आणि शहरात प्रतिष्ठेची मानली जाणारी गुरुवर्य स. वि.कुलकर्णी व्याख्यानमाला सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित करण्यात आली आहे. व्याख्यानमालाचे पहिले पुष्प बुधवार, १८ डिसेंबर रोजी लालबागच्या राजाचे मूर्तिकार संतोष रत्नाकर कांबळी यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाणार आहे. प्रा. महेश कुलसंगे त्यांच्याशी संवाद साधतील. व्याख्यानमालाचे दुसरे पुष्प जय जवान गोविंदा पथकाचे संस्थापक व प्रशिक्षक संदीप ढवळे यांच्या मुलाखतीच्या माध्यमातून गुंफले जाईल. वृंदा दाभोळकर त्यांची मुलाखत घेतील. दोन्ही दिवशी संध्याकाळी ५ वाजता व्याख्यान सुरू होईल. रसिकांना विनामूल्य प्रवेश आहे.

★ मुंबई, गुरुवार, १९ डिसेंबर २०२४

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM



## ठाणे

- एकांकिका - कुक्कुर
- महाविद्यालय - सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय
- लेखक आणि दिग्दर्शक - अजय पाटील
- पिसाळलेले कोणतेही जनावर समाजासाठी धोकादायक असते, पण सगळ्यात आधी ते पिसाळलेले जनावर ओळखणे खूप जास्त गरजेचे असते. अशाच एका कुक्कुर गावातल्या पिसाळलेल्या कुत्र्याची गोष्ट या एकांकिकेत मांडण्यात आली आहे.

# 'लोकसत्ता लोकांकिका'चे जेतेपद कोणाला?

INDIA'S BEST PERFORMING PORT
जनेप प्राधिकरण JNPA
जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
प्रस्तुत
लोकसत्ता लोकांकिका
सहप्रस्तुती
सॉफ्ट कॉर्नर
सहप्रायोजक
ZEE टॉकीज
KESARI
Bharati Vidyapeeth

**प्रायोजक**

- **मुख्य प्रायोजक :** जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण
- **सहप्रस्तुती :** सॉफ्ट कॉर्नर
- **सहप्रायोजक :** झी टॉकीज, केसरी टूर्स, भारती विद्यापीठ
- **पॉवर्ड बाय :** एन एल दालमिया, फ्यूजनफ्लिक्स, इंडियन ऑइल कॉर्पोरेशन लिमिटेड
- **साहाय्य :** अस्तित्व
- **टॅलेंट पार्टनर :** आयरिस प्रोडक्शन्स

**गेला महिनाभर** राज्यातील आठ विविध विभागांमध्ये 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन एकांकिका स्पर्धेचा सूर निनादत होता. प्रत्येक विभागात प्राथमिक फेरी आणि विभागीय अंतिम फेरीचे आव्हान पूर्ण करून अखेर महाअंतिम फेरीपर्यंत पोहोचण्यात आठ महाविद्यालयांच्या एकांकिकांना यश मिळाले आहे. आता या आठ एकांकिकांमधून महाराष्ट्राची या वर्षीची 'लोकसत्ता लोकांकिका' निवडण्यात येणार आहे.

मुंबई, ठाणे, पुणे, नागपूर, नाशिक, छत्रपती संभाजी नगर, कोल्हापूर आणि रत्नागिरी या आठ शहरांमध्ये आजूबाजूच्या भागांतील आजवर या स्पर्धेत भाग न घेऊ शकलेल्या महाविद्यालयांशीही संवाद साधत नव्या युवा रंगकर्मींना सामावून घेण्यात यंदा 'लोकसत्ता लोकांकिका'च्या मंचाला यश मिळाले. युवा रंगकर्मींचा उत्साह, भवतालात घडणाऱ्या नानाविध घटनांवर कलात्मक भाष्य करण्याची त्यांची क्षमता, वैचारिकता-कल्पकता यांच्या अचाट मिश्रणातून त्यांनी उभ्या केलेल्या एकांकिका परीक्षकांनाही विचार करायला लावणाऱ्या होत्या. अगदी भाषेच्या लहेजापासून, विषयातील वैविध्य, मांडणीच्या शैलीतील नावीन्य आणि उत्तम युवा कलाकारांचा थक्क करणारा अभिनय हा सगळा तरुण नाट्यमय माहौल पुन्हा एकदा शनिवार, २१ डिसेंबर रोजी होणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' महाअंतिम सोहळ्यात अनुभवायला मिळणार आहे.

मुंबईत माटुंगा येथील यशवंत नाट्यमंदिरात सकाळी पावणेदहापासून सुरू होणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' महाअंतिम फेरीत आठ विविध विभागांतून सर्वोत्तम म्हणून निवडून आलेल्या आठ एकांकिकांमध्ये अंतिम स्पर्धा होणार आहे. आठ शहरांतून आलेल्या, आठ महाविद्यालयांच्या आठ एकांकिकांमधून एक महाराष्ट्राची 'लोकांकिका' हा बहुमान पटकावणार आहे. महाअंतिम फेरीत आपले उत्कृष्ट सादरीकरण करण्यासाठी सज्ज असलेल्या या आठ एकांकिकांचा हा वेध...

पुण्य नगरी

# भाविकाला वाटते लालबागचा राजा माझ्याकडेच बघतोय!

## राजाचे मूर्तिकार कांबळी यांनी व्याख्यानमालेत सांगितले अनुभव

। ठाणे : माझ्या वडिलांचे वय ८४ आहे.पण राजाचे डोळे आजही तेच करतात.त्यांच्या डोळ्याकडे बघताना प्रत्येक भाविकाला वाटते राजा माझ्याकडे बघतोय, ही राजाच्या डोळ्यांची खासियत आहे,असे प्रतिपादन लालबागच्या राजाचे मूर्तीकार संतोष कांबळी यांनी केले. सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय आयोजित स. वि. कुलकर्णी व्याख्यानमालेचे पहिले पुष्प कांबळी यांच्या व्याख्यानाने गुंफले. महाविद्यालयाचे प्रा. महेश कुलसंगे यांनी त्यांची मुलाखत घेतली. यावेळी ते बोलत होते.

यावेळी बोलतांना संतोष कांबळी म्हणाले की, मंगळवारचा दिवस पाहून मी बाप्पा घडवायला घेतो. बाप्पा उभा करायलाच १२ ते १४ तास जातात. मग मोजमाप घेऊन मूर्ती घडवायला सुरूवात होते. त्यानंतर मूर्ती सुकायला एक महिना जातो. लालबागचा राजाचा पाद्यपूजन सोहळा हा मूर्त पूजन सोहळा असतो. तो मूर्तीकार आणि मंडळामध्ये होत असतो. काही वर्षांपूर्वी तो आमच्या कारखान्यात होत असे. पण जशी राजाला प्रसिद्धी मिळाली तशी मूर्ती जिथे विराजमान होते तिथे हा सोहळा करण्यास सुरूवात केली. परंतू या सोहळ्याला गर्दी अधिक वाढल्याने हा पाद्यपूजन सोहळा दोन वर्षांपासून पुन्हा कारखान्यात सुरू झाला.गणेशोत्सवाच्या दोन महिने आधी संकष्टी चतुर्थीच्या मुहूर्तावर ही पूजा होत ,असल्याची माहिती त्यांनी दिली.मी केवळ सेलिब्रेटींसाठी बाप्पा बनवतो असे नाही मी सर्वसामान्यांसाठीही मूर्ती बनवत असतो. रतन टाटा यांची आठवण सांगताना ते म्हणाले की, त्यांना देखील मी मूर्ती दिली आहे, टाटा यांना प्रत्यक्षात बघायला मिळणे हे माझे स्वप्न होते आणि ते राजामुळे पूर्ण झाले.

अमिताभ बच्चन यांना कांबळी यांनी स्वतः तयार केलेला स्टॅच्यू दिला. त्यावेळी त्यांनी क्या अदभूत कलाकृती है अशा शब्दांत कौतुकोद्गार तर काढलेच पण तो त्यांच्या घरातील आर्ट गॅलरीमध्ये त्यांनी ठेवला असल्याचे सांगितले. यावेळी त्यांनी तरुणांना ,तुम्ही जे शिकता त्यात एक्स्पर्ट व्हा, ज्या माध्यमातून वर आले आहात ते माध्यम विसरू नका ,डोक्यात हवा जाऊन देऊ नका असे मार्गदर्शन करताना सांगितले.



◆ ज्ञानसाधना सोसायटीच्या वतीने कै .सरलाताई चिटणीस यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार पूर्व प्राथमिक विभागातून अनघा दांडेकर, प्राथमिक विभागाचे पुरस्कार प्रतिक्षा खंदारे, अर्चना पाटील, वर्मा विरेंद्र प्रताप यांना प्रदान करण्यात आला. स्वातंत्र्य सेनानी दत्ताजी ताम्हणे यांच्या स्मरणार्थ आदर्श शिक्षक पुरस्कार कनिष्ठ महाविद्यालय गटातून हेमंत डोंगरे व वरिष्ठ महावद्यालयीन गटातून डॉ. प्रमोद पाटील यांना प्रदान करण्यात आला.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
★ मुंबई, रविवार, २२ डिसेंबर २०२४

# महाअंतिम फेरी निकाल

- सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम - व्हाय नॉट ? (राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, इस्लामपूर)
- सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय - मशाल, (श्री स.ह. केळकर महाविद्यालय, देवगड)
- सर्वोत्कृष्ट एकांकिका तृतीय - सखा, (आयएमएमसी महाविद्यालय, पुणे)
- सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक, विनय आपटे स्मृती पारितोषिक - अभिषेक पवार, श्रेया माने (व्हाय नॉट ?)
- सर्वोत्कृष्ट लेखक - अभिषेक पवार, श्रेया माने : (व्हाय नॉट ?)
- सर्वोत्कृष्ट अभिनय - सौमित्र कागलकर : (व्हाय नॉट ?)
- सर्वोत्कृष्ट अभिनय - साहिल कदम : कुक्कुर (सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे)
- सर्वोत्कृष्ट अभिनय - श्रेया माने : (व्हाय नॉट ?)
- सर्वोत्कृष्ट नेपथ्यकार - सिद्धेश नांदलस्कर : (कुक्कुर)
- सर्वोत्कृष्ट संगीत - दुर्गेश खरे : (सखा)
- सर्वोत्कृष्ट प्रकाशयोजना - मधुरेश शहा : (सखा)
- परीक्षक पसंती अभिनय - प्राची व्यवहारे : पासपोर्ट (वसंतराव नाईक महाविद्यालय, नागपूर)
- परीक्षक पसंती अभिनय - यश वर्तक : अविघ्नेया (सिडनहॅम महाविद्यालय, मुंबई)
- परीक्षक पसंती अभिनय - दीपक जानकर : (मशाल)
- परीक्षक पसंती वेशभूषा : सखा
- परीक्षक पसंती - अतुल परचुरे स्मृती पुरस्कार (सर्वोत्कृष्ट वाचिक अभिनय) : ओम नितीन चव्हाण (सखा)

★ मुंबई, रविवार,
२२ डिसेंबर २०२४

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM

# कोल्हापूर विभागाची 'व्हाय नॉट?' महाराष्ट्राची लोकांकिका

## रत्नागिरी विभागाच्या 'मशाल'ला द्वितीय तर पुण्याच्या 'सखा'ला तृतीय पारितोषिक

लोकसत्ता प्रतिनिधी

**मुंबई :** युवा रंगकर्मींच्या दर्जेदार सादरीकरणाला रसिक प्रेक्षकांची उत्स्फूर्त दाद आणि अरे... आवाज कुणाचा अशा आरोळ्यांनी दणाणलेले नाट्यगृह, उत्कृष्ट सादरकरण आणि विषय वैविध्य यांनी नटलेल्या लोकसत्ता लोकांकिका स्पर्धेच्या महाअंतिम फेरीत यंदा कोल्हापूर विभागाने आपली मोहोर उमटवली आहे. सर्वोत्कृष्ट लेखक, दिग्दर्शक, अभिनय या वैयक्तिक पारितोषिकांसह राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या 'व्हाय नॉट ?' या एकांकिकेने महाराष्ट्राची लोकांकिका होण्याचा बहुमान पटकावला.

देवगड येथील श्री. स. ह .केळकर महाविद्यालयाची 'मशाल' या एकांकिकेने द्वितीय तर पुण्यातील आयएमसीसी महाविद्यालयाची 'सखा' या एकांकिकेने तृतीय पारितोषिक पटकावले. युवा रंगकर्मींच्या सळसळत्या उत्साहात आणि मनोरंजनसृष्टीतील दिग्गज मंडळींच्या उपस्थितीत महाअंतिम फेरी शनिवार, २१ डिसेंबर रोजी माटुंगा येथील यशवंत नाट्य मंदिर येथे रंगली. (पान ५वर)



राजारामबापू अभियांत्रिकी महाविद्यालय, इस्लामपूर या महाविद्यालयाच्या 'व्हाय नॉट ?' ही एकांकिका यंदा महाराष्ट्राची लोकांकिका ठरली. विजेत्यांना लेखक व दिग्दर्शक क्षितिज पटवर्धन , अभिनेत्री व निर्माती मुक्ता बर्वे, अभिनेते वैभव मांगले, पंकज त्रिपाठी आणि जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरणाचे गिरीश थॉमस यांच्या उपस्थितीत पारितोषिक प्रदान करण्यात आले.

# कोल्हापूर विभागाची 'व्हाय नॉट' महाराष्ट्राची लोकांकिका

(पान १वरून)

युवा रंगकर्मींमधील कल्पनाशक्तीला चालना देण्यासाठी आणि त्यांना कलाक्षेत्रातील व्यावसायिक संधींची कवाडे खुली करून देणाऱ्या 'लोकसत्ता लोकांकिका' या राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन मराठी एकांकिका स्पर्धेबाबत नाट्यप्रेमींमध्ये सुरुवातीपासूनच उत्साह पाहायला मिळत आहे. यंदा युवा रंगकर्मींचा उत्साह वाढवण्यासाठी आणि त्यांच्या रंगमंचीय आविष्काराला दाद देण्यासाठी महाअंतिम फेरीसाठी सुप्रसिद्ध अभिनेते पंकज त्रिपाठी हे प्रमुख पाहुणे म्हणून उपस्थित होते. अष्टपैलू अभिनयाच्या जोरावर मनोरंजनसृष्टी गाजवणारे दिवंगत अभिनेते अतुल परचुरे यांना महाअंतिम फेरी सुरू होण्यापूर्वी श्रद्धांजली वाहण्यात आली. त्यानंतर परीक्षकांसह 'जवाहरलाल नेहरू पोर्ट प्राधिकरण'चे अध्यक्ष उन्मेष वाघ, 'सॉफ्ट कॉर्नर'चे दिलीप कुलकर्णी, 'आयरिस प्रोडक्शन्स'चे विद्याधर पाठारे आणि 'लोकसत्ता'चे संपादक गिरीश कुबेर यांच्या उपस्थितीत दीप प्रज्वलन करून महाअंतिम फेरीची जल्लोषात सुरुवात झाली. मुंबई, पुणे, ठाणे, नाशिक, छत्रपती संभाजीनगर, नागपूर, कोल्हापूर आणि रत्नागिरी या आठही विभागांतील एकांकिकांची वैविध्यपूर्ण पर्वणी एकाच ठिकाणी अनुभवण्यासाठी रसिकप्रेक्षकांनी सकाळी सात वाजल्यापासूनच यशवंत नाट्य मंदिराबाहेर गर्दी केली होती.



'लोकसत्ता लोकांकिका' महाअंतिम सोहळ्याला प्रेक्षकांचा उत्स्फूर्त प्रतिसाद लाभला.

दर्जेदार एकांकिका सादरीकरणाला रसिकप्रेक्षकांनी टाळ्यांच्या कडकडाटात दाद देत नाट्यगृह दणाणून सोडले होते. तर निवेदक कुणाल रेगे यांनी आपल्या अनोख्या शैलीत सूत्रसंचालन करीत स्पर्धकांसह रसिकप्रेक्षकांचा उत्साह वाढवला.

व्हाय नॉट, मशाल, सखा यांबरोबरच मुंबई विभागातून सिडनहॅम महाविद्यालयाची 'अविघ्नेया', ठाणे विभागातून सतीश प्रधान, ज्ञानसाधना महाविद्यालयाची 'कुक्कुर', नागपूर विभागातून वसंतराव नाईक महाविद्यालयाची 'पासपोर्ट', नाशिक विभागातून नूतन मराठा विद्यालयाची 'सुबन्या आणि...', छत्रपती संभाजीनगर विभागातून देवगिरी महाविद्यालयाची 'फाटा' या आठ एकांकिकांचे महाअंतिम फेरीत सादरीकरण झाले. प्रसिद्ध अभिनेते वैभव मांगले, अभिनेत्री व निर्माती मुक्ता बर्वे आणि लेखक व दिग्दर्शक क्षितीज पटवर्धन यांनी महाअंतिम फेरीच्या परीक्षणाची धुरा सांभाळली.

'मराठी माणसाच्या जगण्याचा नाटक हा अविभाज्य घटक आहे. विंगेत उभे राहून जो गर्भार अंधार असतो, त्यातून निर्माण होणारी नाट्यनिर्मिती आपण अनुभवत असतो. राज्याच्या विविध भागातील युवा रंगकर्मी हे वैविध्यपूर्ण विषयांवर आधारित नावीन्यपूर्ण कलाकृती 'लोकसत्ता लोकांकिका' या स्पर्धेच्या मंचावर सादर करत असतात आणि महाअंतिम फेरी म्हणजे एक ऊर्जा देणारा दिवस असतो. या स्पर्धेला मनोरंजनसृष्टीतील दिग्गज मंडळी हजेरी लावतात आणि युवा रंगकर्मींना मार्गदर्शनही करतात', असे मत लोकसत्ताचे संपादक गिरीश कुबेर यांनी प्रास्ताविक मांडताना व्यक्त केले.

लोकसत्ता
WWW.LOKSATTA.COM
ठाणे
बुधवार,
२५ डिसेंबर २०२४

# शिस्तबद्धतेमुळे मानवी मनोऱ्यांचा नवा इतिहास

## जय जवान गोविंदा पथकाच्या प्रवासाचा उलगडा

**लोकसत्ता प्रतिनिधी**



**ठाणे :** जोगेश्वरीतील जय जवान गोविंदा पथकाने आपल्या साहसी आणि शिस्तबद्ध वाटचालीने मानवी मनोऱ्यांचा नवा इतिहास रचला आहे. एका कबड्डी संघापासून सुरू झालेल्या या पथकाने सात थरांपासून दहीहंडीचा प्रवास सुरू करून आज नऊ थरांची विजयी सलामी देत आहे, असे जय जवान गोविंदा पथकाचे संस्थापक संदीप ढवळे यांनी ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित केलेल्या मुलाखतीत सांगितले.

ज्ञानसाधना महाविद्यालयात गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे आयोजन करण्यात आले होते. या व्याख्यानमालेतील दुसऱ्या पुष्पात पथकाचे संस्थापक संदीप ढवळे यांची मुलाखत घेण्यात आली. ही मुलाखत वृंदा दाभोलकर यांनी घेतली, यावेळी ते बोलत होते. खेळाडूंच्या निवडीपासून ते त्यांच्या शारीरिक, मानसिक आरोग्याची काळजी घेण्यापर्यंतची सर्व माहिती दिली. विघातक संकटांपासून खेळाडूंना परावृत्त करणे, नियमित सराव, व्यायाम यामुळेच हा प्रवास यशस्वी ठरल्याचे त्यांनी सांगितले. दहीहंडीला साहसी खेळ म्हणून मान्यता मिळावी, यासाठी प्रयत्न सुरू आहेत, असे अनेक महत्त्वाचे विषय त्यांनी सांगितले.

मंगळवार, लोकसत्ता
२४ डिसेंबर २०२४ WWW.LOKSATTA.COM

# आपल्या कार्यातून इतरांना आनंद द्यावा

## मूर्तीकार संतोष कांबळी यांचे मत ; ज्ञानसाधना महाविद्यालयात व्याख्यानमाला

**लोकसत्ता प्रतिनिधी**

**ठाणे :** लालबागच्या राजाच्या आशीर्वादामुळे आम्ही एका सामान्य माणसापासून अभिनेते आणि उद्योगपतींच्या वर्तुळात पोहोचलो, अशी भावना लालबागच्या राजाची मूर्ती घडवणारे मूर्तीकार संतोष कांबळी यांनी व्यक्त केली. आपल्या कार्यातून इतरांना आनंद दिला पाहिजे, कर्म प्रतिष्ठा राखली पाहिजे, तेव्हाच खऱ्या अर्थाने ईश्वर भक्ती होते, असा संदेश त्यांनी ज्ञानसाधना महाविद्यालयात आयोजित केलेल्या मुलाखतीत दिला.




मूर्तीकार कांबळी यांची मुलाखत घेताना प्रा. डॉ गणेश भगुर.

ज्ञानसाधना महाविद्यालयात गुरुवर्य स. वि. कुलकर्णी गौरव व्याख्यानमालेचे आयोजन केले होते. या व्याख्यानमालेतील पहिल्या पुष्पात लालबागच्या राजाचे मूर्तीकार कांबळी यांची मुलाखत प्रा. डॉ गणेश भगुरे यांनी घेतली, यावेळी ते बोलत होते.

लालबागच्या राजाची मूर्ती घडविणारे मूर्तीकार संतोष कांबळी यांनी आपल्या मुलाखतीतून आपल्या पिढीजात मूर्तिकार कलेचा परंपरागत वारसा आपल्या आजोबांपासून ते त्यांच्या तिसऱ्या पिढीकडे कसा आला? हा प्रवास उपस्थितांना उलगडून सांगितला. तसेच लालबाग राजाच्या मूर्तीवर कलात्मक व धार्मिक संस्कार कसे होतात, याचीही माहिती यावेळी त्यांनी दिली.

लोकसत्ता
दि. ४।१।२५

# संक्षिप्त

## वक्तृत्व स्पर्धा

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने कै.ग.का.फणसे स्मृती चषक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत संत साहित्यातील शाश्वत मूल्ये, उत्सवांचे बाजारीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता( एआय )- शाप की वरदान?, ओटीटी - मनोरंजनाची एक विस्तारलेली कक्षा, छापील पान ते ई-आवृत्ती : एक माध्यम प्रवास व अभिजात मराठी भाषा आणि आजची तरुणाई हे विषय दिले आहेत. ही स्पर्धा शुक्रवार, १७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ८७६६४०६०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

लोकसत्ता

शनिवार, ४ जानेवारी २०२५

# संक्षिप्त

## वक्तृत्व स्पर्धा

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या वतीने कै.ग.का.फणसे स्मृती चषक राज्यस्तरीय आंतरमहाविद्यालयीन वक्तृत्व स्पर्धेचे आयोजन केले आहे. या स्पर्धेत संत साहित्यातील शाश्वत मूल्ये, उत्सवांचे बाजारीकरण, कृत्रिम बुद्धिमत्ता(एआय)- शाप की वरदान?, ओटीटी - मनोरंजनाची एक विस्तारलेली कक्षा, छापील पान ते ई-आवृत्ती : एक माध्यम प्रवास व अभिजात मराठी भाषा आणि आजची तरुणाई हे विषय दिले आहेत. ही स्पर्धा शुक्रवार, १७ जानेवारी रोजी सकाळी ९ वाजता सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे होणार आहे. अधिक माहितीसाठी ८७६६४०६०३४ या क्रमांकावर संपर्क साधावा.

प्रहार शनिवार, ११ जानेवारी २०२५

चिंतामणी कलामंच विश्वस्त संस्था, मुंबई आयोजित 'महासंग्राम - खासदार करंडक २०२४'

# "क्रावूड नाट्य संस्था आणि स्टोरीया प्रोडक्शनची चिनाब से रावी तक" ठरली सर्वोत्कृष्ट एकांकिका

## चिंतामणी कलामंचच्या राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धेचे निकाल जाहीर

माध्यम प्रायोजक प्रहार

मुंबई : मराठी रंगभूमीचे विस्तृत साम्राज्य जोपासणे ही सर्व रंगकर्मींची जबाबदारी आहे. या साम्राज्यात व्यावसायिक आणि प्रायोगिक नाटकांना प्राधान्य दिले जात असले तरी एकांकिका ही प्रथम पायरी असते. या विश्वात नाट्यकर्मींना संधी देण्यासाठी नवनवीन एकांकिका स्पर्धा आयोजित केल्या जातात. गेले ५ वर्षे अशीच एक स्पर्धा लोकप्रिय होत आहे. चिंतामणी कलामंच विश्वस्त संस्था, मुंबई आयोजित राज्यस्तरीय एकांकिका स्पर्धा 'महासंग्राम - खासदार करंडक २०२४'.

चिंतामणी कलामंच २०१८ साली 'प्रथमेश पिंगळे' यांनी सुरू केली. प्रथमेश पिंगळे हे एक उत्कृष्ट संकलक असून त्यांना नाटकांची प्रचंड आवड आहे.

रंगभूमीवर काम करणाऱ्या प्रत्येक मुलांमधील गुण जगासमोर यावेत, त्यांना जास्तीत जास्त वाव मिळावा हीच इच्छा बाळगून जास्तीत जास्त संस्थांना लाईट शो करण्यासाठी प्राधान्य देणारी मुंबईतील ही एकमेव संस्था आहे.

अनेक नाट्यसंस्था एकांकिका स्पर्धांमार्फत कलाकारांना प्रोत्साहित करण्यासाठी विविध पारितोषिके देतात; परंतु त्यातही चिंतामणी कलामंच या संस्थेने वैविध्य जोपासले आहे. साधारण ४ फूट उंचीचे सन्मानचिन्ह देऊन विजेत्यांना गौरविण्यात येते. चिंतामणी कलामंच यांनी यापूर्वी लघुपट म्हणजेच शॉर्ट फिल्म फेस्टिवलचे आयोजनही केले आहे. संस्थेमार्फत मुलांसाठी, स्त्रियांसाठी अनेक कार्यक्रम आयोजित केले जातात.

सदर कार्यक्रमाला इंडियन ऑईल को. लिमी., भारत पेट्रोलियम को. लिमी., हिंदुस्तान पेट्रोलियम यांचे प्रायोजकत्व लाभले.

तसेच प्रहार वृत्तपत्र हे माध्यम प्रायोजक होते. चिंतामणी कलामंचचे अध्यक्ष प्रथमेश दीपक पिंगळे, खजिनदार पूजा मोहिते-पिंगळे आणि स्पर्धाप्रमुख दिव्या पेटकर यांच्या नेतृत्वाखाली दि. ७ जानेवारी, २०२५ रोजी मुंबईतील यशवंत नाट्यगृह, माटुंगा येथे आयोजित करण्यात आली होती.

त्यात मुंबई, नवी मुंबई, ठाणे या विभागातील संस्थांची आणि महाविद्यालय यांची अंतिम फेरीत निवड करण्यात आली होती. सदर स्पर्धेचे परीक्षण मराठी चित्रपसृष्टीतील तसेच मराठी नाट्य सृष्टीतील लेखक, दिग्दर्शक आणि अभिनेते समीर पेणकर आणि मराठी चित्रपटसृष्टी, नाट्यसृष्टी तसेच रंगभूमीवरील नाटकांमधून कार्यरत असणारे, मोठ्या पडद्यावरील चित्रपटातून झळकणारे सुप्रसिद्ध अभिनेते सुनील जाधव यांनी निरपेक्षपणाने केले.



चिंतामणी कलामंच विश्वस्त संस्था, मुंबई पदाधिकारी, सभासद आणि परीक्षक.



सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम क्रमांक - चिनाब से रावी तक, क्रावूड नाट्य संस्था आणि स्टोरीया प्रोडक्शन.



सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय क्रमांक - ब्रम्हपुरा - महर्षी दयानंद महाविद्यालय, मुंबई.



सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय क्रमांक (विभागून) - कुक्कुर - सतिषप्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

### अंतिम फेरीत विजेत्यांची यादी

**सर्वोत्कृष्ट एकांकिका प्रथम** - चिनाब से रावी तक (क्रावुड नाट्य संस्था आणि स्टोरीया प्रोडक्शन)

**सर्वोत्कृष्ट एकांकिका द्वितीय (विभागून)** - ब्रम्हपुरा (महर्षी दयानंद महाविद्यालय

**आणि (विभागून) कुक्कुर** - सतिषप्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय

**सर्वोत्कृष्ट लेखन** - प्राजक्त देशमुख (चिनाब से रावी तक)

**सर्वोत्कृष्ट दिग्दर्शक** - संकेत पाटील, संदेश रणदिवे ( चिनाब से रावी तक)

**सर्वोत्कृष्ट प्रकाश योजना** - श्याम चव्हाण (ब्रम्हपुरा)

**सर्वोत्कृष्ट पार्श्वसंगीत** - अक्षय धांगट (कुक्कुर)

**सर्वोत्कृष्ट नेपथ्य** - देवआशिष भरवडे, राहुल डेंगळे (चिनाब से रावी तक)

**सर्वोत्कृष्ट अभिनेता** - अजिंक्य नंदा (चिनाब से रावी तक)


**सर्वोत्कृष्ट अभिनेत्री** - संजीवनी हसबे (चिनाब से रावी तक)

स्पर्धेला हेमंत जाधव, मयुरी पारकर, पराग परब, हर्षद घाडीगावकर यांचे मोलाचे सहकार्य लाभले.

या स्पर्धेला मयुरी दंडवते, अजय पाटील, योगिता पाटील, आकाश घडवले, कल्पेश सकपाळ, अनिरुद्ध कुपटे, सोनाली नाडकर, योगेश पाटील, आशिष साबळे, गौरव बोंद्रे, आनंद कोरी, साहिल नार्वेकर, आविष्कार भालेराव, यश कदम, भरत बारे यांचे स्वयंसेवक म्हणून सहकार्य लाभले.







पुढारी

ठाणे, बुधवार, १५ जानेवारी २०२५

# सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात राष्ट्रीय युवा दिन साजरा

**ठाणे : पुढारी वृत्तसेवा**

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्या आदेशानुसार, जिल्हा एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग जिल्हा सामान्य रुग्णालय, ठाणे व महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था व पार्टनर NGO YRG Care तसेच सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे यांच्या संयुक्त विद्यमाने १३ जानेवारी रोजी सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथे राष्ट्रीय युवा दिन साजरा करण्यात आला.

राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने आरोग्य विभागाच्या एचआयव्ही/एड्स प्रतिबंध व नियंत्रण विभाग, ठाणे या विभागाने महत्त्वपूर्ण सहभाग घेतला. या कार्यक्रमाचा मुख्य उद्देश युवकांमध्ये एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण करणे आणि सुरक्षित व सकारात्मक जीवनशैलीविषयी माहिती देणे होता.



या कार्यक्रमात एचआयव्ही/एड्सविषयी तज्ज्ञांनी युवकांसमोर एड्सचा धोका, कारणे, प्रतिबंधात्मक उपाय, तसेच उपचारांच्या उपलब्ध सोयी याविषयी सविस्तर मार्गदर्शन केले. युवकांमध्ये जागरूकता वाढवण्यासाठी मोफत एचआयव्ही तपासणी शिबिरे आयोजित करण्यात येत आहेत, यामध्ये मोठ्या प्रमाणावर युवकांनी सहभाग नोंदविण्याचे आवाहनही करण्यात आले. युवकांना सुरक्षित लैंगिक व्यवहार, आरोग्यविषयक स्वच्छता, आणि समुपदेशनाच्या महत्त्वाबद्दल माहिती देण्यात आली. तसेच विविध संस्थाच्या माध्यमातून प्रदर्शन व माहितीपत्रकांचे वाटप करण्यात आले. एचआयव्ही/एड्सविषयक माहिती समजावून सांगण्यासाठी पोस्टर प्रदर्शन आणि माहितीपत्रकांचे वाटपही करण्यात आले.

महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्था, मुंबई यांच्याकडून सहाय्यक संचालक बेसिक सर्विसेस व प्रिवेंशन विभाग, महाराष्ट्र राज्य एड्स नियंत्रण संस्थेचे डॉ.राहुल जाधव, जिल्हा शल्यचिकित्सक डॉ.कैलास पवार, म.रा.ए.नि. संस्थेचे युवा समन्वय श्री.अनुराग कुलकर्णी, ज्ञान साधना महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.गणेश भगूरे, कुटुंब कल्याण व प्रशिक्षण केंद्र, ठाणेच्या प्राचार्या डॉ.शुमा राठोड, जिल्हा कार्यक्रम व्यवस्थापक श्री.रतन गाढवे, ठाणे जिल्हा सामान्य रुग्णालयाचे जिल्हापर्यवेक्षक श्री.अशोक देशमुख, श्रीमती नीलिमा पाटील, उडज ठाणेच्या श्रीमती प्रफुलता चुरी, धठक्ष संस्थेचे सर्व अधिकारी व कर्मचारी उपस्थित होते. राष्ट्रीय युवा दिनाच्या निमित्ताने एचआयव्ही/एड्सविषयी जागरूकता निर्माण करण्याचा हा प्रयत्न सामाजिक दृष्टिकोनातून महत्त्वाचा ठरला आहे.

ठाणेवैभव

गुरुवार १६ जानेवारी २०२५

# 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा उपक्रमाला उत्स्फूर्त प्रतिसाद'



**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' याउपक्रमांतर्गत ग्रंथालय, मराठी आणि इंग्रजी विभाग यांनी 'ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी व वाचक संवाद' या कार्यक्रमांचे आयोजन केले होते.

या प्रसंगी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी असलेल्या विशाखा विश्वनाथ यांना प्रमुख पाहुण्या म्हणून आमंत्रित करण्यात आले होते. विशाखा विश्वनाथ यांना साहित्य अकादमी युवा साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आले. याप्रसंगी त्यांनी ग्रंथप्रदर्शनाचे उद्घाटन केले तसेच इंग्रजी विभागाच्या 'रीडर्स क्लब'च्या माध्यमातून होणाऱ्या 'ग्रंथदान' या उपक्रमात स्वतःचा कवितासंग्रह भेट दिला. या दिंडीत दासबोध, ज्ञानेश्वरी, भारतीय संविधान तसेच महात्मा फुले, डॉ. बाबासाहेब आंबेडकर या महापुरुषांच्या ग्रंथांचाही समावेश होता. दिंडीमध्ये विद्यार्थ्यांबरोबरच कार्यालयीन कर्मचारी वर्ग, ग्रंथालयातील कर्मचारी वर्ग व प्राध्यापक वर्ग मोठ्या संख्येने उपस्थित होता.

मागील 22 वर्षांपासून सतिश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या ग्रंथालय विभागातर्फे सातत्याने ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात येते. यावर्षी महाराष्ट्र शासनाच्या 'वाचनसंकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमाअंतर्गत 13 आणि 14 जानेवारी दरम्यान 'वाचन संकल्प @ SPDC' या मथळ्याखाली ग्रंथ प्रदर्शनाचे आयोजन करण्यात आले. दरवर्षी एक विषय केंद्रस्थानी ठेवून त्या अनुषंगाने त्या त्या विषयाची जास्तीत जास्त पुस्तके प्रदर्शनात मांडण्यात येतात. यावर्षी राष्ट्रीय युवादिनाचे औचित्य साधून स्वामी विवेकानंद यांची पुस्तके स्वतंत्ररित्या प्रदर्शित करण्यात आली होती.

यावेळी विशाखा विश्वनाथ यांनी आपल्या काव्यवाचनाने वाचक- संवाद कार्यक्रमात रंगत आणून उपस्थितांची मने जिंकली तसेच त्यांनी आपल्या कवितांच्या माध्यमातून विद्यार्थ्यांसोबत सहज संवाद साधला व पुस्तकरुपी विठ्ठलाचे विद्यार्थी जीवनातील महत्व विशद केले. कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी विभाग प्रमुख डॉ. माधुरी पाथरकर यांनी केले. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांनी कार्यक्रमाचे अध्यक्षस्थान भूषवले.

अध्यक्षीय भाषणातून ग्रंथदिंडी मधील मुलींच्या उत्स्फूर्त सहभागाची नोंद घेत क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांच्या स्त्री शिक्षण कार्याचे महत्व अधोरेखित केले. विद्यार्थ्यांमध्ये वाचनाची गोडी निर्माण व्हावी, त्यांना पुस्तके प्रत्यक्ष हातात घेवून हाताळता यावीत तसेच ग्रंथालयात उपलब्ध असलेली पुस्तके त्यांना माहित व्हावीत म्हणून दरवर्षी असे ग्रंथप्रदर्शन आयोजित केले जाते, असे ग्रंथपाल डॉ. महेश दळवी यांनी सांगितले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रा. शीतल गाणार यांनी केले. प्रा. सर्जेराव बोऱ्हाडे, प्रा. महेश कुलसंगे, प्रा. कांतीलाल चव्हाण, प्रा. किसन धादवड आणि प्रा. महेश पाटील उपस्थित होते. तसेच इंग्रजी विभाग प्रमुख डॉ. रुना शाजिव यांनी आभारपर भाषणाने कार्यक्रमाचा समारोप केला.

लोकसत्ता

शुक्रवार, १७ जानेवारी २०२५

# ग्रंथदिंडी, वाचक संकल्प उपक्रम

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 'वाचन संकल्प महाराष्ट्राचा' या उपक्रमांतर्गत ' ग्रंथप्रदर्शन, ग्रंथदिंडी आणि वाचक संवाद' हे कार्यक्रम पार पडले. यावेळी सर्व विद्यार्थी, प्राध्यापक उपस्थित होते.

सर्वत्र वाचन संकल्प महाराष्ट्राच्या या उपक्रमांतर्गत विविध कार्यक्रम राबविले जात आहेत. त्याचप्रमाणे ठाण्यातील ज्ञानसाधना महाविद्यालयात ग्रंथालय व मराठी विभाग यांच्यावतीने विविध कार्यक्रमांचे आयोजन केले होते. या प्रसंगी महाविद्यालयाची माजी विद्यार्थिनी विशाखा विश्वनाथ यांना साहित्य अकादमी युवा साहित्य पुरस्काराने गौरविण्यात आले. तसेच यावेळी विविध उपक्रम पार पडले.

ठाणेवैभव

शनिवार १८ जानेवारी २०२५

# 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'निमित्त अनुभवकथन

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात मराठी विभागातर्फे 'मराठी भाषा संवर्धन पंधरवडा'प्रीत्यर्थ 'मराठीने मला काय दिले? या विषयावर विशेष अनुभव कथन आयोजित करण्यात आले होते.

अमराठी भाषिकांना मराठीने कसे घडवले हे जाणून घेण्याच्या उद्देशाने प्रातिनिधिक संवाद मराठी विभागाच्या वतीने घडवून आणला होता. याप्रसंगी मल्याळम भाषिक डॉ. रुणा शाजिव (इंग्रजी विभागप्रमुख) यांनी त्यांच्या जीवनातील मराठी भाषा आणि माणसांचे असलेले स्थान अतिशय दिलखुलास शैलीत विद्यार्थ्यांना उलगडून दाखवले.

केरळ ते मुंबई या प्रवासात त्यांच्या व त्यांच्या कुटुंबियांच्या जगण्याचा मराठी भाषा ही एक अविभाज्य भाग झाली. आई-वडिलांकडून मिळालेला मराठी साहित्य, संगीत आणि चित्रपटांचा आस्वाद घेण्याचा वारसा सांगताना डॉ. रुणा यांनी अनेक गाण्यांच्या, अभंगाच्या आणि कवितांच्या गायनातून विद्यार्थ्यांना मंत्रमुग्ध केले. त्यांना भाषेची गोडी कशी लावली हे सांगताना त्यांनी अतिशय नम्रपणे शालेय जीवनातील मराठीच्या शिक्षिकेचे ऋण मान्य केले. तसेच मराठी चित्रपट, गाणी, कविता



आणि नाटक यामुळे मला मराठी भाषेची समृद्धता कळली हे सांगताना त्यांनी 'देहाची तिजोरी भक्तीचाच ठेवा', 'संथ वाहते कृष्णामाई' यांसारख्या गाण्यांचे बोल गाऊन दाखवले. डॉ. रुणा यांना त्यांच्या वडिलांमुळे मराठी साहित्याचा व कवितेचा परिचय झाला व गोडी लागली हे सांगताना अतिशय सहजपणे विंदांची तुकोबाच्या भेटी, शेक्सपिअर आला ही कविता सादर केली. विजय तेंडुलकरांच्या 'बेणारे बाई'चा दाखला देताना त्या उंबरठा चित्रपटातील नायिकेचे वेगळेपणही सांगून गेल्या.

मराठी साहित्य-संगीत कलेबरोबरच त्यांच्या आयुष्यात मराठी खाद्यपदार्थांना एक खास महत्त्व आहे हे त्यांनी आवर्जून सांगितले. मराठी सणांनीही त्यांना समृद्ध केले हे सांगताना 'सार्वजनिक गणेशोत्सवा'तील बालपणीच्या आठवणींना उजाळा दिला.

डॉ. रुणा यांनी आपल्य कथनात मराठी माणसाचा सर्वा सामावून घेण्याचा सहजभा विशेषत्वाने सांगितला. त्यांच्य या अनुभवकथनामुळे आपल्य विद्यार्थ्यांना अमराठी भाषिकांच्य नजरेतून मराठी संस्कृतीचा एक वेगळ आयाम दिसला यात शंकाच नाही. य कार्यक्रमाला महाविद्यालयाच्या कल शाखेच्या उपप्राचार्या डॉ. सीम केतकर आणि वाणिज्य शाखेच्य उपप्राचार्या डॉ. मंजिरी गोंधळेक उपस्थित होत्या. कार्यक्रमा सूत्रसंचालन व प्रमुख वक्त्यांच परिचय प्रा.महेश कुलसंगे यां केला. डॉ. बाबासाहेब कांबळे, प्र रुपाली मुळ्ये, प्रा. राधिका मुखज प्रा. रितेश बनसोडे यावेळी उपस्थि होते. तसेच मराठी विभाग प्रमु डॉ.माधुरी पाथरकर यांनी आभार भाषणाने कार्यक्रमाचा समारोप केल

लोकमत
मुंबई, बुधवार, दि. २२ जानेवारी २०२५

# तीस वर्षानंतर विद्यार्थ्यांची पुनर्भेट

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी एकत्र येत प्राध्यापकांनाही निमंत्रित करून पुनर्भेट संमेलन घडवून आणले. महाविद्यालय सुटल्यानंतर ३० हून अधिक वर्षांनी सर्व मित्र-मैत्रिणी एकत्र जमल्याने व त्यात ज्यांचे संस्कार लाभले, असे सर्व प्राध्यापकही सोबत असल्याने या पुनर्भेटीचा वेगळाच आनंद होता.

यावेळी प्रा. प्रवीण दवणे यांनी जुन्या आठवणींना उजाळा दिला. अर्थशास्त्राच्या प्रा. मेघना मेहेंदळे, मानसशास्त्राच्या प्रा. कविता मोकाशी, इतिहासाचे प्रा. जगदाळे, इंग्रजीच्या प्रा. आसावरी करमाळकर, राज्यशास्त्राच्या प्रा. सुनीता जमणे यांनीही मनोगत व्यक्त केले.

महाराष्ट्र टाइम्स
गुरुवार, ३० जानेवारी २०२५

# आविष्कारमधील सुवर्णवेधी प्रकल्प

विद्यार्थ्यांच्या संशोधक प्रवृत्तीला प्रोत्साहन मिळावं, यासाठी राजभवनातर्फे आयोजित केल्या जाणाऱ्या महाराष्ट्र राज्य आंतरविद्यापीठीय आविष्कार संशोधन स्पर्धेत मुंबई विद्यापीठाला २३ पदकांसह प्रथम स्थान मिळालं. त्यापैकी १३ सुवर्णपदकं मिळवणाऱ्या विद्यार्थ्यांच्या प्रकल्पांचे कौतुक सर्वदूर होत आहे. यापैकी काही प्रकल्पांचा घेतलेला हा धांडोळा...

## 'आरोग्य संकलना'ची अनोखी क्लृप्ती

संशोधक विद्यार्थी- कृष्णकांत लासुणे



आणीबाणीच्या प्रसंगी एखाद्या रुग्णालयात दाखल व्हायची वेळ आली आणि त्या रुग्णालयात आपला वैद्यकीय इतिहास माहीत नसल्यानं चुकीचे उपचार झाले तर ते जिवावर बेतू शकतं. नेमकी हीच गोष्ट टाळण्यासाठी विद्यापीठातील कृष्णकांत लासुणे या विद्यार्थ्यानं 'आरोग्य संकलन' हे हेल्थकेअर प्रोफाइल मॅनेजमेंट ॲप तयार केलं आहे. या ॲपवर वापरकर्त्यांच्या आरोग्याबद्दलची सर्व माहिती स्टोअर होऊ शकेल. तसंच ही माहिती त्याच्या कंपनीकडेही जाईल. तसंच व्हर्च्युअल रिॲलिटीचा वापर करून जवळचं रुग्णालय, पॅथलॉजी लॅब आदी गोष्टी शोधता येतील. त्याशिवाय, ताणतणाव कमी करण्यासाठी या ॲपद्वारे योग किंवा तणाव नियोजनाचं व्हिडीओदेखील सुचवले जातील. डॉक्टरांनी सुचवलेली औषधं, ती घेण्याच्या वेळा याबद्दलची सूचनाही या ॲपवरून वापरकर्त्याला मिळेल.

## 'गोपनीयता धोरण' तपासणारे सॉफ्टवेअर

संशोधक विद्यार्थी-श्रीयश कांबळे



गेल्या काही वर्षांपासून कंपन्यांसाठी डेटा प्रोटेक्शन कायदा अनिवार्य केला आहे. त्यामुळे प्रत्येक कंपनीला त्यांच्या गोपनीयता धोरणात किंवा प्रायव्हसी पॉलिसीमध्ये डेटा कसा मिळवला, हाताळला आणि हस्तांतरीत केला जातो, हे मांडणं अत्यावश्यक आहे. पण कंपनीचं हे गोपनीयता धोरण योग्य आहे अथवा नाही, हे तपासण्यासाठी श्रीयशनं सॉफ्टवेअर तयार केलं आहे. या सॉफ्टवेअरच्या आधारे कंपन्या त्यांची प्रायव्हसी पॉलिसी तपासू शकतात. आपलं धोरण डेटा प्रोटेक्शन कायद्याशी सुसंगत आहे अथवा नाही, हे त्यांना ३० सेकंदात कळतं. त्यासाठी श्रीयश आणि त्याच्या टीमनं कायद्यातील तज्ज्ञांशी बोलून ३७ नियम निश्चित केले आहेत. त्यांनी ७०० कंपन्यांच्या गोपनीयता धोरणाचा अभ्यास केला. हे सॉफ्टवेअर गोपनीयता धोरण तपासण्यासोबतच, ते कसं असावं, याची माहितीसुद्धा संबंधित कंपनीला पुरवतं.

## 'हिरा' है क्वाण्टम कम्प्युटिंग के लिए

संशोधन विद्यार्थी-विवेक शुक्ला



क्वाण्टम कम्प्युटिंग या क्षेत्रात मुंबई विद्यापीठाच्या विवेक शुक्लानं संशोधन करत क्वाण्टम कम्प्युटिंग आणि सेन्सिंग ॲप्लिकेशन्समध्ये वापरला जाणारा ख्रिस्टल डायमंड विकसित केला आहे. त्यासाठी त्यानं मायक्रोवेव्ह प्लाझ्मा केमिकल व्हेपर डिपॉझिशन हे यंत्र तयार करून त्याद्वारे मोठ्या आकाराच्या आणि क्वाण्टम श्रेणीच्या उच्च दर्जाच्या हिऱ्याची निर्मिती केली आहे. याच्या मदतीनं त्यानं फिल्ड इफेक्ट ट्रान्झिस्टर, मॅग्नेटिक फील्ड इमेजर, स्ट्रेस सेन्सर आणि सिंगल फोटॉन जनरटेर ही चार यंत्रे बनवली आहेत. सॅटेलाइट, रडारसारख्या उच्च क्षमतेच्या फ्रिक्वेन्सीसाठी, चुंबकीय क्षेत्रांमध्ये, सेमी कंडक्टरमध्ये जास्त आकाराची माहिती स्टोअर करणं, यासाठी ही यंत्रं वापरली जाऊ शकतात.

## 'क्षीरविवेक' तपासणारी पावडर

संशोधक विद्यार्थी-फरहीन शेख



आपण सेवन करत असलेलं दूध शुद्ध आहे का? हे तपासण्यासाठी असलेल्या सध्याच्या यंत्रणा किचकट आहेत. मात्र विद्यापीठाच्या फरहीन शेखनं अगदी झटपट दुधातील भेसळ तपासणारी पावडर तयार केली आहे. युरिया, बेन्झॉईक, सॅलिसिलिक ॲसिड, मिथेन यापैकी कोणता रासायनिक घटक दुधात आहे, हे तपासण्यासाठी फरहीननं सात प्रकारच्या पावडर्स तयार केल्या आहेत. ही चाचणी गृहिणींपासून लहान मुलांपर्यंत कोणीही करू शकतं. त्यासाठी दुधाचे दोन-चार थेंब घेऊन त्यात आपल्याला ज्या पदार्थांची भेसळ तपासायची, त्यासाठीची थोडीशी पावडर टाकायची. दुधाचा रंग बदलला, तर त्यात भेसळ आहे, हे लगेच स्पष्ट होतं. हा सात पावडर्सचा डबा ५० रुपयांपर्यंत उपलब्ध करून देण्याचा प्रयत्न फरहीननं केला आहे.



डॉ. वैशाली निरमळकर
संघ व्यवस्थापक



डॉ. मिनाक्षी गुरव
विशेष कार्य अधिकारी, आविष्कार, मुंबई विद्यापीठ



डॉ. भूषण लांगी
समन्वयक, आविष्कार, मुंबई विद्यापीठ



डॉ. मनीष देशमुख
संघ व्यवस्थापक

महाराष्ट्र टाइम्स । मुंबई । शुक्रवार, ३१ जानेवारी २०२५

# ज्ञानसाधनाच्या विद्यार्थ्यांची पुनर्भेट

ठाणे : ज्ञानसाधना महाविद्यालयातील कला शाखेच्या विद्यार्थ्यांनी ३० वर्षांनंतर एकत्र येत माजी प्राध्यापकांसह पुनर्भेट संमेलनाचा आनंद लुटला. हिंदुहृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे संकुलात हा सोहळा पार पडला.

यावेळी प्रा. प्रवीण दवणे यांनी कवितांच्या सादरीकरणातून आठवणींना उजाळा दिला. 'मला माहेरी घेऊन जाणारी पुनर्भेट' असे हृदयस्पर्शी शब्दांत या सोहळ्याचे त्यांनी वर्णन केले.अर्थशास्त्राच्या प्रा. मेघना मेहेंदळे, मानसशास्त्राच्या प्रा. कविता मोकाशी, इतिहासाचे प्रा. गोरक्षनाथ जगदाळे, इंग्रजीच्या प्रा. आसावरी करमाळकर आणि राज्यशास्त्राच्या प्रा. सुनीता जमणे यांनीही मनोगत व्यक्त केले. यावेळी महाविद्यालयात कार्यालयीन कामकाज पाहणाऱ्या वासंती जोशी आणि ज्ञानसाधनाचे प्राचार्य प्रा. गणेश भगुरे उपस्थित होते. या संमेलनाच्या आयोजनात डॉ. एकनाथ पवळे, महेंद्र म्हस्के, समीर मांढरे, अनिल कदम, बाळकृष्ण ओडेकर, अजय कांबळे, किशोर खांडपेकर, प्रीती पाटील, योगिता कारखानीस, शिल्पा कोरान्ne, श्रुती गवळी आणि सीमा कोंडे यांनी महत्त्वपूर्ण भूमिका बजावली.

लोकमत
मुंबई, गुरुवार, दि. ६ फेब्रुवारी २०२५

# स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेणारे भित्तिचित्रे संग्रहालय

## भित्तिचित्रांमुळे एनईपी २०२० ची अंमलबजावणी

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या इतिहास विभागातर्फे हिस्ट्री म्युझियम वॉल-फ्रीडम ॲट अ ग्लान्स या भित्तिचित्र संग्रहालयाचे अनावरण प्रा. डॉ. मंजिरी कामात आणि डॉ. विद्या प्रभू यांच्या हस्ते करण्यात आले. या भित्तिचित्रं संग्रहालयामध्ये राणी लक्ष्मीबाई, तात्या टोपे, क्रांतिसिंह नाना पाटील यांचे हस्ताक्षर, १८५७ च्या उठावातील क्रांतिकारकांचा जाहीरनामा, स्वातंत्र्य चळवळीतील तत्कालीन वर्तमानपत्रातील बातम्या, लोकमान्य टिळक यांना अटक केलेली तार, स्वातंत्र्य चळवळीतील काँग्रेसने तयार केलेला झेंडा, युसुफ मेहरली यांचे पत्र असे विविध चळवळीशी संबंधित कागदपत्रे, पत्रे, सरकारी आदेश आणि फोटो या संग्रहालयामध्ये पाहायला मिळत आहे.

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाचा इतिहास विभाग आणि आयक्यूएसी यांच्या वतीने स्वातंत्र्य चळवळीचा आढावा घेणारी भित्तिचित्रे आहेत.

**१८५७**
च्या उठावातील क्रांतिकारकांचा जाहीरनामा



## विद्यार्थ्यांना फायदेशीर

**१** डॉ. प्रभू यांनी दिवंगत सतीश प्रधान यांनी इतिहास विभागास केलेल्या सहकार्याच्या आठवणींना उजाळा दिला. संस्थेचे अध्यक्ष कमलेश प्रधान आणि सचिव डॉ. मानसी प्रधान यांनी अशा प्रकारे विविध ऐतिहासिक विषयावर प्रत्येक महाविद्यालयाने अशा प्रकारचे भित्तिचित्र संग्रहालय निर्माण केल्यास पुस्तकाच्या पलीकडचा इतिहास समजण्यास मदत होईल, असे सूचित केले.

**२** बिर्ला महाविद्यालय आणि ग्रामीण शिक्षण संस्थेच्या महाविद्यालयातून विद्यार्थी, शिक्षक उपस्थित होते. हे संग्रहालय असल्यामुळे इतर महाविद्यालयांसाठी एक प्रेरणा ठरू शकते, अशा भावना व्यक्त केल्या.

ठाणेवैभव

ठाणे, शुक्रवार ७ मार्च २०२५

# सेवाव्रती प्रा. सुनीता जमणे

**सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात 1998 साली रुजू झाल्यावर माझी पहिली छान घट्ट मैत्री झाली ती सुनीता जमणे मॅडमशी! कॉलेजमध्ये असलेले उत्तम वातावरण, विद्यार्थी वर्गाशी संबंध, शिकवण्याच्या विविध पद्धती, स्वव्यक्तिमत्व घडवण्यासाठी मार्गदर्शन इत्यादी अनेक व्यावसायिक व वैयक्तिक गोष्टीत आजपर्यंत मला त्या उत्तम मैत्रीण, बहीण, आई, मार्गदर्शिका या नात्याने घडवत गेल्या. आज त्या सेवानिवृत्त होत आहेत. मात्र आमचे हे बंध आजही आहेत पुढेही असेच राहतील.**

आदर्श विद्यार्थिनी, उत्तम वक्तृत्व कला असलेल्या, उत्तम गायन कला व आवाजाची देणगी असलेल्या बहुगुणी व्यक्तिमत्त्वाच्या जमणे बाई बी.ए, एम.ए. राज्यशास्त्र विषयातील कोल्हापूर विद्यापीठातील गोल्ड मेडलिस्ट आहेत. तसेच बी.एड.डिग्रीतही उत्तम गुण त्यांनी प्राप्त केले आहेत. महाविद्यालयात त्यांनी विभाग प्रमुख, 2 वर्षे चीफ मॉडरेटर, राज्यशास्त्र विषय मॉडरेटर, पेपर सेटर मेंबर ऑफ सिक्युरिटी कमिटी, महाराष्ट्र राज्य पातळीवर, जिल्हा पातळीवर तज्ज्ञ मार्गदर्शक, बारावी बोर्ड परीक्षा डेप्युटी कंडक्टर, कला शाखा ज्युनिअर सुपरवायजर, राज्यशास्त्र विषय राज्य परिषद संस्थापक सदस्य अशा अनेक महत्त्वाच्या जबाबदाऱ्या गेली अनेक वर्षे उत्तमपणे सांभाळल्या आहेत. तसेच कॉलेजच्या एल.एम.सी. कमिटीवर काम करून वेगवेगळ्या शिक्षकांचे प्रश्न कमिटीमध्ये मांडले आहेत.

बालपणापासून असलेली सामाजिक बांधिलकीची जाणीव, उपजत असलेले ममत्व यातून त्यांनी कॉलेजमध्ये आल्यापासून विद्यार्थी वर्गाशी अत्यंत जिव्हाळ्याचे नाते निर्माण केले. प्रत्येक विद्यार्थ्याशी संवाद साधणे, त्यांच्या अडचणी जाणून घेणे, त्यांच्या पालकांशी बोलणे, भविष्यातील वाटचालीसाठी दिशा दाखवणे, त्यांचे वेळप्रसंगी फी चे पैसे भरणे, अभ्यासक्रम पूर्ण करणे, अभ्यास घेणे, उजळणी घेणे, पेपर सोडवून घेणे, परीक्षा घेणे इत्यादी अभ्यासक्रमातील अनेक गोष्टी त्या सातत्याने निरंतर करत राहिल्या. आपल्या विषयाचा निकाल मेहनत करून त्यांनी 95 ते 100 टक्के असा सातत्यपूर्ण ठेवला. हे करत असताना त्यांनी विद्यार्थ्यांना वेळप्रसंगी रागावून, शिक्षा करून त्यांच्या चुकीची जाणीवही करून दिली. विद्यार्थ्यांचा व्यक्तिमत्व विकास व्हावा यासाठी विविध स्पर्धा, उपक्रम, समाजातील तज्ज्ञ व्यक्तींचे मार्गदर्शन, करिअर गायडन्स, एम.पी.एस.सी., यू.पी.एस.सी.चे मार्गदर्शन, राज्यशास्त्रातले विविध उपक्रम, प्रकल्प, विधिमंडळ कामकाज पाहण्याचा सातत्याने केलेला उपक्रम (शैक्षणिक सहल), राज्यशास्त्रीय मॉडेल, प्रश्नमंजुषा अशा अनेक गोष्टी त्या नियमित करत राहिल्या. विद्यार्थ्यांसाठी सतत कनेक्ट राहणं, त्यांच्या फोनला नियमित रिप्लाय देणे, अकरावी- बारावीच्या प्रवेश प्रक्रियेत प्रत्येक विद्यार्थी प्रवेश घेईल यासाठी सतत प्रयत्न करणे, विविध कमिटी प्रमुख म्हणून काम करताना त्या कमिटी अंतर्गत प्रत्येक कार्यक्रमांमधून विद्यार्थी कसा घडेल व कॉलेजचे नाव कसे उंचावेल या गोष्टी त्यांनी नियमित केल्या. त्यांच्या मेहनतीमुळे राज्यशास्त्र विषयात विद्यार्थी चांगले गुण मिळवत गेले व त्यातून दोन विद्यार्थी बोर्डात आले. त्याचबरोबर आपल्या विषयाचा असलेला प्रदीर्घ अनुभव गाढा अभ्यास यामुळे इतर कॉलेजमध्ये सुद्धा त्यांना मार्गदर्शनासाठी जाण्याची संधी मिळाली.



कॉलेजमध्ये सेवेत असताना व्यवस्थापन, विविध प्राचार्य, उपप्राचार्य, इतर शिक्षक सहकारी यांच्याबरोबरही त्यांचे संबंध नेहमीच आदराचे, जिव्हाळ्याचे व मैत्रीपूर्ण राहिले. त्यांचा विशेष गुण म्हणजे कॉलेजमधल्या प्रत्येक व्यक्तीचा वाढदिवस त्यांनी लक्षात ठेवून तो साजरा केला. महाविद्यालयात वेळेत येणे- जाणे, कामात अत्यंत प्रामाणिकपणा, निष्ठा, विद्यार्थ्यांची असलेली बांधिलकी, कोरोना काळात केलेले ऑनलाईन लेक्चरचे नियोजन, परदेशी राहूनही घेतलेला मुलांचा अभ्यास, सुट्टीवर असताना मुलांचे नुकसान होऊ नये म्हणून वेळेच्या आधी पूर्ण केलेला मुलांचा अभ्यासक्रम, आधुनिक काळाशी सतत कनेक्ट राहून बदललेले आधुनिक तंत्रज्ञान शिकून घेऊन कॉलेजमध्ये सरल प्रणालीचे केलेले काम यांसारख्या अनेक गोष्टी निरंतर करत राहून स्वतःच्या सेवेचा 34 वर्षांचा टप्पा अत्यंत यशस्वीपणे त्यांनी पूर्ण केला.

त्यांच्या या प्रदीर्घ सेवेमधून त्यांनी केलेली मेहनत, प्रामाणिकपणा, कष्ट, त्यांचा व्रतस्थ पणा याचा वसा कॉलेजमधल्या इतर शिक्षकांनीही घेतला आहे. त्यांच्या या वृत्तीचा आम्हालाही फायदा झाला आहे व आम्ही त्यांच्या या प्रेरणेने पुढे काम करत आहोत. आमच्या कॉलेजचे व्यवस्थापन शिक्षकांनी केलेल्या कार्याची सतत दखल घेत असते. त्याची पोचपावती म्हणजे प्रा. जमणे यांना स्वातंत्र्यसेनानी कै. श्री. दत्ताजी ताम्हणे आदर्श शिक्षक पुरस्काराने सन्मानित करण्यात आले.

**त्यांच्या पुढील वाटचालीस मन:पूर्वक शुभेच्छा.**

**- प्रा. विद्या शशिकांत चव्हाण**
सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे.

पुण्य नगरी
www.epunyanagari.com

रविवार, ९ मार्च २०२५

# महाविद्यालयात प्लेसमेंट ड्राइव्ह

**ठाणे** : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात नुकतेच आंतरमहाविद्यालयीन प्लेसमेंट ड्राइव्ह झाले. ज्यात २० हून अधिक कंपन्या सहभागी झाल्या होत्या . या वेळी सहा महाविद्यालयांनी भाग घेतला. तर इतर शिक्षणसंस्थांमधील २५० हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता. तर सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील ४७ विद्यार्थ्यांना विविध कॉर्पोरेट क्षेत्रात निवडण्यात आले .

ठाणेवैभव

ठाणे, रविवार ९ मार्च २०२५

# ज्ञानसाधना महाविद्यालयात 'फिलिम Zaade 3.0' महोत्सवाचे आयोजन

**ठाणे :** सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या मल्टीमीडिया अँड मास कम्युनिकेशन (BAMMC) विभागातर्फे 'फिलिम Zaade 3.0' या भव्य आंतर महाविद्यालयीन मीडिया फेस्टिव्हलचे आयोजन करण्यात आले आहे. हा बहुप्रतीक्षित कार्यक्रम बुधवार 12 व गुरुवार 13 मार्च रोजी महाविद्यालयाच्या प्रांगणात होणार आहे.

'फिलिम Zaade' हा मनोरंजन, कला, चित्रपट प्रदर्शन आणि मास्टर क्लासेसचा संगम असलेला अनोखा महोत्सव असून, 2021 साली याची सुरुवात झाली. मागील दोन वर्षांच्या प्रचंड यशानंतर यंदा अधिक जोशात आणि भव्य स्वरुपात हा उत्सव साजरा केला जात आहे.

कार्यक्रमाच्या पहिल्या दिवशी विद्यार्थ्यांसाठी विविध मनोरंजक खेळ आणि स्पर्धांचे आयोजन, दुसऱ्या दिवशी मराठी चित्रपटसृष्टीतील नामवंत कलाकार आणि तज्ज्ञांकडून मास्टर क्लासेस आणि सांस्कृतिक सांगता संगीताच्या सुमधुर मैफिलीने होणार आहे. या महोत्सवाचा मुख्य उद्देश विद्यार्थ्यांच्या कलागुणांना वाव देणे तसेच माहितीपूर्ण मनोरंजनाचा अनुभव देणे हा आहे. चित्रपट आणि मीडियाचा पारंपरिक तसेच आधुनिक प्रवास यावेळी उलगडण्यात येणार आहे.

BAMMC विभाग सर्व विद्यार्थ्यांना या अद्भुत फेस्टिव्हलचा भाग होण्याची संधी देत आहे. अधिक माहितीसाठी spdc.bammc या इंस्टाग्राम पेजला फॉलो करा, असे आवाहन करण्यात आले आहे.

लोकमत
मुंबई, गुरुवार, दि. १३ मार्च २०२५

# महाविद्यालयीन विद्यार्थ्यांची कॉर्पोरेट क्षेत्रात झाली निवड

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** टीएनएस फाउंडेशन आणि सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयाच्या संयुक्त विद्यमाने आयोजित केलेल्या प्लेसमेंट आणि करिअर कौन्सिलिंग सेलने आंतरमहाविद्यालयीन प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयातील एकूण ४७ विद्यार्थ्यांना विविध कॉर्पोरेट क्षेत्रात आकर्षक वेतनश्रेणीसह निवडण्यात आले. इंटर्नशिप ड्राइव्हदरम्यान ८० विद्यार्थ्यांनी भाग घेतला आणि त्यापैकी ३० जणांनी विविध कंपन्यांत पदे मिळवली.

या ड्राइव्हमध्ये २०हून अधिक उत्साही कंपन्या सहभागी झाल्या. या प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये एकूण सहा महाविद्यालयांनी भाग घेतला. इतर शिक्षण संस्थांमधील २५०हून अधिक विद्यार्थ्यांचा सहभाग होता. महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. गणेश भगुरे

**सर्व महाविद्यालयांमधील २५० पैकी २१५ विद्यार्थ्यांची विविध पदांवर निवड झाली.**

यांनी मौलिक मार्गदर्शन करून अनेक तरुणांचे भविष्य उज्ज्वल करण्यासाठी हातभार लावला.

**२०** हून अधिक उत्साही कंपन्या सहभागी झाल्या

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. शिल्पा हटेवार यांनी केले, तर प्रा. संपदा सावंत यांनी आभार उपस्थितांचे आभार मानले.

कार्यक्रमाच्या नियोजनात डॉ. प्रज्ञा तिवड, प्रा. आदित्य खन्ना, प्रा. सायली कांबळे, डॉ. सर्जेराव बोऱ्हाडे, डॉ. सृष्टी मणचेकर यांनी मोलाची भूमिका बजावली. आंतरमहाविद्यालयीन प्लेसमेंट ड्राइव्हमध्ये प्रगती कॉलेज डोंबिवली, एसआयए उच्चशिक्षण महाविद्यालय, डोंबिवली, बी. के. बिर्ला कॉलेज, कल्याण, के. एम. अग्रवाल कॉलेज कल्याण, एनकेटी कॉलेज, ठाणे यांनी भाग घेतला.

लोकमत
मुंबई, मंगळवार, दि. ८ एप्रिल २०२५

# 'तातडीने रुग्णाला सीपीआर मिळाल्यास तो वाचू शकतो'

लोकमत न्यूज नेटवर्क

**ठाणे :** मानवी हृदयात सातत्याने कंपने होत असतात. हृदयाच्या विविध कप्प्यांमधील कार्य जेव्हा विस्कळीत होते, तेव्हा हृदयविकार संभवतो. अशावेळी तातडीने रुग्णाला सीपीआर मिळाल्यास त्याला वाचवण्याची शाश्वती ६० टक्के असते, असे प्रतिपादन डॉ. अमित खोमणे यांनी केले.

**६०** टक्के वाचवण्याची शाश्वती सीपीआरमुळे असते

सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथील विज्ञान विद्याशाखा आणि बीइंग मी समितीच्या संयुक्त विद्यमाने शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचाऱ्यांसाठी बीएलएस, सीपीआर प्रशिक्षण कार्यशाळेचे शनिवारी पी. सावळाराम सभागृहात आयोजन केले होते. या कार्यशाळेत डॉ. खोमाणे यांनी बेसिक लाइफ सपोर्ट (बीएलएस / सीपीआर) या विषयावर प्रात्यक्षिकांच्या सहाय्याने उपस्थितांना प्रशिक्षण दिले.

सीपीआर म्हणजे कार्डिओपल्मोनरी रिसुसिटेशन. सीपीआर ही एक आणीबाणीची प्रक्रिया आहे. यात हार्ट अटॅकसारख्या आपत्कालीन परिस्थितीत रुग्णाच्या छातीवर विशिष्ट प्रकारे दाब देणे आणि बचाव श्वास यांचा समावेश होतो.

## जीवनरक्षक कौशल्ये प्रदान

**१** ही प्रक्रिया योग्यरित्या पार पडल्यास आपत्कालीन मदत पोहचेपर्यंत रुग्णाच्या मेंदू आणि इतर अवयवांना ऑक्सिजन पोहोचवण्यात मदत करू शकते आणि रुग्ण बरा होण्याची शक्यता वाढते, असे सांगण्यात आले.

**२** खोमणे यांनी कार्यक्रमात तज्ज्ञ प्रशिक्षकाची भूमिका निभावली. त्यांनी जीवनरक्षक कौशल्ये प्रदान केली. मॅनिकिन्सवरील प्रत्यक्ष प्रशिक्षणासह सीपीआर आणि एईडी मशीनची माहिती देऊन मशीनच्या प्रभावी वापर कसा करावा, याबाबत प्रात्यक्षिक करून दाखविले.



## आत्मविश्वास मिळवून दिला

डॉ. खोमाणे यांच्यासह त्यांना प्रात्यक्षिके सादरीकरणात मदतनीस म्हणून आलेल्या प्रीती पाटील, संकेत पाटील, आशिष गुप्ता, जितेंद्र गायकवाड, प्रतीक्षा म्हात्रे यांनी सहभागींना सीपीआर तंत्रात आत्मविश्वास मिळवून देण्यात सहकार्य केले. संकट व्यवस्थापनात एईडीचा वापर कसा करावा, हेही समजावून सांगण्यात आले. कार्यशाळेत एकूण १०० शिक्षक आणि शिक्षकेतर कर्मचारी सहभागी झाले होते.

लोकसत्ता
४ मंगळवार, ८ एप्रिल २०२५

# 'ज्ञानसाधना'त प्रथमोपचार प्रशिक्षण

ठाणे : सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात आपत्कालीन परिस्थितीतील प्रथमोपचाराचे प्रशिक्षण देण्यात आले. या कार्यशाळेत डॉ. अमित लाला खोमणे यांनी उपस्थितांना प्रात्यक्षिके दाखवली.

ज्ञानसाधना महाविद्यालयात विज्ञान विद्याशाखा आणि 'बीइंग मी' समितीच्या संयुक्त विद्यमाने बीएलएस/सीपीआर प्रशिक्षण कार्यशाळेचे आयोजन केले होते. कौशल्य रुग्णालय येथे कार्यरत असलेल्या डॉ. अमित खोमणे यांनी सहभागींना जीवनरक्षक कौशल्ये शिकवली. 'सीपीआर' आणि 'एईडी' मशीनची माहिती देत, यंत्राचा प्रभावी वापर कसा करावा याबाबत प्रात्यक्षिक दाखवले. १५ स्वयंसेवकांना यावेळी प्रमाणपत्रे देण्यात आली. कार्यशाळेचे आयोजन माजी उपप्राचार्या आणि 'बीइंग मी' सल्लागार समिती सदस्य डॉ. मृणाल बकाणे यांनी केले. कार्यक्रमात उपप्राचार्या डॉ. मंजिरी गोंधळेकर, डॉ. सीमा केतकर, डॉ. शिवानी बॅनर्जी उपस्थित होत्या.

लोकमत
मुंबई, सोमवार, दि. १७ मार्च २०२५

# होळीनिमित्त ठाण्यात पर्यावरण जागरूकतेची घेतली शपथ

लोकमत न्यूज नेटवर्क

ठाणे : होळीनिमित्त सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ठाणे येथील 'बिईंग मी समिती' आणि ठाणे महापालिकेतील पर्यावरण विभागाच्या संयुक्त विद्यमाने सिग्नल शाळेतील विद्यार्थ्यांसाठी छोटेखानी कार्यक्रम झाला. महाविद्यालयीन विद्यार्थ्यांनी सिग्नल शाळेतील विद्यार्थ्यांसाठी होळी या विषयावर आधारित गाण्यांवर नृत्य सादर केले. महाविद्यालयातील विद्यार्थ्यांच्या हस्ते या लहानग्या विद्यार्थ्यांना हरित रंग आणि चॉकलेट्स देण्यात आले. होळीनिमित्त ताई व दादा आल्याचा आनंद सिग्नल शाळेतील या लहानग्या मुलांच्या चेहऱ्यावर ओसंडून वाहत होता.

कार्यक्रमाची संकल्पना प्रा. राहुल जयस्वाल यांची होती. तर ज्ञानसाधना, ठाणे संस्थेच्या सचिव आणि 'बिईंग मी' या समितीच्या सल्लागार डॉ. मानसी प्रधान, प्राचार्य डॉ. गणेश भगुरे यांच्या मार्गदर्शनाखाली कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले. कार्यक्रमात 'बिईंग मी' समितीप्रमुख डॉ. अनिता दक्षिणा आणि प्रा. प्रशांत बने यांनी होळीचे महत्त्व आणि होळी खेळताना घेतली जाणारी जागरूकता याविषयी सिग्नल शाळेतील विद्यार्थ्यांसोबत संवाद साधला.

**२५**
**महाविद्यालयातील विद्यार्थ्यांनी सहभाग घेतला होता**

यावेळी महाविद्यालयातील २५ विद्यार्थ्यांसह डॉ. आसावरी टाक, प्रा. प्रशांत बने, प्रा. मृगया गायकवाड, प्रा. महेश कुलसंगे यांनी कार्यक्रमाच्या आयोजनात मोलाची भूमिका निभावली.

कार्यक्रमादरम्यान ठाणे पालिकेतील पर्यावरण विभागात लॅब अटेंडंट या पदावर कार्यरत विशाल हिंगे आणि लॅब असिस्टंट या पदावर कार्यरत नयन परमार यांनी विद्यार्थ्यांकडून शपथ घेतली. सिग्नल शाळेतील प्रकल्प प्रमुख आरती परब आणि शैला देसले, कल्याणी कोळी व पाटील यांनी मोलाची भूमिका निभावली.

महाराष्ट्र टाइम्स

शुक्रवार १६ मे २०२५.




# दहावीनंतरच्या करिअर संधी

दहावीच्या निकालानंतर आता करिअरच्या नव्या वाटांवर विद्यार्थ्यांचा प्रवास सुरू होणार आहे. करिअरची उत्तम संधी असलेल्या अशाच विविध क्षेत्रांची माहिती देण्यासाठी 'महाराष्ट्र टाइम्सने प्लॅनेट कॅम्पस' या उपक्रमांतर्गत 'स्पीडलॅब्स'च्या सहकार्याने एका सेमिनारचे आयोजन केले आहे. शनिवार, १७ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात हे सेमिनार होणार आहे. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांमधील विविध संधीविषयी करिअर मार्गदर्शक स्वाती साळुंखे विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अभ्यासासोबतच आवश्यक असलेली विविध कौशल्ये कशी आत्मसात करावी, याविषयी समुपदेशन मानसशास्त्रज्ञ मानसी आमडेकर मार्गदर्शन करणार आहेत. हे सेमिनार विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.



स्वाती साळुंखे



मानसी आमडेकर

## कधी व कुठे?

दिनांक - शनिवार १७ मे २०२५

वेळ - सकाळी १०.३० वा.

ठिकाण - सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ज्ञानसाधना मार्ग, ठाणे पश्चिम

महाराष्ट्र टाइम्स
मुंबई | शनिवार, १७ मे २०२५

# दहावीनंतरच्या करिअर संधी



दहावीच्या निकालानंतर आता करिअरच्या नव्या वाटांवर विद्यार्थ्यांचा प्रवास सुरू होणार आहे. करिअरची उत्तम संधी असलेल्या अशाच विविध क्षेत्रांची माहिती देण्यासाठी '**महाराष्ट्र टाइम्सने प्लॅनेट कॅम्पस**' या उपक्रमांतर्गत 'स्पीडलॅब्स'च्या सहकार्याने एका सेमिनारचे आयोजन केले आहे. आज, १७ मे २०२५ रोजी सकाळी १०.३० वाजता ठाण्यातील सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालयात हे सेमिनार होणार आहे. कला, विज्ञान आणि वाणिज्य शाखांमधील विविध संधीविषयी करिअर मार्गदर्शक **स्वाती साळुंखे** विद्यार्थ्यांना मार्गदर्शन करणार आहेत. अभ्यासासोबतच आवश्यक असलेली विविध कौशल्ये कशी आत्मसात करावी, याविषयी समुपदेशन मानसशास्त्रज्ञ **मानसी आमडेकर** मार्गदर्शन करणार आहेत. हे सेमिनार विनामूल्य असून प्रथम येणाऱ्यास प्राधान्य दिले जाईल.



स्वाती साळुंखे



मानसी आमडेकर

## कधी व कुठे?

दिनांक - आज, १७ मे २०२५

वेळ - सकाळी १०.३० वा.

ठिकाण - सतीश प्रधान ज्ञानसाधना महाविद्यालय, ईस्टर्न एक्सप्रेस हायवे, ज्ञानसाधना मार्ग, ठाणे पश्चिम

